अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

किंमत रुपये १५

ऑगस्ट २००८




## पहिली फेरी?

## धीरुभाईइझम

## ऋतू न्याहाळणारं पान

## गीतकृष्णायन

## अक्षयपात्र

# सप्तपदीचे झाले सार्थक



आपण विवाहवेदीवर सप्तपदीद्वारे विवाहोत्तर आयुष्य एकमेकांच्या जोडीने, एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होऊन घालवायचे असा संकल्प घेतो.

आपल्या विवाहाला पंचवीस वर्षे झाली असतील तर आपण या लेखस्पर्धेत भाग घेऊन मेहता मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकात झळकू शकता.

आपल्या पतीबद्दल वा पत्नीबद्दल आपण लिहायचे आहे.

दोघांचे स्वभाव, त्यातील वेगळेपण, सासर-माहेरच्या जीवनशैलीतला फरक, असे असूनही आपल्या पतीने / पत्नीने एकमेकांशी समरस होण्यासाठी केलेले परिश्रम, परस्परांना दिलेला मानसिक आधार, मुलाबाळांचे संगोपन, आर्थिक अडीअडचणीतून काढलेला मार्ग, आपत्तीच्या प्रसंगी दिलेले बळ...

आपण त्याबद्दल मोकळेपणाने लिहा.

**शब्द मर्यादा - १००० शब्द.**

**मुदत २५ ऑगस्ट २००८**

**पहिल्या तीन लेखांना**

**प्रत्येकी ५००/- रुपयांचे पुरस्कार पुस्तकरूपाने.**

लेख पाठवण्याचा पत्ता

**संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत, मेहता पब्लिशिंग हाऊस**

**१९४१, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑगस्ट २००८

◆ वर्ष आठवे

◆ अंक आठवा

## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १२ |
| **पुस्तक परिचय** | |
| **धीरूभाईझम** : अनु. सुप्रिया वकील | ४८ |
| **अक्षयपात्र** : अनु. अंजनी नरवणे | ५४ |
| **पहिली फेरी** : राम प्रधान | ६२ |
| **गीत कृष्णायन** : प्रसाद औटी | ६८ |
| **ऋतू न्याहाळणारं पान** : संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे | ७२ |
| **मुलाखत** : मीता कपूर | ८२ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ८८ |
| **पुरस्कार** | ९४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९७ |
| **श्रद्धांजली** | १०० |
| **बालनगरी** | १०३ |



✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*



✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-२४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादकसहमत असतीलच असे नाही.*




## बेस्ट ऑफ बुकर

एकाच संस्थेकडून एकाच पुस्तकासाठी चाळीस वर्षांच्या अवधीत तीन वेळा पुरस्कार मिळवण्याचा विलक्षण विक्रम सलमान रश्दीच्या नावावर नुकताच नोंदवला गेला. मिडनाइट्स चिल्ड्रेन या त्याच्या कादंबरीला १९८१ सालचा बुकर पुरस्कार प्रथम मिळाला.

बुकरच्या पंचविसाव्या आणि चाळिसाव्या वर्षी - त्या त्या कालावधीतील सर्वोच्च कादंबरी म्हणून याच कादंबरीच्या पारड्यात कौल पडला.

तसे पाहिले तर ही त्याची दुसरीच कादंबरी आणि त्यावेळी त्याचे वय होते फक्त ३४ वर्षे. त्याआधी १३ वर्षे हा पुरस्कार देण्यात येत होता. नोबेल पुरस्काराचे मानकरी ठरलेले वुइल्यम गोल्डिंग यांना १९८०चा बुकर पुरस्कार मिळाला होता तो वयाच्या एकोणसत्तराव्या व्या वर्षी आणि इतरही आधीच्या विजेत्यांचे सरासरी वय पन्नाशीच्या आसपास घोटाळत होते. सलमान रश्दीने ऐन पस्तिशीत हा पुरस्कार मिळवून नव्या दशकात तरुणाईचा वरचष्मा राहणार असे जणू ऐलान केले. इंग्लिश साहित्याच्या क्षेत्रात नवे युग, नवे पर्व, तरुण प्रतिभावंतांचे पर्व सुरू होणार याचीच जणू पताका त्याने फडकवली. इंग्लंडमध्ये त्यावेळी मार्गारेट थॅचर यांची राजवट सुरू होती; त्यांनी ब्रिटनच्या आर्थिक आणि औद्योगिक सबलीकरणाला मार्गारेट थॅचर यांनी जोरदार चालना दिली होती.

रश्दी हा मूळ भारतीय. मुंबईत जन्म झालेला. केंब्रिजमध्ये शिकलेला; परंतु ब्रिटिश नागरिकत्व स्वीकारून साहित्यक्षेत्रात काहीतरी करू पाहण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा तरुण. इंग्लिश भाषेवर प्रभुत्व आणि तिच्यात मोडतोड करून नव्या शब्द-कल्पनांचा धुमाकूळ घालण्याचा अजब आत्मविश्वास - यामुळे हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्याच्या अहंकाराला फुलवणारा ठरला. एका नव्या वाङ्मयीन संस्कृतीचा तो अग्रदूत बनला आणि त्याने बघता बघता आपला दबदबा निर्माण केला.

इंग्लिशमध्ये लेखन करताना भारतीय आणि आशियाई लेखकांना वाटणारा

न्यूनगंड सलमान रश्दीमध्ये अभावानेच होता; उलट इंग्लिश भाषा ही वाटेल तशी आपण वाकवू शकतो असा अभिमान त्याला होता आणि त्यामुळे भारतीय वातावरणाला साजेशा बंबईया इंग्लिशचा प्रयोग तो सराईतपणे आणि बेदरकारपणे करीत होता... 'मॅजिक रिॲलिझम'ने भारलेली त्याची कथावस्तू ही जादूच्या सतरंजीवरून जणू भारताची सैर घडवून आणत होती. त्याच्या या मस्तीला बुकर पुरस्काराने मोठेच बळ दिले.

भारतीय समाजातील हिंदू-मुस्लीम संघर्षाचे, फाळणीचे आणि त्या अनुषंगाने झालेल्या वाताहतीचे व स्थलांतराचे दर्शन घडवणारी त्याची मिडनाइट्स चिल्ड्रेन ही कादंबरी ब्रिटिश वाचकांना एक नवे सांस्कृतिक भान देणारी ठरली; भारतीय उपखंडातल्या अनुभवांना सलमान रश्दीने विश्वात्मक परिमाण दिले. सर्व वाचकांना झपाटून टाकले. आणि या पुरस्काराने तिचा अधिक उठाव होण्याला चालना मिळाली... या अगोदर अनिता देसाई यांचा बुकर शॉर्ट लिस्टमध्ये समावेश झाला होता; परंतु सलमान रश्दीला मिळालेल्या पुरस्काराने इंग्लिशमध्ये लेखन करू पाहणाऱ्या तरुण भारतीयांना नवा हुरूप आला.

'ग्रेट इंडियन नॉव्हेल' म्हणून मिडनाइट्स चिल्ड्रेनने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आणि ब्रिटिश प्रकाशन संस्था भारतीय तरुण लेखकांकडे प्रथमच थोड्याफार स्वागतशील दृष्टीने बघू लागल्या. या प्रकाशन संस्थांचे 'सर्वज्ञ' एडिटर्स भारतीय लेखकांचे व्हिक्टोरियन इंग्लिश करेक्ट करण्याचे सोडून इंडियन इंग्लिशची फ्लेवर तशीच ठेवायला प्रथमच राजी झाले आणि भारतीय इंग्लिशला एक स्वतंत्र बोली म्हणून ओळखायला लागले. सलमान रश्दीला १९८१साली मिळालेल्या बुकर प्राईझने आणि त्यानंतर त्याला लाभलेल्या सेलिब्रेटी स्टेटसने इंग्लिशमध्ये लिहू पाहणाऱ्या भारतीय (आणि आशियाई व आफ्रिकन) तरुण लेखकांना मोठे आत्मबळ दिले यात शंका नाही. अरुंधती रॉय (दि गॉड ऑफ स्मॉल थींग्ज्), किरण देसाई (ए लॉस ऑफ इनहेरिटन्स) यांनी पुढे बुकर पुरस्कार मिळवले. इतर भारतीय लेखकांच्या पुस्तकांनाही शॉर्ट लिस्टमध्ये वरचेवर स्थान मिळत राहिले.

१९८९ मध्ये सलमान रश्दीची 'द सॅटॅनिक व्हर्सेस' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. महमद पैगंबर आणि इस्लाम धर्म याबद्दलची तिच्यातील काही विधाने आणि वर्णने सनातनी कर्मठ मुल्लामौलवींचा रोष ओढवून घेणारी ठरली आणि सलमान रश्दीला मृत्युदंड देण्याचा आणि ठार मारणाऱ्याला दहा लक्ष डॉलर्सचे बक्षीस देण्याचा फतवा निघाला. भारतात या कादंबरीवर बंदी घालण्यात आली. पाकिस्तान आणि इतर मुस्लीम राष्ट्रांनीही तिच्या वितरणाला आक्षेप घेतले. परंतु या फतव्यामुळे सलमान रश्दीला जगभर एक विद्रोही, बंडखोर लेखक म्हणून नवी प्रतिमा प्राप्त झाली. युरोपियन देशांनी सुरक्षिततेचे कवच त्याला पुरवले. मृत्युदंडाचा फतवा असल्याने

त्याच्या हालचालींबाबत शक्य तेवढी गुप्तता पाळण्याच्या दृष्टीने सावधगिरी घेण्यात येऊन सुरक्षा देण्यात पाश्चात्त्य देशांनी कुठलीही कसर ठेवली नाही. या अवस्थेतही सलमान रश्दीचे लेखन चालूच राहिले हे विशेष! फतव्यामुळे आपली झालेली मुस्कटदाबी व्यक्त करण्यासाठी त्याने 'हरून' ही किशोर कादंबरी लिहिली. त्यात गोष्टी सांगण्यास बंदी घालण्यात आलेल्या एका कथाकथनकाराची घुसमट व्यक्त करण्यात आली आहे. अरेबियन नाइट्सच्या धर्तीवरची ही सुलतानाची फँटसीच्या बाजाची कथा 'क्लासिक'मध्ये गणली जावी अशा तोलामोलाची आहे. इस्लामी फतव्यामुळे सलमान रश्दीचा अज्ञातवास चालू असला तरी तो प्रसिद्धीच्या झोतात सतत राहिला आणि संज्ञापन माध्यमांनाही सतत खाद्य पुरवत राहिला. त्याच्या प्रथम पत्नीने त्याला घटस्फोट दिला. कारण सतत अज्ञातवासात राहणे तिच्या दृष्टीने फारच क्लेशदायक होते. तर सलमान रश्दीचे पद्मालक्ष्मीशी संधान जुळले. तिच्याशीही नंतर बेबनाव झाल्याच्या बातम्या येत राहिल्या.

दि एनचॅन्ट्रेस ऑफ फ्लॉरेन्स ही त्याची कादंबरी काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाली आहे. तिच्या प्रसिद्धीसाठी युरोप-अमेरिकेत त्याचे दौरे चालू आहेत. या दौऱ्यात असल्यामुळे बुकरचा चाळीस वर्षांतील सर्वोत्तम कादंबरीबद्दलचा पुरस्कार स्वीकारण्यासाठी लंडनमधील साऊथ बँक सेंटरच्या सभागृहात ९ जुलै रोजी त्याला स्वत:ला उपस्थित राहणे जमले नाही. त्याच्या झफर आणि मिलन या मुलांनी हा दि बेस्ट ऑफ बुकर पुरस्कार स्वीकारला. बेस्ट ऑफ बुकरसाठी दि घोस्ट रोड (पॅट बार्कर), ऑस्कर अँड लुसिंडा (पीटर कॅरी), डिसग्रेस (जे एम कोएत्झी), दि सिएज ऑफ कृष्णापूर (जे. जी. फॅरेल) दि काँझर्वेशनिस्ट (नॉदिन गॉर्डिमोर) ही इतर पाच पुस्तकेही स्पर्धेत होती.

या पुस्तकांवर वाचकांचा कौल मागवण्यात आला होता. ७८०१ वाचकांनी ऑनलाइन आणि एसएमएसद्वारे मतप्रदर्शन केले. त्यात ३६ टक्के मते मिडनाइट्स चिल्ड्रेनला मिळाली. २५ ते ३४ या वयोगटातील तरुणवर्गाने या मतदानात मोठ्या प्रमाणावर भाग घेतला; त्यामुळे तरुणांमध्ये सलमान रश्दीला मोठा चाहतावर्ग आहे यावरही जणू शिक्कामोर्तब झाले. बुकर पुरस्काराच्या संदर्भात अशा प्रकारे वाचकांचा कौल प्रथमच घेण्यात आला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री भारतीय स्वातंत्र्याचा उष:काल झाला. नेमक्या त्याचवेळी मुंबईत या कादंबरीचा नायक सलीम सिनारीचा जन्म झाला. एका अर्थाने स्वतंत्र भारताचाच प्रतिनिधी किंवा प्रतीक म्हणून सलीम सिनारीने आपले व्यक्तिमत्त्व आणि वैशिष्ट्य 'मिडनाइट्स चिल्ड्रेन'द्वारे ठसठशीतपणे पुढे मांडले. 'चटनीफाइड् हिस्टरी', 'लव्हली लस्सी', फन्टॅब्युलस फालुदा, भेल-पुरीफाइड इंग्लिश यासारख्या त्यातील शब्दप्रयोगांनी देशी इंग्रजीचा जो दिमाख प्रकट झाला तो आपल्या भारतीय वाचकांनाही सुखद गुदगुल्या करणारा ठरला. हा आपल्या अस्मितेचा निखळ उद्गार असल्याचा अभिमान उरी दाटून आला. युरोप अमेरिकेतल्या

तरुण वर्गालाही या सगळ्यात कुठेतरी आपल्याच अंतरंगाचे हृद्‌गत सामावल्यासारखे वाटले असावे; त्यामुळे वाचकांच्या कौलामध्ये इतर नामवंत कादंबऱ्या स्पर्धेत असूनही बेस्ट ऑफ बुकरसाठी मिडनाइट्स चिल्ड्रेनची निवड करावीशी वाटली असावी.

काहीही असो, सलमान रश्दीने भारतीय तरुण साहित्यिकांसाठी पाश्चात्त्य देशातील स्वैर संचाराचा राजमार्ग प्रशस्त करून ठेवला आहे हे मान्य करायलाच हवे. बुकर पुरस्कारामुळे गेल्या चाळीस वर्षांत कादंबरी लेखनाला नवा बहर आला आहे. चित्रपटांसाठी पटकथा आणि टेलिव्हिजनसाठी सीरियल्स लिहून अल्प श्रमात भरपूर कमाई करण्याचा मोह बहुसंख्य लेखकांना खुणावत असतानाही कादंबरी लेखनाचा वेळखाऊ आणि परिश्रम प्रतिभेची कसोटी पाहणारा प्रकार हाताळण्याची चिकाटी टिकवून धरण्यास कॉमनवेल्थ देशातील लेखकांना बळ देण्याचे काम या पुरस्काराने नेटाने चालवले आहे हे मान्य करायला हवे.




## प्रिय वाचकमित्रहो...

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरु राहील.

वेळ - सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

**नवे कोरे**

# स्वरगंगेच्या काठावरती

**सदानंद गोखले**

**किंमत १५० रु. पोस्टेज २५ रु.**




**‘स्वरगंगेच्या काठावरती’**
**म्हणजे खरं तर स्वरात चिंब भिजणं!**

कुंदनलाल सैगल ते उदित नारायण
आणि नूरजहाँ ते श्रेया घोषाल
यांचा हा सांगितीक प्रवास.
सैगलचा खर्ज, किशोरचं यॉडलिंग,
दु:खाला स्वर देणारा तलत, यांचं स्मरण.
नूरजहाँच्या स्वरांची खनक, शमशादचा नसल टोन,
लताचा गंधार आणि गीता दत्तचा रोमान्स फुलवणारा
अन् दर्द जागवणारा स्वर.
स्वरांना शब्दांनी दिलेली ही मानवंदना!

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# स्वागत

## प्रकाशनविश्व २००८

मराठीतला ग्रंथव्यवहार सध्या ऐन बहरात आला आहे. जागोजाग भरणारी साहित्य संमेलने, गावोगाव साजरे होणारे ग्रंथमहोत्सव, अक्षरधारा-शुभमसाहित्य-साहित्यदर्शन, पाटील एंटरप्रायझेस वगैरे संस्थांच्या विद्यमाने लहानमोठ्या शहरात भरणारी ग्रंथप्रदर्शने, नवनवी निघणारी ग्रंथदालने, नानाविध पुरस्कारांच्या घोषणा, शासनातर्फे खडूफळा योजना- निरंतर शिक्षण योजना वगैरे योजनांखाली होणारी पुस्तक खरेदी, ग्रंथालय वाचनालयांच्या वाढलेल्या ग्रँट्स अशा निरनिराळ्या उपक्रमांद्वारे पुस्तकांचा होणारा उठाव - दोनतीनशे कोटींपेक्षाही जास्त होत असावा असा अंदाज आहे. नवनव्या प्रकाशन संस्था निघत आहेत. मराठीत प्रथमच ग्रंथलेखन - प्रकाशन हा हौसेचा मामला न राहता, व्यावसायिक स्वरूप धारण करून लागला आहे ग्रंथ प्रकाशन आणि ग्रंथवितरण हे व्यावसायिक पातळीवर होऊ लागले आहे, आणि त्यासाठी कोट्यवधींची गुंतवणूक करायला बडे उद्योगपतीही पुढे येऊ लागले आहेत. परदेशी प्रकाशनसंस्था प्रादेशिक भाषांमध्ये, मराठीमध्ये आपली पुस्तके काढायला उत्सुक आहेत. त्यासाठी आपल्या पुस्तकांच्या मजकुरात भारतीयांना आकृष्ट करील असा फेरबदल करायलाही सिद्ध आहेत. एनिड ब्लायटनच्या दि फेमस फाइव्ह आणि सिक्रेट सेव्हन या मालिकां मध्ये भारतीय मुलामुलींना स्थान देण्यात आले आहे. लँडमार्क, क्रॉसवर्ड, ओडिसी यासारख्या ग्रंथदालनांची शहरोशहरी उभारणी होत आहे. परदेशी प्रकाशन संस्था भारतात आउटसोर्सिंग करण्यावर भर देत आहेत.

...या विविध घटनांमुळे ग्रंथव्यवहाराशी निगडित असणाऱ्या सर्व घटकांची अद्ययावत माहिती व्यावसायिकांना सहजपणे उपलब्ध होण्याची गरज भासते आहे. ही गरज पूर्ण करण्याचा उद्देश समोर ठेवून मराठीतील एक पत्रकार, जळगाव सकाळ आवृत्तीचे माजी संपादक मोहन वैद्य हे गेली आठ वर्षे 'प्रकाशनविश्व' हा वार्षिक संदर्भ ग्रंथ प्रकाशित करीत आहेत. हा संदर्भग्रंथ जवळ ठेवला तर

मराठीतील नामवंत आणि नवोदित साहित्यिक, चित्रकार, अनुवादक, प्रकाशक, ग्रंथ विक्रेते, ग्रंथालये, नियतकालिके व दैनिके यांचे पत्ते सहजपणे आपल्याला मिळू शकतील. यंदाचे हे वार्षिक ८३२ पृष्ठांचे आहे आणि त्यात सुमारे अडीचशे जाहिराती आहेत. आर्टपेपरवर बहुरंगी छपाई असलेली ५६ पृष्ठेही त्यात आहेत. यावरून या वार्षिकाला प्रकाशकांकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसादाची खात्री पटेल.

यंदाच्या वार्षिकातील डिजिटल पुस्तके, फ्रँकफर्ट बुक फेअर, पुस्तकाचे बाइंडिंग करताना लक्षात ठेवावयाच्या विशेष बाबी, वेब पब्लिशिंग आणि अमेरिकेतील ब्ल्यू प्लॅनेट सोल्युशनचे मराठी डॉट कॉम, कथाकथन- काव्यदर्शन- एकपात्री प्रयोग करणारे कलावंत व लेखक वक्ते यांची सूची वगैरे माहितीही कालोचित आणि उपयुक्त वाटेल अशी आहे. हौशी लेखकांना आपले पुस्तक प्रकाशित करायची इच्छा असते. स्वत: काही गुंतवणूक करायची तयारी असेल तर काही प्रकाशनसंस्था त्यांची पुस्तके काढण्यास मदत करतात अशा संस्थांच्या जाहिरातीही यात आहेत.

मराठीतील वृत्तपत्रांची, नियतकालिकांची आणि दिवाळी अंकाची संख्या ७००पेक्षाही जास्त आहे. त्यांचे पत्ते, फोन क्रमांक व संपादक वगैरे माहिती यात एकत्र मिळते. पुस्तकांचे विक्रेते व ग्रंथदालने यांची संख्याही किती मोठी आहे हे या वार्षिकावरून लक्षात येते. पुण्यात १५० पुस्तक विक्रेते आहेत. मुंबईत ५५, ठाणे जिल्ह्यात ४०, कोल्हापूर जिल्ह्यात ४०, नाशिक ३६, नागपूर ३५, जळगाव २५, औरंगाबाद २५, तर काही जिल्ह्यात दहापेक्षाही कमी विक्रेते आहेत. तरीही पुस्तकांची विक्री कमीच आहे कारण नवीन पुस्तके या विक्रेत्यांपर्यंत पोचतच नाहीत.. ग्रंथव्यवहार वाढवायचा असेल तर विक्रेत्यांची क्षमता आणि नवी पुस्तके वाचकांपर्यंत पोचवण्याची यंत्रणा वृद्धिगत व्हायला हवी.

या वार्षिकात गेल्या वर्षात मराठीत निघालेल्या पुस्तकांची यादीही देण्यात आली आहे. कादंबऱ्या २००, कथासंग्रह १५०, ललित गद्य १००, आत्मचरित्रे-चरित्रे १००, समीक्षा व वैचारिक ग्रंथ ७०, आरोग्यविषयक पुस्तके ६०, व्यक्तिमत्त्व विकास ४०, बालवाङ्मय १००, धार्मिक ५०, कविता संग्रह ८०, नाटक-एकांकिका ४०, संकीर्ण ३००, अशी बाराशेच्या घरात पुस्तकांची संख्या जाते. लेखकांच्या यादीत १५०० नावे आहेत. प्रकाशकांची संख्या ४००वर आहे... साहिजिकच ग्रंथव्यवहाराशी संबंधित विविध घटकांशी संपर्क साधण्यासाठी हे वार्षिक फारच उपयुक्त वाटेल. मोहन वैद्य यांनी वर्षानुवर्षे एकांड्या शिलेदाराप्रमाणे हे वार्षिक चालवले आहे आणि दरवर्षी माहितीत भर घालण्याचा वा पत्त्यातील बदल, फोन नंबरातील बदल हेही देण्याचा कटाक्ष बाळगला आहे. एखाद्या साहित्य संस्थेलाही न जमलेले हे काम मोहन वैद्य कसोशीने उत्तम प्रकारे पार पाडत आहेत. ही मराठी भाषेची एक मोठीच सेवा म्हणून गौरवास्पद आहे. (प्रकाशनविश्व. सी-१२, हर्षदा गार्डन, महागणेश कॉलनी, पौड रोड, पुणे ३८. फोन - ९४२२० ८८५७८.)

**शंकर सारडा**



# साहित्यवार्ता

*** देहूत आंतरराष्ट्रीय गाथा पारायण**

श्री संत तुकाराम महाराज यांच्या जन्म चतु:शताब्दी वर्षानिमित्त अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने या वर्षी आंतरराष्ट्रीय गाथा पारायण सोहळा २१ ते २८ डिसेंबर दरम्यान देहू येथे आयोजित करण्यात येत आहे.

संत तुकाराम महाराज यांचे जन्मचतु:शताब्दी वर्ष संपूर्ण राज्यात साजरे होत आहे. अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने आंतरराष्ट्रीय सोहळा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या सोहळ्यात एक लाख चार हजार चारशे लोक गाथा पारायणास बसणार आहेत. विविध राज्यांसह परदेशी नागरिकही यामध्ये सहभागी होणार आहेत. त्यासाठी चार भव्य मंडप उभारण्यात येणार आहेत. पहिल्या मंडपात गाथा पारायणासाठी व्यवस्था असेल. संत तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यांची नावे देण्यात येणार असून, या मंडपाला चौदा द्वारे असणार आहेत. दुसऱ्या मंडपात गाथा भजन होणार आहे. एकाच वेळी चार हजार टाळकरी या मंडपात भजन करतील.

साखळी पद्धतीने दर तीन तासांनी चारशे ते पाचशे लोकांचा समूह यात सहभागी होईल. तिसऱ्या मंडपात राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ज्यांना गाथांचे वाचन करता येणार नाही, अशा भाविकांसाठी स्वतंत्र अखंड नामस्मरण मंडप उभारण्यात येणार आहे. तर चौथ्या मंडपात संत तुकाराम महाराजांच्या जीवनावरील प्रसंग छायाचित्रांच्या रूपाने दाखविण्यात येणार आहेत.

वारकरी मंडळाचे प्रदेशाध्यक्ष संभाजी महाराज देहूकर, माधव महाराज नामदास, सिद्धेश्वर महाराज गोळेगावकर, भानुदास महाराज यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या सोहळ्याची माहिती देताना श्री. बोधले म्हणाले, ''या वर्षभर सप्ताह, गाथा पारायण आयोजित करणाऱ्या भाविकांचा या वेळी सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. सोहळ्यात सहभागी होण्यासाठी भाविकांकडून कोणतेही शुल्क घेण्यात येणार नाही, मात्र पारायणासाठी भाविकांनी स्वत:ची गाथा आणावी.''

*** शासनाच्या अनुदानातून ९० हजार गाथांची विक्री**

संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या दिवशी भाविकांना सवलतीच्या दरात गाथा उपलब्ध करून देण्यात आली.

युती शासनाने गाथा छपाईसाठी २५ लाख रुपयांचे अनुदान दिले होते. त्यातून आतापर्यंत ९० हजार भाविकांना ५० रुपयांना गाथा देण्यात आली. गाथाविक्रीतून संस्थानला ८० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. जन्म चतु:शताब्दी वर्षामुळे गावोगावी गाथा पारायण होत आहे. त्यामुळे संस्थानने भाविकांना गाथा उपलब्ध करून दिल्या आहेत. सध्या आठ हजार गाथा उपलब्ध आहेत. रथासाठी भाविकांकडून १५५ किलो चांदी आणि २४ लाख रुपयांची देणगी मिळाली. पालखी सोहळा प्रस्थानाच्या दिवशी देहूत वृक्षारोपण करण्यात आले. तुकाराम महाराजांची पर्यावरणाविषयी असलेली आत्मीयता आणि जन्मचतु:शताब्दी वर्षाच्या निमित्ताने विविध प्रकारची ४०० झाडे लावली आहेत, असे अध्यक्ष बापूसाहेब मोरे यांनी सांगितले.

*** 'एकपात्री नाट्यस्पर्धे'त अनघा कुलकर्णी यांना प्रथम क्रमांक**

'नाट्य-चित्र' कला अकादमीतर्फे आयोजित 'एकपात्री नाट्य स्पर्धे'त प्रथम क्रमांक अनघा कुलकर्णी, द्वितीय क्रमांक विश्वास रांजणे, तृतीय क्रमांक वसुंधरा कुलकर्णी यांनी पटकवला. त्यांना प्रमोद आडकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीपक देशपांडे होते.

अकादमीचे अध्यक्ष सूर्यकांत तिवडे, विलास वाडेकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि.भा. देशपांडे उपस्थित होते. दीपक देशपांडे म्हणाले, ''एकपात्री कलाकारांना प्रत्येक वेळी वेगळा प्रेक्षकवर्ग लागतो. त्यामुळे त्यांना दर वेळी प्रेक्षकांसमोर परीक्षा द्यावी लागते. स्वत:चा प्रेक्षक वर्ग तयार करावा लागतो. एकपात्री कलाकाराने स्वत:च्या भाषेतील, मातीतील विषय, प्रसंग सादर केले पाहिजेत.''

दीपक देशपांडे यांना नुकतेच 'हास्यसम्राट' पुरस्काराने गौरविण्यात आले, त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक तिवडे यांनी केले. सूत्रसंचालन उद्धव कानडे यांनी केले. निमिष तोटे यांनी आभार मानले.

*** 'गोष्टी जन्मांतरीच्या'चे प्रकाशन**

शब्द प्रकाशनतर्फे सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर यांच्या 'गोष्टी जन्मांतरीच्या'

या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र पिंगे अध्यक्षस्थानी होते. 'गरवारे बालभवन'च्या संचालिका शोभा भागवत या वेळी उपस्थित होत्या.

प्रभावळकर म्हणाले, ''आम्ही कलाकार भूमिका करतो म्हणजे दुसऱ्याचे आयुष्य जगत असतो. रेणूताईंसारखी माणसे दुसऱ्यांसाठी जगत असतात. कोलमडलेल्या माणसांना उभे करणे हे मोठे काम आहे. मूल्यांचा ऱ्हास होणाऱ्या जगात माणसे आत्मकेंद्रित होत असताना रेणूताईंच्या कामाचे महत्त्व कळते.''

पिंगे म्हणाले, ''पूर्वी चांगले वाचले तर लोक ती गोष्ट आवर्जून इतरांना सांगायचे, इतकेच नव्हे तर लेखक आणि कवींना आपली प्रतिक्रिया कळवायचे. सध्याच्या काळात कोणीच कोणाला चांगले म्हणत नाही आणि कौतुक ही गोष्ट दुरापास्त झाली आहे. कार्यकर्त्या रेणूताईंचे लेखन निश्चितच कौतुकास पात्र आहे.''

गावस्कर म्हणाल्या, ''कुणालाही उपदेश, शिकवणी आवडत नाही. गोष्ट सांगितली की माणसे ऐकतात. गोष्ट ऐकल्यावर त्यातून काय शिकला असे मुलांना विचारू नये. मग गोष्टही नको आणि तात्पर्यदेखील नको, असेच मुलांना वाटू लागते. गोष्ट सांगण्याची कला अवगत असली तरी त्यासाठी सातत्याने अभ्यास आवश्यक असतो. मुलांनी दाखविलेल्या वाटेनेच माझ्या गोष्टींची वाटचाल झाली.''

*** 'क्रीडागाथा' आत्मचरित्र प्रकाशित**

''आज विज्ञानाच्या प्रगतीमुळे खेळाडूंना आधुनिक सुविधा मिळत आहेत. संधीचे व्यासपीठही उपलब्ध होत आहे. नंदू नाटेकर यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर कारकीर्द घडविली तेव्हा असे काही नव्हते. खेळावरील प्रेम हेच त्यांचे अस्त्र होते. त्यामुळेच त्यांनी केलेली अंतुलनीय वाटचाल अविस्मरणीय आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

'क्रीडागाथा' या नंदू नाटेकरांच्या आत्मचरित्राचे त्यांनी प्रकाशन केले. ज्येष्ठ कसोटीपटू व उद्योगपती माधवराव आपटे, समकालीन बॅडमिंटनपटू शिरीष नाडकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. माशेलकर पुढे म्हणाले, ''विज्ञानाच्या प्रगतीमुळे खेळाडूंना ग्रॅफाईट, कार्बनच्या वेगवान रॅकेट मिळत आहेत. 'आयपीएल'च्या रूपाने संधीचे भव्य व्यासपीठ आणि त्या जोडीला उदंड पैसाही मिळत आहे. आज खेळात कारकीर्द करणे सोपे आहे. नंदू नाटेकरांसाठी मात्र एकेकाळी 'फंड' गोळा करावा लागत होता. अशा वेळी त्यांनी वाटचाल केली आणि आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले. त्यामुळेच ते महान खेळाडूपेक्षाही मोठे (ग्रेटर दॅन ग्रेटेस्ट, बेटर दॅन बेस्ट) आहेत.''

नंदू नाटेकरांची 'क्रीडागाथा' क्रीडाप्रेमींच्या हृदयात घर करून राहील असे माधवराव आपटे यांनी सांगितले.

नंदू नाटेकरांच्या साथीत खेळलेले शिरीष नाडकर्णी यांनी नाटेकरांच्या सामन्यांचे वर्णन करताना प्रेक्षकांना जागीच खिळवून ठेवले.

नाटेकर यांनी मनोगत व्यक्त केले. ''गोल्फ छंद जोपासता यावा म्हणून पायातील ताकद कायम राहू दे. संगीताचा आस्वाद घेता यावा म्हणून कान चांगले राहू दे. इतकेच मागणे देवाकडे आहे.''

*** जॉर्ज व्हाईटसाईड्स यांचे व्याख्यान**

''अति सूक्ष्मपदार्थांचा वेध घेणे आणि त्यापासून नव्या पदार्थांच्या बांधणीची शक्यता तपासणे हे रसायनशास्त्राच्या विकासातील मुख्य सूत्र राहिले आहे,'' असे विचार ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि हार्वर्ड विद्यापीठातील सन्माननीय प्राध्यापक जॉर्ज व्हाईटसाईड्स यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत (एनसीएल) 'डॉ. रघुनाथ माशेलकर न्यास व्याख्यानमालेत' त्यांचे भाषण झाले. या प्रसंगी 'एनसीएल'चे संचालक डॉ. एस. शिवराम उपस्थित होते.

प्रा. व्हाईटसाईड्स म्हणाले, ''रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र यांचा विकास दोन टप्प्यांमध्ये झाला आहे. पदार्थांच्या अतिसूक्ष्म कणांचा वेध घेत या शास्त्रांच्या विकासाला सुरुवात झाली. रेणू, अणू त्याचेही विघटन करून त्यातील सूक्ष्म कणांचे अस्तित्व शोधून शास्त्रज्ञांनी पदार्थांचे खरे स्वरूप ओळखण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांना यश मिळाल्याने नव्या पदार्थांची निर्मिती करणे शक्य झाले. दुसऱ्या टप्प्यामध्ये शास्त्रज्ञांनी पदार्थांचे स्वरूप व गुणधर्म ओळखून नव्या पदार्थांची बांधणी सुरू केली. ट्रान्झिटर, कॅपॅसिटर यांची निर्मिती यामुळे शक्य झाली. प्रगत तंत्रज्ञानाचे आजचे चित्र या संशोधनामुळेच आहे.''

सूक्ष्मतेचा वेध आणि नवनिर्मिती यांचे महत्त्व सांगताना ते म्हणाले, ''रेणूंच्या एकत्रीकरणामुळेच पेशींची निर्मिती होते. अशा पेशींच्या एकत्रीकरणातूनच शरीराची निर्मिती होते.''

प्रा. व्हाईटसाईड्स यांनी ९०० हून अधिक पुस्तकांचे लिखाण केले असून, त्यांच्या नावावर ५०पेक्षा अधिक पेटंट आहेत. २० अब्ज डॉलरची उलाढाल असणाऱ्या बारा कंपन्यांच्या स्थापनेत त्यांचा सहभाग आहे.

*** कलंदर सुरांच्या स्मृतींची मैफल**

''स्वर-तालाशिवाय सुरेल संगीताची कल्पना शक्य नसते, त्याचप्रमाणे आनंददायी जीवनासाठी संवादरूपी स्वर-तालाची गरज असते,'' असे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांनी केले.

क्रिएटिव्ह कन्सेप्ट्स व मनकर्णिका पब्लिकेशनच्या वतीने स्वर-तालाची मैफल आयोजित केली होती. चिंचवडमधील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा कार्यक्रम झाला. महापौर अपर्णा डोके, प्रसिद्ध तबलावादक ओंकार गुलवाडी, गायिका अंजली मालकर, वसुंधरा उत्सवाचे संस्थापक सुभाषचंद्र डांगे आदी उपस्थित होते. मालकर म्हणाले, ''गायन व तबलावादनाच्या प्रशिक्षणासाठी असलेल्या सीडीचा उपयोग

नवोदितांनी करावा. भौतिक समृद्धीबरोबर सांस्कृतिक वृद्धीसाठी समाजातील सर्व स्तरांतून मदत व्हावी. अभिजात संगीताची साधना करणाऱ्यांना समाजाने आदर्शस्थानी ठेवावे.''

या वेळी तबल्याचे प्रशिक्षण देणाऱ्या 'लय गीता' या व्हिडिओ सीडीचे, पत्रकार कै. संजय संगवई यांच्या वैचारिक मुलाखतपर व समीक्षात्मक लेखांच्या 'कलंदर सुरांच्या स्मृतींची मैफल' या सांगीतिक पुस्तकाचे व गायनाचे प्रशिक्षण देणाऱ्या 'स्वरगीता' या व्हिसीडीचे प्रकाशन झाले. पद्माकर कुलकर्णी, बाजीराव सोनवणे, नारायण जगताप, श्रीपाद गोडसे यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. गायक राजेश दातार यांनी भक्तिगीत, चतरंग, देस रागातील तराणा, भोजपुरी भजन, गजल, कजरी इत्यादी गीतप्रकार सादर केले.

### * डॉ. भोईटे यांची निवड

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांची 'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स ॲन्ड रिसर्च' या संस्थेवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. डॉ. भोईटे हे समाजशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत.

### * हास्य क्लबमुळे हृदयरोगावर नियंत्रण शक्य

''बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव, वाढते ताणतणाव आणि व्यसनाधीनता या चतु:सूत्रीमुळे देशात हृदयरोगाच्या रुग्णांची संध्या वाढत आहे. हास्य क्लबच्या माध्यमातून यावर नियंत्रण ठेवता येईल,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य यांनी केले.

'चैतन्य हास्य क्लब' आणि 'निरंजन मेडिको' यांनी 'मधुमेह व जीवनशैली आणि हृदयविकार मार्गदर्शन शिबिर' आयोजित केले होते.

डॉ. वैद्य म्हणाले, ''आनुवंशिकता आणि बदलती जीवनशैली यांच्यातील विसंवादातून हृदयरोग होतो. हा रोग टाळता येतो. त्यासाठी जीवनशैली चांगली ठेवणे आवश्यक आहे. देशात या रोगाचे प्रमाण वाढत आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि रक्तातील चरबीचे प्रमाण (कोलेस्टेरॉल) हे धोकादायक घटक आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संतुलित आहाराची गरज आहे. पालेभाज्या आणि फळे यांचा आहारात समावेश असावा. लहान वयातच हृदयरोग होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी धूम्रपान बंदीची मोहीम सुरू केली पाहिजे.''

डॉ. मदन फडणीस म्हणाले, ''शरीरातील इन्शुलिनच्या अकार्यक्षमतेने रक्तातील साखर वापरली जात नाही. त्यामुळे ती साखर रक्तात साठून राहते. त्यातून मधुमेह होतो. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी साखरेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असे. त्यासाठी आहारावर नियंत्रण पाहिजे. त्यात बदल झाल्यास त्याचा दूरगामी परिणाम

शरीरावर होतो.''

अभय कुलकर्णी म्हणाले, ''आधुनिक समाजव्यवस्थेत अनेक सुखसुविधा उपलब्ध आहेत. त्यातून समाधान मिळते का, याचे उत्तर नकारार्थी आहे.''

निबंध स्पर्धेत चंदा लोया यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. विमल खोचणे यांनी दुसरे, तर मानसी कुलकर्णी यांनी तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळविले.

विठ्ठल काटे यांनी प्रास्ताविक केले. चैतन्य हास्य क्लबचे कार्यकारी संयोजक मकरंद टिल्लू यांनी सूत्रसंचालन केले.

*** 'दिवा'च्या सर्वोत्कृष्ट वाचकस्पर्धेत अमरावतीला मानाचे पान**

दिवाळी अंक वार्षिकाचे 'सर्वोत्कृष्ट वाचक' ठरविण्यासाठी मुंबईच्या 'दिवा' प्रतिष्ठानने दिवाळी अंक वाचक स्पर्धेचा मौलिक उपक्रम गेल्या काही वर्षांपासून सुरू केलेला आहे. प्रस्तुत उपक्रमाचे विभाजन स्पर्धा क्र. १, २ व ३ मध्ये करण्यात येते.

यावर्षी 'दिवा प्रतिष्ठान व पितांबरी'च्या वतीने घेण्यात आलेल्या 'दिवा' स्पर्धेत सर्वोत्कृष्ट वाचक म्हणून प्रथम पारितोषिकासाठी अमरावतीचे ज्येष्ठ साहित्यिक राम देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट वाचक म्हणून प्रथमच अमरावतीच्या साहित्यिकाचा नंबर आला. स्थानिक 'निस्यंद' या साहित्य संस्थेच्या सदस्यांनी विजेत्याचे अभिनंदन केले.

*** 'हाल्या हाल्या दुधू दे'**

विदर्भ - मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. अस्मानी-सुलतानी संकटांनी त्रस्त झालेला या कादंबरीचा नायक 'न्यानबा' आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आजच्या शेतकऱ्यांचं प्रतिनिधित्व करतो. शेतकऱ्यांच्या मूलगामी समस्यांचं चित्रण करणारी ही कादंबरी ग्रामीण साहित्यात 'मैलाचा दगड' म्हणून गणली जाते.

१९८५ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने आयोजिलेल्या 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी' या स्पर्धात्मक उपक्रमात ही कादंबरी निवडली गेली... आकाशवाणी नागपूरवरून त्यावेळी या कादंबरीचे नाट्यरूपांतर प्रसारित झाले.

२००७-०८ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम. ए. भाग-२ साठी या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश केला गेला आहे. अमरावतीच्या बजाज पब्लिकेशन्सने या कादंबरीची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली आहे.

*** 'आम्ही पाचपुते' नाटकांचे बुकिंग वाढले**

निदर्शने करूनही नाट्यकर्मी आणि प्रेक्षक ऐकत नाहीत हे लक्षात आल्यावर नाट्यगृहांत बॉम्बस्फोट करून घबराट उडवून द्यायची आणि आपल्याला आक्षेपार्ह

वाटणारी नाटके बंद पाडायची खेळी 'आम्ही पाचपुते'च्या प्रयोगांच्या वेळी करण्यात आली.

'यदाकदाचित' या नाटकातील देवतांच्या विडंबनाचा मुद्दा उचलत त्याविरोधात तथाकथित धर्मवाद्यांनी मोहीम चालवली. हेच नाटक काही बदल करून 'आम्ही पाचपुते' या नावाने रंगभूमीवर आल्यावर पुन्हा त्यांनी उचल खाल्ली. वास्तविक, या नाटकात देवदेवतांच्या नावांचा उल्लेखच नसल्याने विडंबनाचा मुद्दा निकालात निघाला होता. तरीही काही लोकांनी जुनाच राग धगधगता ठेवून या नाटकाच्या वाशी आणि ठाण्यातील प्रयोगांच्यावेळी नाट्यगृहात बॉम्ब ठेवले. ठाणे नाट्यगृहातील बॉम्बस्फोटानंतर सनातन संस्थेच्या चार पूर्णवेळ कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली. या घटनेनंतर 'पाचपुते'चे प्रयोग बंद पडतील आणि नाटकधंद्यावर दहशतीच्या सावटामुळे दुष्परिणाम होतील, अशी भीती सर्व थरांतून व्यक्त होत होती. परंतु याआधीच्या बॉम्बस्फोट मालिकांतून झटपट सावरणाऱ्या मुंबईचे स्पिरिटच नाट्यरसिकांनी पुन्हा दाखवले आणि नाट्यगृहांवर गर्दी दिसू लागली.

'आम्ही पाचपुते'चे बुकिंग गेल्या काही दिवसांत तिपटीने वाढले आहे. २१ जून रोजी यशवंत नाट्यमंदिरात या नाटकाचा प्रयोग हाऊसफुल्ल झाला. या नाटकाचे आडवारचे प्रयोगही जोरात चालले आहेत. केवळ 'पाचपुते'च नव्हेत तर 'ए भाऊ, डोकं नको खाऊ', 'भैया हातपाय पसरी', 'जागो मोहन प्यारे', 'सारखं छातीत दुखतंय', 'कबड्डी कबड्डी', 'ग म भ न', 'अवघा रंग एकचि झाला' या नाटकांच्या उत्पन्नाचेही आकडे हुरूप वाढवणारे आहेत.

*** २७ हजार पोथ्यांचे सर्वेक्षण**

आनंदाश्रम संस्थेमार्फत दुर्मिळ पोथ्या आणि हस्तलिखितांचे 'डिजिटलायझेशन' करण्यात येणार आहे.

उच्च न्यायालयात वकिली करणाऱ्या ॲड. महादेव चिमणाजी आपटे यांनी आनंदाश्रम संस्थेची स्थापना केली. त्यांनी गावोगावी फिरून जुन्या पोथ्या आणि हस्तलिखिते जमा केली. १८८८ मध्ये त्यांनी आपली संपत्ती संस्थेला देणगी दिली. गेली एकशे वीस वर्षे पोथ्यांचे संकलन करणाऱ्या आनंदाश्रम संस्थेमध्ये 'राष्ट्रीय पांडुलिपी अभियान'ने (नॅशनल मॅन्युस्क्रिप्ट मिशन) दोन वर्षांपूर्वी हस्तलिखित सर्वेक्षण आणि दस्तऐवजीकरण केंद्राची मंजुरी दिली. संस्थेच्या संग्रहातील दुर्मिळ पोथ्या आणि हस्तलिखितांचे डिजिटलायझेशन करण्यात येणार आहे. संस्थेच्या विश्वस्त डॉ. सरोजा भाटे या प्रकल्पाच्या समन्वयक आहेत.

आनंदाश्रम संस्थेकडे शके १६०० ते १७०० च्या दरम्यानची दहा हजार हस्तलिखिते आहेत. संस्कृत, मराठी, हिंदी आणि गुजराती भाषांतील पोथ्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये तामीळ आणि तेलगू भाषांवरील ताडपत्रांवरील हस्तलिखितांचा समावेश आहे. एका दप्तरामध्ये दहा पोथ्या याप्रमाणे वेखंडाची पावडर आणि वाळवी लागू नये म्हणून कीटकनाशके लावून या पोथ्यांचे जतन केले

जाते. अलंकार साहित्य, वेद, उपनिषद, काव्य, महाकाव्य, काव्य-कथा, काव्य-नाटक, कोश, ज्योतिष, धर्मशास्त्र, स्मृती, नीती, न्याय, रामायण, महाभारत, गीता, भागवत, पुराण, मीमांसा, याज्ञिक, योगशास्त्र, वेदांत, वेदांग, व्याकरण, वैद्यक आणि स्तोत्र अशी पोथ्या आणि हस्तलिखितांची वर्गवारी करण्यात आली आहे. या प्रकल्पाविषयी माहिती देताना डॉ. भाटे म्हणाल्या, ''आनंदाश्रम संस्थेत पूर्वीपासून पोथ्या आणि हस्तलिखितांच्या जतनाचे काम सुरू आहे. येथील तसेच भारत इतिहास संशोधक मंडळ आणि व्यक्तिगत संग्रहातील पोथ्या आणि हस्तलिखितांचे सर्वेक्षण करण्यात आले. पोथ्यांचे विषयवार वर्गीकरण करून संगणकावर संकलित केलेली माहिती राष्ट्रीय पांडुलिपी अभियानाकडे पाठविण्यात आली आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहातील ३५ हजार पोथ्यांपैकी २७ हजार पोथ्यांच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. या दोन्ही संस्थांतील प्रत्येकी पाचशे याप्रमाणे एक हजार पोथ्यांचे डिजिटलायझेशन करण्याचे आश्वासन अभियानने दिले आहे.''

### * मोडी लिपीचे प्रशिक्षण

राज्य सरकारच्या पुराभिलेख संचालनालयाने सन २००३ पासून राज्यात आयोजित केलेल्या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गातून आतापर्यंत सुमारे तीन हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. आता ते उत्तम प्रकारे मोडी लिपीचे वाचन व प्रसार करीत आहेत. मृतप्राय झालेल्या मोडी लिपीच्या पुनरुज्जीवनास या उपक्रमाची फार मोठी मदत झाली आहे.

राज्य सरकारच्या मुंबई व पुणे येथील पुरालेखागारात मोडी लिपीतील अमाप कागदपत्रे आहेत, तसेच महाराष्ट्रातील शासकीय-निमशासकीय कार्यालयातही मोडी लिपीतील दस्तऐवज मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. हे दस्तऐवज वाचणारे आणि त्यांचे लिप्यंतर करणारे लोक आता उपलब्ध नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन पुराभिलेख संचालनालयाने मोडी लिपी प्रशिक्षणाचे वर्ग २००३ पासून सुरू केले आहेत. ३५ जिल्ह्यांपैकी २७ जिल्ह्यांत या वर्गांचे आयोजन झाले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत प्राथमिक शालान्त मोडी लिपीचे शिक्षण दिले जात असे; परंतु विद्यार्थ्यांवर दोन लिप्यांचा बोजा नको, या कारणास्तव आणि मुद्रण व्यवहारात मोडी लिपीचा वापर नसल्याने मोडी लिपीचे शिक्षण बंद झाले.

### * मराठीचे नवे पीएच.डी.

उज्ज्वला केशव सहाणे यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. प्रबंधाचा विषय- 'अनिल अवचट यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास' मार्गदर्शक प्रा. डॉ. कृष्णा किरवले.

अनिल भिकाजी उगले यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. प्रबंधाचा विषय - 'मराठी संज्ञाप्रवाही कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास (१९३९ ते

१९७०)’ मार्गदर्शक प्रा. डॉ. भास्कर शेळके.

*** महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कॉफी क्लब**

समाजाचे प्रबोधन करणे हा नाटकांचा प्रमुख हेतू आहे, असे मत ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ‘कॉफी क्लब’ या उपक्रमात व्यक्त केले.

कोल्हटकर म्हणाले, ‘‘मागे वळून पाहिले तर आयुष्यात कुठलीही खंत नाही. समाधानी जीवन जगत आहे. लेखकांचे शब्द, नटाचा अभिनय, रसिक प्रेक्षकांची आवड या तीन घटकांवर नाटक चालते. गडकरी, खाडिलकर यांनी समाजाच्या प्रबोधनासाठी नाटके लिहिली. नव्या पिढीने नाटकाची ही नाळ तोडू नये. नाटक हे मूळ गद्यच असते. ‘संगीत’ हे नाटकाचे विशेषण आहे. त्यामुळे नाटक लिहिल्यानंतर त्यात पद्याचा समावेश केला जातो. तेव्हा ते ‘संगीत नाटक’ म्हणून ओळखले जाते. गाण्यामुळे नाटक थांबते, तर ‘स्वगता’मुळे नाटक पुढे जाते.’’

या वेळी कोल्हटकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर, भालजी पेंढारकर, मामा पेंडसे यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा दिला.

*** शब्दांना न्याय देणं हेच गझल गायकाचं काम**

‘‘गीतांमधून एक विचार द्यायचा प्रयत्न होतो. हा विचार ज्या शब्दांतून व्यक्त होतात, त्या शब्दांना न्याय देणं हेच गझल गायकाचं काम असतं. त्यामुळे ही गझल ज्या भाषेत आहे त्या भाषेची सर्व वैशिष्ट्यं श्रोत्यांपर्यंत पोहोचवतानाच त्यातील शब्दांमागचा अर्थही पोहोचवणं हे आमचं काम आहे,’’ असे मत प्रसिद्ध गायक हरिहरन यांनी व्यक्त केले.

इव्हिनिंग वुइथ हरिहरन या कार्यक्रमाचे आयोजन एस. पब्लिकेशन ॲण्ड प्रमोशन लिमिटेडतर्फे करण्यात आले होते. हरिहरन यांनी या कार्यक्रमात ‘पत्ता पत्ता बुटा बुटा’ या गझलेसह गालिबच्या गझला पेश केल्या. या कार्यक्रमाला गानसरस्वती किशोरी आमोणकर आवर्जून उपस्थित होत्या. किरण शांताराम, पं. सतीश व्यास, रूपकुमार राठोड आदी उपस्थित होते.

उपस्थित श्रोत्यांविषयी हरिहरन म्हणाले की, ‘‘सगळे श्रोते तयारीचे होते. श्रोत्यांचे कान तयार असले की गायकाला हुरूप येतो. आपण केलेले प्रयोग श्रोत्यांपर्यंत पोहोचत आहेत आणि श्रोते योग्य ठिकाणी दाद देत आहेत हा अनुभव कलावंताला खूप सुखावून जातो. मी संगीताचा विद्यार्थी आहे. त्यामुळे सतत प्रयोग करणं मला आवडतं.’’

कर्नाटक शैलीचे गायक एचएएस मणी व श्रीमती अलमेलू यांचे पुत्र हरिहरन सुरांचा कान व गळा घेऊनच जन्माला आले. त्यांनी उस्ताद गुलाम मुस्तफा खान यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. १९९६ हे वर्ष त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. या वर्षी

लेझली लुईस यांच्याबरोबरचा त्यांचा 'कोलोनियल कझिन्स' हा अल्बम खूप गाजला. आशा भोसले यांच्याबरोबरही त्यांनी गायलेली गीते गाजली.

हरिहरन यांनी इलेक्ट्रिक गिटार व सारंगी यांची एकाच वेळी घेतलेली साथ हा या कार्यक्रमाचा विशेष होता. त्याबद्दल हरिहरन म्हणाले, ''गिटार हे हार्मनीचं प्रतीक आहे. गझलसाठी गिटार हिंदुस्थानी संगीताला नवीन नाही. बेगम अख्तर यांच्या काळातही त्यांनी गझलसाथीला गिटार वापरली होती. पाश्चात्त्य संगीत हे हार्मनीवर आधारित आहे. या हार्मनीसाठी गिटारीचं महत्त्व अधिक आहे. त्याचप्रमाणे सारंगीची साथ ही गझलसाठी उपयोगी पडते. या दोन्ही वाद्यांची टोनल क्वालिटी वेगळी आहे. मात्र ते हार्मनी या प्रकाराच्या हातात हात घालून गेल्यास त्यातून अप्रतिम नादमाधुर्य निर्माण होते.''

*** भाषा ही संस्कृतीची वाहक**

''कोणतीही भाषा ही त्या संस्कृतीची वाहक असते. भाषेमध्ये संस्कृती भिनलेली असल्याने एखाद्या व्यक्तीला भाषेचा अभिमान असणे किंवा तो स्वत:च्या भाषेबाबत भावुक असणे स्वाभाविक आहे,'' असे भाषासंशोधक आणि अभ्यासक प्रा. नरेंद्र साखळकर यांनी सांगितले.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत 'बोलींचे आणि भाषांचे जतन' या विषयावर बोलताना प्रा. साखळकर म्हणाले, ''कोणत्याही भाषेत एखादा शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग व्याकरणदृष्ट्या बरोबर असला, तरी तो सांस्कृतिकदृष्ट्या बरोबर असेलच असे नाही. त्यामुळे भाषा शिकताना त्या भाषेत गुंफलेली संस्कृती लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रदेशानुसार, जातीनुसार, धर्मानुसार प्रत्येक भाषेत अनेक बोलीभाषा असतात. परंतु या बोलीभाषा लिखित स्वरूपात नसल्याने त्या हळूहळू अस्तंगत होत आहेत. सांस्कृतिक समरूपीकरणाच्या नावाखाली मराठीतील अनेक बोलीभाषांना त्या अशुद्ध असल्याचा दर्जा दिला जातो. पण या भाषा अशुद्ध नसून मराठी भाषेचे पाईक आपापल्या परीने त्या बोलत असतात.''

कोकणी बोलीभाषेबद्दल ते म्हणाले, ''कोकणी ही मराठी भाषेतून जन्मलेली एक बोली आहे. केवळ राजकीय हेतूमुळे तिला वेगळे अस्तित्व देण्यात आले आहे. ती फक्त गोव्यातच नाही, तर महाराष्ट्राच्या किनारपट्टीलगतच्या अनेक भागांत थोड्याफार फरकासह बोलली जाते. अशा बोलीभाषांचे जतन करण्यासाठी दृक्‌श्राव्य माध्यमांचा प्रभावीपणे वापर करून घेतला पाहिजे. अन्यथा बोलीभाषांप्रमाणेच आपल्या राज्यभाषेचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता आहे.''

*** 'वारी : एक आनंदयात्रा'**

छायाचित्रामध्ये केवळ क्षण गोठविला जात नाही, तर छायाचित्र हा माणसाचा इतिहास असतो. 'वारी : एक आनंदयात्रा' या पुस्तकाकडे इतिहास, यात्रेचे कथन,

निव्वळ छायाचित्रे म्हणूनही पाहता येईल, असे मत ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी व्यक्त केले.

मनोविकास प्रकाशनतर्फे संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांचा समावेश असलेल्या 'वारी : एक आनंदयात्रा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर, महाराष्ट्र कल्चरल सेंटरचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे प्रमुख पाहुणे होते. या निमित्ताने भंडारे यांच्या छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ चित्रकार सुधीर पटवर्धन यांच्या हस्ते झाले.

डहाके म्हणाले, ''वारी च्या यात्रेचे कथन पुस्तकात आहे. वारकरी रस्त्यावर पायांनी लिहीत असतो. कदाचित या पायांनीच पांडुरंग भेटत असेल. वारीच्या प्रक्रियेप्रमाणेच ही छायाचित्रेदेखील परिपूर्ण नाहीत. ही छायाचित्रे टिपताना भंडारे यांच्या अंतर्मनातही वारी सुरू असते. वारी ही श्रद्धा की अंधश्रद्धा हे माहीत नाही; पण वारीची छायाचित्रे घटनेत दडलेले अर्थ उलगडण्यास मदत करतात. वाच्यार्थाच्या पलीकडे जाऊन व्यंग्यार्थाकडे नेत ही छायाचित्रे रसिकत्वाचा आनंद देतात.''

मालकर म्हणाले, ''वारीतील अमृतानुभव या पुस्तकात सुंदरपणे आला आहे. भंडारे यांनी भागवत परंपरा आणि पुरोगामी परंपरा याविषयी भाष्य केले आहे. वारी ही महाराष्ट्राची ओळख जगासमोर नेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल. विचार आणि छायाचित्रांविषयीची साक्षरता या दोन्ही दृष्टीने हे पुस्तक वेगळे ठरते.''

आगाशे म्हणाले, ''आपल्याकडे शब्दांच्या पलीकडचे बघण्याची साक्षरता आता कुठे येत आहे. चित्रात काय बघावं, याचे शिक्षण आपल्या औपचारिक शिक्षणात मिळत नाही. ही त्रुटी भंडारे यांचे पुस्तक भरून काढत आहे.'' भंडारे म्हणाले, ''वारीपरंपरेच्या निमित्ताने आकर्षित करणारं माणसांचं जगणं छायाचित्रांतून टिपलं आहे.'' प्रकाशक पाटकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमोद काळे यांनी सूत्रसंचालन केले.

*** 'कुमारकोश' निर्मिती**

कुमारवयीन विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेची पूर्ती करण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ' जीवसृष्टी - पर्यावरण कोश तयार करीत आहे. मंडळाच्या 'कुमारकोश' प्रकल्पाचाच हा एक भाग आहे.

'जीवसृष्टी - पर्यावरण कोश' प्रकल्पासाठी संशोधक, वैज्ञानिक, अभ्यासक यांचे स्वतंत्र संपादक मंडळ नेमले आहे.

डॉ. वाड म्हणाल्या, ''जीवसृष्टी - पर्यावरण कोश' हा प्रकल्प एकूण तीन खंडांचा असून, प्रत्येक खंड ३५० पृष्ठांचा असेल. सध्याचे युग जैवतंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे भविष्यकाळातही या विषयातील संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे आणि पर्यावरणाचा विषय जगातील प्रत्येक देशाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंतच्या वयोगटासाठी हा कोश उपयुक्त असेल. रंगीत चित्रे आणि अद्ययावत माहितीने तो परिपूर्ण असेल.''

कोशाचे मुख्य समन्वयक डॉ. हेमचंद्र प्रधान म्हणाले, ''विश्वकोश मंडळातर्फे 'कुमार कोश' प्रकल्पांतर्गत बारा खंड प्रकाशित करण्यात येणार आहेत. त्यातील दोन खंड विज्ञान विषयाला वाहिलेले असतील. पहिला खंड 'जीवसृष्टी - पर्यावरण' तर दुसरा खंड 'भौतिकशास्त्र - तंत्रज्ञान' या विषयांवर आधारित आहे.

जयकुमार मगर, गोविंद फडके, अ. ना. ठाकूर, डॉ. शशिकांत प्रधान, मोहन मध्वण्णा, राजा ढेपे, डॉ. सु. र. देशपांडे, माधवराव चौंडे, नरेंद्र देशमुख, विजय लाळे तसेच सहायिका मनीषा कुऱ्हाडे, दीप्ती देशमुख आदींचा त्यात सहभाग आहे.

या खंडात पक्षी, प्राणी, फुले, फळे, वनस्पती, सूक्ष्म जीव, कीटक तसेच जीवशास्त्रातील अन्य महत्त्वाच्या विषयांच्या नोंदी असतील. पर्यावरण म्हणजे काय, त्याचे घटक कोणते, पर्यावरणसंतुलनाची आवश्यकता, प्रदूषणाचे परिणाम, प्रदूषक घटक, नियंत्रणाचे प्रयत्न अशा अनेक विषयांचा समावेश कोशात असेल.

*** 'गदिमा' स्मारकाचे उद्‌घाटन**

''आटपाडी तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या साहित्यिकांच्या स्मारकास निधी कमी पडू देणार नाही,'' अशी ग्वाही पालकमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी शेटफळे (ता. आटपाडी) येथे ग. दि. माडगूळकर स्मारकाच्या उद्‌घाटन प्रसंगी दिली.

डॉ. कदम म्हणाले, ''आटपाडी येथे ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, डॉ. शंकरराव खरात यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुसज्ज नाट्यगृह उभारण्यात येणार आहे. ही सर्व कामे सध्याच्या स्मारकाचा भाग म्हणूनच तातडीने करण्यात येतील.'' अर्थमंत्री जयंत पाटील म्हणाले, ''गदिमा स्मारकाच्या निमित्ताने गेल्या अनेक वर्षांची मागणी पूर्ण होत आहे. गदिमांच्या स्मृती केवळ स्मारकाच्या रूपानेच राहणार नाहीत, तर त्यांच्या लेखन कर्तृत्वामुळे मराठी माणसाच्या मनात सदैव राहणार आहेत.''

*** 'चैतन्ययात्री' पुस्तकाचे प्रकाशन**

''ज्ञान आणि अध्यात्माची सांगड घातल्यास शास्त्राची निर्मिती होते. त्यामुळे ज्ञानाला अध्यात्माची जोड आवश्यक आहे,'' असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी रमेश पाटीललिखित डॉ. एम. कटककर यांच्या 'चैतन्ययात्री' पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

सुरेशचंद्र पाध्ये, डॉ. मो. स. गोसावी, डॉ. कटककर, उत्कर्ष प्रकाशनचे सुधाकर जोशी, चंद्रकांत शेवाळे या वेळी उपस्थित होते.

विज्ञान म्हणजे भविष्याचा वेध घेणारे शास्त्र आहे, असे सांगून डॉ. भटकर म्हणाले, ''आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे गरजेचे आहे. त्यासाठी केवळ विज्ञान पुरेसे नाही. त्याला अध्यात्माचाही अभ्यास असायला पाहिजे.''

डॉ. गोसावी म्हणाले, ''समाजातील सध्याची ताणतणावाची परिस्थिती लक्षात घेता डॉ. कटककरांचे कार्य सर्व स्तरांपर्यंत पोचणे आवश्यक आहे.''

### * डॉ. कोटणीस यांची पत्रे पुराभिलेख विभागाकडे

स्वातंत्र्यपूर्व काळात चीनमध्ये सप्टेंबर १९३८ ते डिसेंबर १९४२ या कालावधीत गेलेल्या पाच सदस्यांच्या भारतीय वैद्यकीय पथकातील डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांनी चीनमधून आपल्या कुटुंबीयांना पाठविलेल्या पत्रांचा अमोल ऐतिहासिक ठेवा २७ जून रोजी राज्य सरकारच्या पुराभिलेख संचालनालयाकडे सोपविण्यात आला. दिवंगत द्वारकानाथ कोटणीस यांच्या वृद्ध भगिनी मनोरमाताई आणि वत्सलाताई कोटणीस; तसेच पुतणी डॉ. सुमंगला कोटणीस-बोरकर यांनी इंग्रजी आणि मराठी भाषेतील साठ पत्रे सुपूर्द केली.

### * यशवंतराव चव्हाण स्मृतिग्रंथ

''यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे पितामह. त्यांनी दाखविलेल्या मार्गावरच आम्ही वाटचाल केली. यापुढील राजकीय नेते या मार्गाने जातील की नाही, याचा शोध घेण्याची वेळ आली आहे,'' असे प्रतिपादन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

नगर येथील 'यशवंतराव चव्हाण व्यासपीठ'तर्फे 'युगप्रवर्तक यशवंतराव' या स्मृतिग्रंथावर परिसंवाद आयोजित केला गेला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार होते. उल्हास पवार, 'वनराई'चे अध्यक्ष डॉ. मोहन धारिया, डॉ. मा. प. मंगुडकर, प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, 'व्यासपीठ'चे अध्यक्ष रामनाथ वाघ या प्रसंगी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर महाराष्ट्राला ऋषितुल्य नेता मिळाला नाही. यापुढे मिळेल अशी शक्यताही नाही. यशवंतरावांनी दूरदृष्टीने केलेले कार्य पुढील पिढी पुढे नेईल, याबद्दल शंका आहे. 'युगप्रवर्तक यशवंतराव' हा स्मृतिग्रंथ, भविष्यातील राजकीय नेतृत्वाने कसे कार्य करावे यासाठी मार्गदर्शक ठरेल.''

उल्हास पवार म्हणाले, ''सत्तेच्या उतरंडीमध्ये समाजातील शेवटच्या घटकाचाही समावेश करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी अनेक कार्यकर्त्यांना बळ दिले. त्यामुळे जिल्हा पातळीवरही नेतृत्व निर्माण होऊ शकले, आज भाषावाद, प्रदेशवाद असे प्रश्न निर्माण होताना यशवंतराव चव्हाण यांचे विचार मार्गदर्शक आहेत.''

मंगुडकर म्हणाले, ''यशवंतरावांनी नेतृत्वाचा केंद्रबिंदू शहरी मध्यमवर्गीयांकडून ग्रामीण भागाकडे आणला.''

### * देगलूरकर-औसेकर यांच्या 'डीव्हीडी'चे प्रकाशन

भागवत कथा आणि चक्री भजन या परंपरेतील दिग्गजांना ऐकण्याचा दुर्मिळ योग पावसच्या स्वामी स्वरूपानंद सेवा मंडळाच्या पुणे केंद्राने जुळवून आणला. ह. भ. प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या श्रीमद् भागवत सप्ताहाच्या आणि ह. भ. प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्री भजनाच्या 'डीव्हीडी' प्रकाशन 'सकाळ'चे

संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले. तिरुपती बालाजी मंदिरात सुप्रभात स्तोत्र म्हटले जाते, त्याच धर्तीवर पांडुरंगासाठी स्वत: देगलूरकर महाराजांनी रचलेल्या आणि हृषीकेश बोडस यांनी गायलेल्या 'सीडी'चे प्रकाशनही या वेळी झाले. आमदार उल्हास पवार, विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शशिकांत पागे, चैतन्य महाराज, गहिनीनाथ महाराज आणि स्वामी स्वरूपानंद मंडळाचे वसंत देसाई व्यासपीठावर उपस्थित होते.

'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'च्या जयघोषात पांडुरंगांचे सुप्रभात स्तोत्र, भागवत कथा आणि चक्री भजनाच्या घराण्यातील चंद्रशेखर महाराज आणि गुरुबाबा महाराज यांना थेट ऐकताना वातावरण भक्तिमय झाले होते.

'भागवत कथा फक्त पुन्हा पुन्हा ऐकण्यासाठीच करावी लागते आणि चक्री भजन म्हणजे साक्षात भगवंताशी एकरूप होण्याचीच साधना' अशा शब्दांत त्यांनी भागवत आणि चक्री भजनाची महती सांगितली.

पागे म्हणाले, ''पंढरपुरातील अमृतपान पुण्यातही मिळावे, यासाठी केलेल्या प्रयत्नाला पुणेकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला. इंग्लंड येथील भारतीय उद्योगपतीने पंढरपूरच्या चंद्रभागेवरील घाट नूतनीकरणासाठी शंभर कोटी रुपयांपर्यंत मदत करण्याची तयारी दर्शविली आहे.''

### * 'कुमारभारती'मध्ये चुकाच चुका

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केलेल्या दहावीच्या मराठी विषयाच्या 'कुमारभारती' पुस्तकात शुद्धलेखनाच्या चुकांनी परिसीमा गाठली आहे.

यंदा मंडळाने 'कुमारभारती' पुस्तक नव्याने प्रकाशित केले. या नव्या पुस्तकात काही जुनेच धडे आहेत. 'कुमारभारती'च्या पुस्तकात चुकीच्या शब्दांची संख्या सुमारे १३० आहे. चुकीच्या शब्दांमध्ये 'आंगठे, श्वास, हुषार, आपणावर, बधीर, चैन, चैनीला, पांडूरंगा...' आदी शब्दांचा समावेश आहे.

पाठ्यपुस्तक निर्मितीचा भाषा विषयाच्या पुस्तकांसाठी एक आकृतिबंध मंडळाने तयार केला होता. त्याप्रमाणे नववी, दहावी, अकरावी, बारावी या वर्गांची पुस्तके तयार करण्यात आली पण दहावीचे पुस्तक नव्याने काढताना आकृतिबंध बदलण्याची परवानगी न घेताच नवीन पुस्तक तयार केले, असा आक्षेप आहे. कठीण शब्दांचा अर्थ पाठ्यपुस्तकाच्या शेवटी द्यावा, असे ठरले होते. या पुस्तकात मात्र कठीण शब्द पाठाच्या खालीच देण्यात आले आहेत. टिपा आणि कठीण शब्द यांचा गोंधळ झाला आहे. कठीण शब्दांत टिपा, तर टिपांमध्ये कठीण शब्द, अशी सरमिसळ झाली आहे. 'कुमारभारती'च्या नवीन पुस्तकात तीन कविता व दोन पाठ पूर्वीच्याच पुस्तकातील आहेत. नवीन अभंग व कविताही घेण्यात आलेल्या नाहीत. पाठाच्या खाली देण्यात आलेल्या स्वाध्यायामध्ये काही ठिकाणी गोंधळ झालेला आहे. एका

वाक्यात उत्तरे देणे शक्यच नाही, असे प्रश्न एका वाक्यात उत्तरे द्या, म्हणून विचारण्यात आले आहेत. काही लेखकांचे परिचय पूर्णपणे तर काहींचे त्रोटक देण्यात आले आहेत. संतांची पूर्ण नावे दिलेली नाहीत.

*** 'आयुर्वेदाकडे लक्ष वेधण्यासाठी संशोधकांनी चमत्कार घडवावा'**

''आयुर्वेदाकडे लक्ष वेधण्यासाठी या क्षेत्रातील संशोधकांनी असाध्य रोगांवरील उपचार शोधून चमत्कार घडवावा,'' असे आवाहन सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या अमृतमहोत्सव कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून केले. मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुहास परचुरे, आमदार उल्हार पवार, 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया, मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. व्ही. व्ही. डोईफोडे, सचिव डॉ. भा. कृ. भागवत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश गांगल उपस्थित होते. आयुर्वेदाबाबत शासनापासून सर्वच पातळ्यांवर होत असलेल्या अनास्थेबद्दल कदम यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, ''सरकार अजगरासारखे सुस्त असते आणि औषधांतील बहुराष्ट्रीय कंपन्यांची स्पर्धा लक्षात घेता आयुर्वेदाला दाद मिळवण्यासाठी संशोधकांनी कर्करोग, एड्ससारख्या व्याधींवर उपचार शोधून चमत्कार दाखवावा.'' संस्थेच्या वाटचालीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या अध्यापक, कर्मचारी; गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. विशेषांकाचे प्रकाशनही झाले.

*** 'देवगंधर्व'चा धडा दहावीच्या पुस्तकात**

माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाने इयत्ता दहावीसाठी नव्याने तयार केलेल्या मराठी (द्वितीय भाषा) वाचनपाठ या पाठ्यपुस्तकात प्रसिद्ध गायिका शैला दातारलिखित 'देवगंधर्व' या पुस्तकातील उतारा समाविष्ट करण्यात आला आहे.

ग्वाल्हेर, आग्रा आणि जयपूर या संगीतातील तीनही घराण्यांची गायकी विलक्षण ताकदीने सादर करणाऱ्या ज्येष्ठ गायक पं. भास्करबुवा बखले यांचे 'देवगंधर्व' हे चरित्र आहे. कोणत्याही कलेच्या साधनेसाठी अपार कष्ट, परिश्रम करावे लागतात. गुरूंच्या कसोटीला उतरण्यासाठी निष्ठा, विनय, कष्टाळू वृत्ती असावी लागते, हे तत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न या पाठात करण्यात आला आहे.

उस्ताद फैज महंमद खाँसाहेब यांच्याकडून गानविद्या मिळावी, यासाठी भास्करबुवा बखले यांनी विद्यार्थिदशेत परिश्रमांची, सहनशीलतेची सीमा गाठली. गाण्याच्या ध्यासाने तहान-भूक, निद्रा, मित्र, नाती या साऱ्या गोष्टी बाजूला सारून ध्येयावर लक्ष केंद्रित केले. शिष्याची योग्य पारख केल्याशिवाय त्याला विद्यादान करायचे नाही, हा करारीपणा अंगी बाणवणारे खाँसाहेब आणि एकदा शिष्य म्हणून स्वीकारल्यावर स्वत:जवळचे सारे ज्ञान शिष्याला देऊन अधिक शिक्षणासाठी उदार मनाने दुसऱ्या जाणकाराकडे पाठवणारे आदर्श गुरू या पाठात दिसतात.

## * कॅनडा-अमेरिकेत पाच मराठी शाळा!

अनिवासी भारतीयांच्या नव्या पिढीची मराठीशी नाळ जुळलेलीच राहावी म्हणून बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे बे. एरिया, बोस्टन, फिलाडेल्फिया, रॅले (नॉर्थ कॅरोलिना), टोरांटोसह पाच शहरांत महाराष्ट्र मंडळांमध्ये येत्या एक सप्टेंबरपासून मराठी शाळा सुरू करण्यात येणार असल्याचे 'बृहन्महाराष्ट्र मंडळ - उत्तर अमेरिका व कॅनडा'चे अध्यक्ष गिरीश ठकार यांनी सांगितले.

मराठी शाळेसाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी सुनंदा टुमणे यांच्या नेतृत्वाखाली विजया बापट आणि श्रीमती जोशी या अमेरिकेतील तीन शिक्षकांचा 'टास्क फोर्स' स्थापन करण्यात आला आहे.

अमेरिकेतील मराठी शाळा पहिली ते दहावी इयत्तेसाठी असतील. यापैकी आठवीपर्यंतचा अभ्यासक्रम निश्चित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. दर्जा आणि गुणवत्ता कायम राखण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाकडून अभ्यासक्रम प्रमाणित करण्यात आले आहेत. या प्रकल्पाला सुरुवात झाल्यानंतर त्यातील त्रुटी दूर करून, अमेरिकेतील अन्य ठिकाणच्या महाराष्ट्र मंडळांमध्येही मराठी शाळा सुरू करण्यात येतील.

अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळांमध्ये अनौपचारिक स्तरावर मराठी भाषा शिक्षण वर्ग सुरू असून, सरासरी पंचवीस ते पन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मराठी शाळांच्या पथदर्शी प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात शंभर-दीडशे विद्यार्थी अमेरिकेतील मराठी शाळांमध्ये शिक्षण घेतील. 'एनआरआय पेरेंट्स असोसिएशन, पुणे' आणि 'बृहन्महाराष्ट्र मंडळ - उत्तर अमेरिका आणि कॅनडा' यांच्यात सहकार्य आणि सामंजस्य करार करण्यात आला आहे.

## * 'वसुधैव कुटुंबकम्' हीच संस्कृतीची शिकवण

''भारतीय संस्कृतीने कायमच व्यापक दृष्टिकोन ठेवून 'वसुधैव कुटुंबकम्' ही शिकवण दिली आहे. हीच शिकवण घेऊन सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या देशात भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रसार करावा,'' असे आवाहन 'इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन'च्या (आयसीसीआर) उपाध्यक्षा डॉ. भारती रे यांनी 'सिंबायोसिस इंटरनॅशनल कल्चरल अँड एज्युकेशन सेंटर' तर्फे आयोजित 'परदेशी विद्यार्थी पदवी प्रदान' कार्यक्रमात केले. या वेळी मॉरिशसचे उच्चायुक्त मुकेश्वर चुनी, सिंबायोसिसचे संचालक डॉ. शां. ब. मुजुमदार उपस्थित होते.

भारतीय विद्यापीठांतून पदवी घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर आपल्या पदवी प्रदान समारंभास उपस्थित राहता येतेच असे नाही. अशा विद्यार्थ्यांना पदवी मिळविल्याचा आनंद घेता यावा, यासाठी पाच वर्षांपासून सिंबायोसिसच्या वतीने विविध विद्यापीठांमधून पदवी मिळवलेल्या परदेशी विद्यार्थ्यांसाठी विशेष पदवीप्रदान समारंभ आयोजित करण्यात येतो.

या वर्षी सुमारे १७ देशांतील २७२ विद्यार्थ्यांनी या समारंभासाठी नोंदणी केली होती. व्यवस्थापन, अभियांत्रिकी, कायदा, विज्ञान आदी शाखांमधील भारतीय अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल परदेशी विद्यार्थ्यांना सिंबायोसिसच्या वतीने सहभागाचे प्रशस्तिपत्र देण्यात आले.

*** डॉ. प्रमोद शेंडगे यांच्या शोधनिबंधाचा अमेरिकन पुस्तकात समावेश**

अमेरिकेतील अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रसिद्ध प्रकाशक स्प्रिंगर यांनी प्रकाशित केलेल्या 'अ‍ॅडव्हान्टेज इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग अँड ऑपरेशन रिसर्च' या पुस्तकामध्ये पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रमोद शेंडगे यांच्या शोधनिबंधाचा समावेश करण्यात आला आहे.

या पुस्तकात जगातील ३४ संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश आहे. या शोधनिबंधात त्यांनी वीज वितरणातील जास्त वीज खेचण्याचे दुष्परिणाम व त्यावरील उपाय सुचवले आहेत. डॉ. शेंडगे यांनी 'मॅटलॅप' या अमेरिकन सॉफ्टवेअरमधील त्रुटी शोधून काढून यावर उपाय सुचविला होता. त्यांनी डिसेंबर २००७ मध्ये 'स्लाइडिंग मोड कंट्रोल फॉर अनसर्टन नॉन लिनियर सिस्टिम कंबाइंड वुईथ इनिशिअल डियली कंट्रोल' या विषयावर पीएच. डी. मिळवली आहे. पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयात ते गेली बारा वर्षे प्राध्यापक आहेत.

*** तेंडुलकरांच्या नाटकातील हिंसा**

मानवी जीवनातील हिंसेला केंद्रस्थानी आणणारा विजय तेंडुलकर यांच्यासारखा दुसरा लेखक नाही. त्यांच्या नाटकांतील हिंसेचा उत्सव हा वास्तववादी आहे. तो सकारात्मक अर्थाने अनादी आणि अनंत आहे, असे मत ज्येष्ठ नाटककार-समीक्षक गो. पु. देशपांडे यांनी व्यक्त केले.

समाज विज्ञान अकादमीतर्फे 'विजय तेंडुलकर : मराठी नाटक आणि आधुनिकता' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. नाटककार मकरंद साठे अध्यक्षस्थानी होते.

देशपांडे म्हणाले, ''पेशवाईच्या अस्तानंतर मराठी नाट्यलेखनाची सुरुवात झाली. राजकीय, आर्थिक सत्ता हातून गेलेल्या वर्गाला स्वत:ची ओळख पटवून देण्याची आवश्यकता भासत होती. यावर्गाने कलाक्षेत्रात पदार्पण केले. पूर्वी पल्लेदार वाक्ये हे नाटकाचे वैशिष्ट्य होते. अशा वाक्यांतून मराठी भाषेला वाचविण्यासाठी संवादशैली बदलण्याचे काम प्रथम तेंडुलकरांनी केले. दोन-तीन शब्दांच्या वाक्यातून नाटकाचा डोलारा उभा राहू शकतो, हे त्यांनी दाखवून दिले. आधुनिकता आली की त्याबरोबर मौन हे आपोआप येते. तेंडुलकरी नाटकातील संताप हा जाज्ज्वल्य दिसत नाही.''

'शांतता'च्या आधीचे तेंडुलकर हे जीवनदृष्टीच्या शोधात होते असे वाटते. भोगाच्या (सखाराम बाईंडर) आणि क्षोभाच्या (गिधाडे) विविध तऱ्हा हे त्यांच्या

नाटकांचे वेगळेपण होते. नागर भविष्यावर उत्तम भाष्य करणारे ते एकमेव नाटककार आहेत, असे देशपांडे यांनी सांगितले.

साठे म्हणाले, ''कल्पकता आणि नावीन्याचा शोध घेणारा नाटककार हा लोकप्रियतेपासून वंचित असतो. हे तेंडुलकरांना लागू असले तरी ते विजनवासात कधीच नव्हते. करुणेने पाहण्याची मोठी शक्ती तेंडुलकरांकडे होती. यातूनच ते जीवनाच्या 'काळ्या बाजू'कडे वळले असावेत, असा कयास आहे.''

### * वारकरी विद्यापीठ हवे

ज्या देशाने जगाला त्यागाची शिकवण दिली, त्याच देशात आज भोगवादाचे स्तोम माजले आहे. समाजातील या ढासळत्या मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी वारकरी विद्यापीठ स्थापन करावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांनी केले.

संगीतोन्मेष संस्थेतर्फे गरवारे महाविद्यालयात चौथ्या अखिल भारतीय वारकरी संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे उद्‌घाटन वाघ यांनी केले. ज्येष्ठ नाट्यसंगीत अभिनेत्री जयमाला शिलेदार, कीर्ती शिलेदार, बबनराव ढाकणे-पाटील, निवृत्ती इंगवले, मारुती रानवडे, दत्तात्रेय पायगुडे, संजय बालवडकर, यादवराज फड, शंकर आढाव या वेळी उपस्थित होते. वाघ म्हणाले, ''आजचे संगीत अधोगतीकडे नेणार आहे. याउलट टाळ, मृदंग, पखवाज, वीणा या वाद्यांतून निर्माण होणारा नाद स्वत्व विसरायला लावणारा आहे. या संगीताचे स्वर ऐकताना नकळतच स्वत:तील अहंकार गळून पडतो. समाजातील नीतिमूल्यांचा होणारा ऱ्हास जर आपल्याला थांबवायचा असेल, तर माणसाला माणूस बनविणाऱ्या संस्थेची गरज आहे. त्यासाठी ठिकठिकाणी वारकरी विद्यापीठे स्थापावी लागतील.''

कीर्ती शिलेदार म्हणाल्या, ''रागदारी, नाट्यसंगीत, भावगीत हे नाट्यसंगीत ही भारतीय संगीताची परंपरा आहे. परंतु हे संगीत जाणण्याची क्षमता केवळ वारकरी संगीतातच आहे. वारकरी संगीत लोकांना बांधून ठेवते.'' सहनशीलता, त्यागाची भावना असणारा वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची मूळ संस्कृती आहे, असे प्रतिपादन ढाकणे-पाटील यांनी केले. वारकरी संप्रदायाची माहिती असणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन ढाकणे-पाटील यांच्या हस्ते झाले; तर पंचपदी ते भैरवी या वारकरी संगीताच्या सीडीचे प्रकाशन कीर्ती शिलेदार यांच्या हस्ते झाले.

### * कविवर्य नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार

नाशिक येथील कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालयातर्फे यंदापासून मराठी साहित्यातील नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी नारायण सुर्वे यांच्या नावाने पुरस्कार दिले जाणार आहेत.

पुरस्कारासाठी पुढील विभाग निवडले आहेत.

१. बालसाहित्य २. कथासंग्रह
३. कवितासंग्रह ४. कादंबरी
५. महिलांनी लिहिलेले साहित्य ६. पथनाट्ये संहिता

पथनाट्य व बालसाहित्य वगळता वरील प्रकारातील कलाकृतींना प्रथम क्रमांकासाठी रुपये दोन हजाराचे एक व उत्तेजनार्थ एक हजार रुपयांची दोन पारितोषिके दिली जातील. पथनाट्य संहितेसाठी प्रथम क्रमांकाचे एक हजार रुपयांचे एक व उत्तेजनार्थ रुपये पाचशेची दोन पारितोषिके दिली जातील.

२००६-२००८ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या कलाकृती ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत पाठवाव्या.

**पत्ता -** सचिव, कविवर्य नारायण सुर्वे सार्व. वाचनालय, राजे संभाजी स्टेडियम शेजारी, सिंहस्थनगर, सिडको, नाशिक - ९, फोन नं. ०२५३-२३७७२३९

*** ग्रंथ पुरस्काराविषयीचे निवेदन**

कोल्हापूर येथील माधव प्रसादजी गोयंका यांनी महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेला दिलेल्या देणगीतून मराठी भाषेतील तत्त्वज्ञान/तर्कशास्त्र/धर्मचिंतन या विषयांवरील उत्कृष्ट पुस्तकाच्या लेखकास १०,००० रुपये व प्रशस्तिपत्र या स्वरूपाचा पुरस्कार दिला जातो.

पुस्तक जानेवारी २००५ ते डिसें २००७ या कालावधीतील, नव्याने प्रसिद्ध झालेले असावे. त्यातील लिखाण चिकित्सक असावे; केवळ माहितीवजा, क्रमिक पुस्तक या स्वरूपाचे असू नये. (मात्र ही अट तर्कशास्त्र विषयावरील पुस्तकासाठी शिथिल केली जाईल.) पुस्तकाच्या दोन प्रती पुढील पत्त्यावर दि. १५ ऑगस्ट २००८ पूर्वी पोहोचतील अशा पाठवाव्यात.

डॉ. बी. आर. जोशी,
१० पानमळा, मधुकर राऊत बिल्डिंग, शिवप्रसाद कॉलनी, पुणे,
दूरध्वनी क्र. ०२०-२४३३०२७०

म. त. परिषदेचे रौप्यमहोत्सवी अधिवेशन कोल्हापूर येथे ६ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत शिवाजी विद्यापीठ परिसरात भरविले जाणार आहे. 'विद्रोहाचे तत्त्वज्ञान' व 'तत्त्वज्ञानाच्या पद्धती' या दोन विषयांवर परिसंवादांचा त्यात समावेश आहे.

*** निबंध स्पर्धेबाबत निवेदन**

'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेतर्फे यंदाची कै. विश्वनाथ विनायक ओक स्मृती' निबंधस्पर्धा 'तुकाराम-गाथेतून व्यक्त होणारा तात्त्विक विचार' या विषयावर घेण्याचे ठरविले आहे. सदर निबंधस्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. निबंध संशोधनात्मक, चिकित्सक आणि यापूर्वी प्रकाशित न झालेला असावा. निबंधाची भाषा मराठी असावी. शब्दसंख्येची मर्यादा चार ते पाच हजार शब्दांची आहे. सुवाच्य अक्षरात

कागदाच्या एकाच बाजूला लिहिलेल्या आपल्या निबंधाच्या दोन प्रती ३१ ऑगस्ट २००८ अगर त्यापूर्वी पाठवाव्या. प्रा. ए. यू. पाटील तत्त्वज्ञानविभाग, विद्यावर्धिनी सभेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, साक्री रोड, धुळे ४२४ ००१. भ्रमणध्वनी - ९४२१४५५१४९

स्पर्धेचा निकाल ऑक्टोबर अखेरीस जाहीर केला जाईल. उत्कृष्ट ठरणाऱ्या पहिल्या दोन निबंधांना अनुक्रमे रु. ५०० आणि रु. ३०० अशी पारितोषिके व प्रशस्तिपत्रे दिले जाईल.

*** डॉ. वि. भा. देशपांडे - नाबाद ७०**

नाटक हा साहित्यप्रकार शिकवताना नाटकाचा प्रयोग पाहणे आवश्यक आहे आणि रंगभूमी या माध्यमाचाही अभ्यास आवश्यक आहे असे मत ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'नवंकोरं' या उपक्रमांतर्गत डॉ. देशपांडे लिखित 'मराठी नाटक आणि नाटककार : काळ आणि कर्तृत्व' या पुस्तकाचे स्वागत करण्यात आले, तसेच सत्तर वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला. त्यानंतर शैला मुकुंद आणि प्रा. मिलिंद जोशी यांनी डॉ. देशपांडे यांच्याशी संवाद साधला.

डॉ. देशपांडे यांनी स्वतःची जडणघडण, बालपण, शिक्षण, नाट्यप्रेम यांची माहिती दिली. पु. ल. देशपांडे यांच्यामुळे मला देशभरातील प्रमुख रंगभूमी, रंगकर्मी आणि पारंपरिक कलाप्रकार प्रत्यक्ष पाहण्याची, अनुभवण्याची संधी मिळाली, असे सांगून ते म्हणाले, ''बंगालमध्ये शंभू मित्रा, उत्पल दत्त, तसेच बादल सरकार, दक्षिणेकडे शिवराम कारंथ, गिरीश कर्नाड आणि इतर अनेक रंगकर्मीशी संवाद साधता आला. त्यांचे गाजलेले प्रयोग पाहता आले. रंगभूमीवर या मान्यवरांशी जे नावीन्यपूर्ण प्रयोग केले, त्यांचा अनुभव घेता आला आणि नाट्यविश्व समृद्ध झाले.''

*** सत्य घटनेवर आधारित 'महासत्ता'**

मराठी चित्रपटसृष्टी हा एक अनमोल खजिना आहे. यात हिऱ्यापेक्षा अनमोल कलाकार आहेत, तर मोत्याच्या मोलापेक्षा अनमोल दिग्दर्शक-तंत्रज्ञ आहेत, याची जाणीव अरुण नलावडे अभिनित 'श्वास' चित्रपटाच्या निमित्ताने झाली. ऑस्करपर्यंत पोचलेल्या चित्रपटाने मराठीला नवी उमेद दिली. दाहक वास्तवतेचा अनुभव देणारा हा चित्रपट सर्वत्र गाजला. आता अशाच प्रकारच्या सत्य घटनेवर आधारित 'महासत्ता' या चित्रपटातून अरुण नलावडे पुन्हा एकदा वास्तवतेची जाणीव करून देणार आहेत. यापूर्वी 'अकल्पित' तसेच 'सलाम' आणि काही हिंदी चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या प्लस एंटरटेन्मेंट प्रा. लि. च्या बॅनरखाली 'महासत्ता'ची निर्मिती होत आहे. या

चित्रपटाचे दिग्दर्शन रमेश मोरे करीत असून, चित्रपटाचे निर्माता रवी अग्रवाल आहेत. कॉन्ट्रॅक्ट सिस्टमच्या विळख्यात अडकलेल्या एका मोठ्या कंपनीतील दोन कामगारांनी स्वत: जाळून घेतले हाते. या घटनेचा आधार घेऊन रमेश मोरे यांनी 'महासत्ता'ची कथा लिहिली आहे. या चित्रपटात अरुण नलावडे यांच्यासोबत अविनाश नारकर, मिलिंद शिंदे, ज्योती सुभाष, संदेश जाधव, अश्विनी एकबोटे, गौतम सावंत आदी कलाकार आहेत.

*** 'अशीसुद्धा माणसं असतात!' चे प्रकाशन**

''भारतीय संस्कृतीमध्ये मानवी नाती व्यापक प्रमाणात पसरली असून, त्यांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय मनुष्य अधिक सुसंस्कृत आहे.'' असे मत डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे प्रकाशित आणि दीपक वैद्य लिखित 'अशीसुद्धा माणसं असतात!' या पुस्तकाचे प्रकाशन संगीता वैद्य यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे संचालक सतीश आळेकर, स्नेहवर्धनच्या डॉ. स्नेहल तावरे उपस्थित होत्या.

डॉ. यादव यांनी प्राणी आणि मानव यांच्या नैसर्गिक स्वभावातील फरक स्पष्ट करताना म्हटले, ''माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्याच्या समाजाला शिस्त आहे. कायदा, संस्कृती, विकास, नीतिमत्तेच्या नियमांमध्ये मानवाने स्वत:ला बांधून घेतले आहे. या मूल्यांमध्ये बिघाड झाला, तर त्याला विकृती म्हणतात.'' वैद्य यांनी स्वानुभवातून सांगितलेली माहिती ही वाङ्मयापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे मांडली आहे, असेही यादव म्हणाले.

आळेकर म्हणाले, ''जागतिक पातळीवर होत असलेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनामुळे समाजजीवन संक्रमणावस्थेतून जात आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सकारात्मक पुस्तकांची गरज असून, वैद्य यांच्या पुस्तकाचा या यादीत समावेश करता येईल.''

*** द. वा. अंबुलकर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन**

द. वा. अंबुलकर यांची शैक्षणिक आणि करिअरविषयक माहिती देणारी 'सीए-सीएस' आणि 'हॉटेल मॅनेजमेंट -ट्रॅव्हल व टुरिझम' ही दोन पुस्तके श्री समर्थ प्रकाशनातर्फे नुकतीच प्रकाशित करण्यात आली. नोकरी-व्यवसायाविषयी मार्गदर्शन करणारे शरद रानडे या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अंबुलकर यांच्या 'शिक्षणाच्या वाटा - नोकरीच्या संधी' या पुस्तक मालिकेअंतर्गत लिहिलेल्या 'सीए-सीएस' या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ती असून, यामध्ये चार्टर्ड अकाउंटन्सी, कंपनी सचिव, कॉस्ट अकाउंटन्सी, चार्टर्ड फायनान्शियल ॲनालिसिस, गुंतवणूक व्यवस्थापन, करपद्धती इत्यादी अभ्यासक्रमांची तपशीलवार माहिती दिली आहे. या अभ्यासक्रमातून

होणारे फायदे, यातील रोजगाराच्या संधी, यासाठी असलेली प्रवेश पद्धती याबाबतची माहितीही या पुस्तकात आहे. 'हॉटेल मॅनेजमेंट - ट्रॅव्हल आणि टुरिझम' या पुस्तकात हॉटेल उद्योग आणि त्याचे व्यवस्थापन यातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण, यामध्ये वाढत जाणारी गुंतवणूक, पर्यटनक्षेत्राचे वाढते महत्त्व आणि त्यातील वाढत्या रोजगार संधी, इव्हेंट मॅनेजमेंट, हवाई सुंदरी क्षेत्रातील करिअर याबाबतची माहिती देण्यात आली आहे.

## * तेंडुलकरांची बांधीलकी

''विजय तेंडुलकरांच्या लिखाणातील सामाजिकता आणि बांधीलकी ही पुस्तकी नव्हती, ती अंत:करणातून आलेली होती. समाजातील वातावरण समजून घेऊन विविध स्तरांतील मानवी संघर्ष, स्वभावरंग त्यांनी लेखनातून मांडले,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक पुष्पा भावे यांनी व्यक्त केले.

सर परशुरामभाऊ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'तेंडुलकर समजून घेताना' हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याचे उद्घाटन भावे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. माधव पेंडसे, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य विनायक सोलापूरकर, कला शाखेचे उपप्राचार्य सुभाष खंडागळे, वाणिज्य शाखेच्या उपप्राचार्या छाया अबनावे आणि नीलिमा गुंडी या वेळी उपस्थित होत्या.

तेंडुलकर लिखित 'घाशीराम कोतवाल', 'सखाराम बाईंडर', 'गिधाडे' तसेच 'कमला' अशा गाजलेल्या नाटकांतील संदर्भ देत भावे यांनी तेंडुलकरांच्या लेखन कारकिर्दीचा प्रवास उलगडला. त्या म्हणाल्या, ''ज्या काळामध्ये परंपरेच्या विरोधात जाणाऱ्या नाटकांची निर्मिती केली जात होती, त्या वेळी तेंडुलकरांनी परंपरेची कास धरून नवीन विषय समाजासमोर आणले. स्त्री प्रश्न, देशातील जातीय समाज व्यवस्था, मानवी नात्यातील पेच, स्वभाव रंग त्यांनी लेखनातून उलगडले. तेंडुलकरांकडे माणसे ओळखण्याची खास दृष्टी होती. त्यांनी कोणत्याही परीक्षा दिल्या नाहीत, पण स्वतंत्र अभ्यास करण्याची पद्धत आत्मसात केली. समाजशास्त्राचे शिक्षण घेतले नाही. तरीही त्यांचा समाजाचा सखोल अभ्यास होता. वेगवेगळ्या परिस्थितीत माणूस कसा वागतो, त्याच्या भावना तेंडुलकरांच्या लिखाणात दिसतात. लेखनामध्ये मानवी संघर्ष मांडला; पण विवेचनामध्ये अवडंबर केले नाही.'' असेही त्यांनी सांगितले.

विजय तेंडुलकर लिखित कथा, स्तंभवाचन आणि 'रामप्रहर' हे नाटक सादर केले.

## * 'आरती' मासिकाची पंचविशी

सावंतवाडीच्या आरती मासिकाने पंचवीस वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे. त्यानिमित्त कुडाळ येथे आरती मेळावाही होत आहे.

ऑक्टोबर १९८२ मध्ये सावंतवाडीतील काही साहित्यिक मंडळींनी 'आरती'

या नावाने नियतकालिक सुरू करण्याचा ठराव केला. ठोस स्वरूपातील उपक्रम करावा, केवळ चर्चा आणि कविसंमेलने करून मागे काही राहत नाही म्हणून प्रकाशनाच्या मार्गातून वाङ्मयीन उपक्रम करावा, असा निर्णय घेण्यात आला. मराठी वाङ्मयीन वाटचालीत कोकणच्या लेखकांचे योगदान मोलाचे आहे. ग्रंथालये आपापल्या ताकदीने उपक्रम करीत असली तरी त्यांचा हेतू ग्रंथप्रसार व वाचनाची आवड शाबूत ठेवणे एवढा मर्यादित असे.

लेखक चिं. त्र्यं खानोलकर तथा कवी आरती प्रभूंच्या नावाने साहित्यिक चळवळ सुरू केल्यास तिला चांगले यश लाभेल या विचाराने आरती मासिक काढण्याची योजना हाती घेण्यात आली. २६ जानेवारी १९८३ रोजी पहिला अंक प्रकाशित झाला. वाङ्मयीन अभिसरणाची चळवळ सुरू झाली. चिंतामणी साहित्य सहयोग संस्था सहकारी तत्त्वावर काढावी असेही निश्चित झाले. प्रमुख प्रवर्तक म्हणून सी. श्री. उपाध्ये आणि अध्यक्ष म्हणून आरती प्रभूंचे दुसरे स्नेही विद्याधर भागवत यांना निवडण्यात आले. प्र. श्री. नेरूरकर यांनी मुंबईतून मदत करण्याचे निश्चित केले. मधु मंगेश कर्णिक, आ. ना. पेडणेकर यांनीही मदत केली. शिवराम भाऊ जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. अशातऱ्हेने अनेक अडचणीतून मार्ग काढत अनेकांचे प्रेम, सहकार्य घेत या मासिकाने पंचवीस वर्षांचा टप्पा गाठला. विद्याधर भागवत यांनी तब्बल २१ वर्षे हे मासिक सांभाळले. त्यांच्या निधनाने मोठा धक्का बसला. आरतीने विभागीय संमेलने, काव्य, कथास्पर्धा, चर्चासत्रे आयोजित केली. या सर्व कार्यात भागवत पुढे असत. आरती मासिकाला पंत वालावलकर ट्रस्ट, सारस्वत बँक, कालनिर्णयकार जयंत साळगावकर, वासंती गाडगीळ ट्रस्ट, श्रीमती संगीता गोगटे यांनी देणग्या दिल्या. श्री उपाध्ये, प्रभाकर भागवत, वा. रा. ढोरे, सौ. उषा परब, श्रीमत उषा भागवत, लवूशेट बागवे, श्री धारणकर, सौ. ऋतुजा दळवी, चित्रकार अरुण दाभोलकर, राजू मणेरीकर आदी मंडळींमुळे पंचवीस वर्षांची समाधानकारक वाटचाल पूर्ण झाली.

*** मराठीतील एकमेव प्रतिभावंत - जी.ए.**

आयुष्याचा ठेवा मिळाला असे ज्यांच्या लेखनामुळे मला वाटले, त्यांत जी.ए यांचे लेखन आहे. आयुष्यातील अनेक गोष्टींना निकराचा नकार देणाऱ्या व्रतस्थ साधकाची त्यांची भूमिका होती. स्वत:च्या एकाग्र साधनेसाठी त्यांच्या लेखी 'आत्मा'ही पाहुणा होता. विसाव्या शतकातील मराठी साहित्यातील एकमेव प्रतिभावंत, असे जीएंचे वर्णन मी करेन, असे उद्‌गार ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी काढले.

'आशय सांस्कृतिक', 'स्कीन सिटी' आणि जी.ए. कुटुंबीय यांच्यातर्फे आयोजित 'प्रिय जीए' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

एलकुंचवार म्हणाले, ''सहजासहजी आवाक्यात न येणारा अतिशय मोठा माणूस म्हणजे जी. ए.! एकदा वाचल्यावर ज्याची 'बाधा' जडावी, असा हा लेखक आहे. मोठ्या माणसांशी कसे बोलायचे, त्यामुळे मी त्यांना कधी भेटायला गेलो नाही. माझे 'गार्बो' नाटक त्यांना ग्रेस यांनी पाठवले. ते वाचून जी. ए. यांचे मला पत्र आले; पण भाबडा भक्तिभाव माझ्यात नसल्याने पत्रव्यवहार काही झाला नाही. पुढे हे पत्र जी. ए. यांच्या पत्रसंग्रहाच्या पुस्तकात समाविष्ट झाले. स्वत: गुणी लेखक आणि प्रतिभावंत लेखक, असा मी फरक करतो. प्रतिभावंताची जागा स्वयंसिद्ध असते, ती जी. ए. यांची होती. लेखनातून जो अनुभव ते देतात, तो विलक्षण असतो. ते सावलीसारखे आपल्यासोबत राहतात आणि प्रचंड मोठी जीवनदृष्टी देतात.''

''आपल्याला मात्र सगळ्याचे 'वर्गीकरण' करण्याची घाई असते. त्यामुळे साधनेत व्यत्यय नको म्हणून त्यांनी स्वीकारलेल्या एकटेपणाचेही आपण सोईस्कर अर्थ त्यांना चिकटवले. एकटे जगावेसे वाटणे, ही एखाद्याची शक्ती असू शकते, ते आपल्याला मान्य नसते. कोलाहल, वित्तेषणा, लोकेषणा यांची वजाबाकी करत जी.ए. यांनी एकटेपण मिळवले होते; पण आपल्याला सगळ्याच्या 'बेरजा' करण्याची सवय असते. जी.ए. यांच्या लेखनातील 'दृष्टान्तकथां'पासून त्यांचे लेखन बदलल्याची जाणीव होते. मी स्वत: एक लेखक म्हणून या दृष्टान्तकथांना घाबरतो. वाद्य, वादन आणि वादक एकत्र होतात, ती एकरूपतेची जाणीव या कथांतून जी.ए. यांनी साधली आहे. या कथांमधील 'अणुरणन' विलक्षण आहे. ज्यांना उत्तरे नाहीत, असे भोवंडून टाकणारे प्रश्न त्यांना पडत. अनुभवांच्या अनेक परी त्यांनी ओलांडल्या आणि अनंत आयुष्ये ते जगले. मला ते 'आत्मज' वाटतात. रागातील वादी-संवादी स्वरांसारख्या जी.ए. यांच्या लेखनात प्रतिमा येतात'' असेही एलकुंचलवार म्हणाले.

'प्रिय जीए' महोत्सवाची सुरवात महेश एलकुंचवार यांच्या भाषणाने आणि रसिकांच्या प्रचंड उपस्थितीने लक्षात राहणारी ठरली. निवडक पण दर्जेदार लेखन, हा समान दुवा असणाऱ्या एलकुंचवार आणि जी.ए. यांच्यातील न भेटता, पत्र न लिहिताही जुळलेले बंध या कार्यक्रमातून उलगडले गेले.

या महोत्सवाचे उद्‌घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. या वेळी 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर, नंदा पैठणकर, डॉ. अरुणा ढेरे, 'स्क्रीन सिटी'चे डॉ. नितीन ढेपे, 'आशय सांस्कृतिक'चे सतीश जकातदार, वीरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते.

मालकर म्हणाले, ''मराठी वाचकाला एका अंधाऱ्या विश्वाचे अपूर्व दर्शन तुम्ही घडवले, असे सुनीताबाईंनी 'जी. ए.' यांच्याविषयी म्हटले आहे. समान जीवनमूल्यांची नाती जुळावीत आणि विश्वास हा पाया असलेले मैत्र, आनंदाचे क्षण प्रत्येकाला सापडावेत, हे क्षण जी. ए. यांच्या लेखनात सापडतात.''

डॉ. ढेरे म्हणाल्या, ''जी. ए. यांची पत्रे हे मराठी साहित्यातील मोलाचे धन

आहे. हे लेखन अन्य भाषांत जाण्याचे प्रयत्न व्हावेत.'' 'सप्रेम नमस्कार' या कार्यक्रमातून जी. ए. यांच्या पत्रांचे अभिवाचन डॉ. गिरीश ओक, डॉ. अरुणा ढेरे आणि चंद्रकांत काळे यांनी केले.

*** तुका म्हणे साहित्य पुरस्कार २००८**

'तुका म्हणे' या नियतकालिकाच्या माध्यमातून दरवर्षी 'तुका म्हणे साहित्य पुरस्कार' देण्यात येतात. २००८ साठी दि. १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीत प्रकाशित झालेल्या कथा, कविता, नाटक, कादंबरी, समीक्षा, अनुवाद या साठी पात्र आहेत. या पुरस्कारासाठी ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत पुस्तके पाठवावी.

पत्ता : भगवान ठग, संयोजक, तुका म्हणे साहित्य पुरस्कार समिती, केशव नगर, बुलडाणा ४४३ ००१. जि. बुलडाणा (महाराष्ट्र)

❑



# व्हायरस

**रवींद्र ठाकूर**

**किंमत१४० रु. पोस्टेज २५रु.**

*'त्याचं काय आहे प्रोफेसर... कॉम्प्युटरमध्ये एखाददुसरा प्रोग्रॅमच काय पण संपूर्ण सिस्टीमच करप्ट करणारा व्हायरस असतो. तसा हा एक व्हायरस आहे. कॉम्प्युटरमध्ये तो बाहेरून घुसू शकतो किंवा काही वेळा कॉम्प्युटरच्या सिस्टिममध्येच तो दडलेला असतो आणि संधी मिळताच ॲक्टिव्हेट होतो. त्याला समूळ नष्ट करू शकेल असा एकही उपाय आजवर उपलब्ध झालेला नाही. अगदी तसंच आहे हे. फरक एवढाच, की हा व्हायरस बाहेरून आलेला नाही. या व्यवस्थेच्या पोटातच तो आहे. किंबहुना त्यावरच ही सगळी सिस्टीम उभी आहे. मग ती चांगली कशी निपजणार?... तुम्ही कितीही नवे प्रोग्रॅम तयार करा... तुमच्या नकळत तो त्यात शिरतोच आणि सगळी सिस्टीम क्रॅश करून टाकतो.'*

# बॉर्न कन्फ्यूज्ड

**तनुजा देसाई हैदर**

अनु. सुधा नरवणे

**किंमत ३५०रु.**
**पोस्टेज ३० रु.**




डिंपल लाला ही अमेरिकेत जन्मलेली, वाढलेली भारतीय वंशाची मुलगी. आपले भारतीय आईवडील आणि आजूबाजूचे अमेरिकन वातावरण या दोन वेगवेगळ्या प्रवाहांना सांधताना, त्यामध्ये विहरताना ती विलक्षण गोंधळते. जसजशी तिची समज वाढत जाते तसतसा तिच्या मनातील हा गोंधळ तिला अधिकच अस्वस्थ करत जातो.

भिन्न भाषा-विचार-संस्कार हे सगळं दोन निरनिराळ्या पातळीवर समजून घेताना; जगण्यातले बरे-वाईट अनुभव, उत्फुल्लित करणारे क्षण या साऱ्यांबरोबर ती स्वत:लाच शोधत राहते... खोलवर जाणून घेऊ पाहते... या दरम्यान तिला गवसलेली, हातून निसटलेली, जपलेली, तुटलेली अनेकविध नाती तिचं भावविश्व समृद्ध करत जातात... तिला नात्यांचा अर्थ शोधायला लावतात...

यातूनच मग भारत आणि अमेरिका या दोन्ही संस्कृतींचं विलोभनीय दर्शन होत जाते. दोन्हींतील तफावत आणि आपले आपल्या संस्कृतीशी असलेले अतूट बंध– हे सारं मनाचा अचूक ठाव घेतं.

अशी ही गोष्ट डिंपलची. स्वत:सकट मैत्री, प्रेम यांचाही शोध घेण्याची; संस्कृती शोधण्याची, तिची ओळख करून घेण्याची; आणि कधीकधी या गोष्टी अशा ठिकाणी सापडतात, जिथे तुम्ही त्यांची स्वप्नातही कल्पना केलेली नसते.

# विशेष वार्ता

## उत्कृष्ट अनुवादाचा पुरस्कार

### थैलीभर गोष्टी

**सुधा मूर्ती**

**अनुवाद**
**लीना सोहोनी**




'आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी, यांच्या वतीने देण्यात येणारा सन २००७ उत्कृष्ट अनुवादाचा पुरस्कार 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रकाशित केलेल्या 'थैलीभर गोष्टी'या पुस्तकाला देण्यात आला. 'मॅजिक ड्रम' या सुधा मूर्तींच्या मूळ पुस्तकाचा हा अनुवाद लीना सोहोनी यांनी केलेला आहे.

या कथांचा बहुपेडी आशय बालवाचकांप्रमाणे प्रौढ वाचकांनाही आवडेल असा आहे.

सदरचा पुरस्कार अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. म. द. हातकणंगलेकर यांच्या शुभ हस्ते रविवार दि. १३ जुलै २००८ रोजी इचलकरंजी येथे प्रदान करण्यात आला.

❐




**'आपटे वाचन मंदिर'चा उत्कृष्ट अनुवाद पुरस्कार मा.प्रा. श्री. म. द. हातकणंगलेकर यांच्या हस्ते स्विकारताना लीना सोहोनी**

## पाटील एंटरप्रायजेसचे ग्रंथ दालन

पाटील एंटरप्रायजेसने पुण्यामध्ये केवळ मराठी पुस्तकांसाठी वातानुकूलित असे प्रशस्त दालन अप्पा बळवंत चौकात नीलांबर सोसायटी मध्ये सुरू केले आहे. या नवीन पुस्तक दालनाचे उद्‌घाटन दै. सकाळचे संपादक मा. श्री यमाजी मालकर यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ प्रकाशक मा. ह. अ. भावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वेळी यमाजी मालकर म्हणाले की समाज मोठा होण्यासाठी संगीत, कला आणि साहित्य यांची फार जरुरी असते. मातृभाषेतून साहित्य वाचण्याचा आनंद फार वेगळाच असतो. पाटील एंटरप्रायजेसने या मराठी भाषिकांसाठी सुरू केलेल्या पुस्तक दालनाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

ह. अ. भावे म्हणाले की साहित्य, संस्कृती हा समाजाचा प्राण असतो. पुस्तके समाजसुखात भर टाकत असतात. पाटील बंधू हे समाजसुख वाढविण्याचे काम करतात ही फार मोठी भाग्याची गोष्ट आहे.

उमेश पाटील आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की प्रकाशक, विक्रेते व ग्राहक यांच्या मधील महटत्त्वाचा दुवा साधणे व वाचन संस्कृती वाढविणे,



**पाटील एंटरप्रायजेसचे नवे ग्रंथ दालन**

ज्ञानवृद्धी करणे आणि व्यक्तिमत्त्वविकास घडविणे या उद्देशाने ग्रंथप्रदर्शने आमची संस्था गेली अनेक वर्षे करीत आहे. पुण्याच्या वाचन संस्कृतीला खतपाणी घालण्याचे काम शहरातील मॉल्स करत असले तरी तेथे मराठी पुस्तकांची संख्या मर्यादित असते. ही उणीव भरून काढण्यासाठी केवळ मराठी पुस्तकांसाठी वातानुकूलित असे मोठे दालन सुरू केले आहे. यामध्ये कथा, कादंबऱ्या, आरोग्य, व्यवस्थापन, व्यापार, कायदा, धर्म, राजकारण इत्यादी विषयांवरील दोनशेहून अधिक प्रकाशकांची सुमारे एक लाख पुस्तके उपलब्ध आहेत. बुक क्लब, पुस्तक भेट योजना व आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गाला येथील दालनात बसून वाचन करण्याची किंवा अनामत रक्कम ठेवून पुस्तकाचा काही भाग झेरॉक्स करण्याची मुभा राहिल.

यावेळी सुमनताई पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी संतोष शेणई, विवेक सबनीस उपस्थित होते. उदय पाटील यांनी आभारप्रदर्शन केले. तर पद्माकर पाठकजी यांनी सूत्रसंचालन केले.

❒



# दखल

## ● फूटपाथवर पुस्तकाचे प्रकाशन

पुस्तक प्रकाशनाचे कार्यक्रम सध्या रोजच होत असतात. परंतु काही प्रकाशन समारंभ आपल्या वेगळेपणामुळे उठून दिसतात. असाच एक आगळावेगळा प्रसंग नुकताच पुण्यात पहायला मिळाला. एका पुस्तकाचे प्रकाशन चक्क एका रद्दी डेपोसमोर फूटपाथवर झाले. सर्व पाहुणे आणि प्रेक्षक-श्रोते फूटपाथवरच उभे... उभ्याउभ्याच सर्व काही. भाषणे... प्रकाशन... वडापाव-कटिंग चहादेखील.

हे पुस्तक होते 'मेमरी रिमेन्स' (रेंगाळणाऱ्या स्मृती). लेखक होते प्रशांत कऱ्हाडे.

सामाजिक कार्यकर्ते अनिल कुडिया यांच्या हस्ते त्याचे प्रकाशन मंगळवार पेठेतील नरपीतगीर चौकातल्या गुरुदत्त रद्दी डेपोसमोर झाले. अनिल कुडिया हे एड्‌सग्रस्त व्यक्तींसाठी कार्य करतात. पेव्हमेंट पब्लिशर्सतर्फे हे पुस्तक प्रकाशित झाले. मुंबईच्या डॉ. शैलेंद्र वैशंपायन यांनी ही प्रकाशन संस्था काढली आहे. मुंबई-पुण्यातील फूटपाथवर पुस्तकविक्री करणाऱ्या विक्रेत्यांमार्फत या पुस्तकाची विक्री होत राहील.

या पुस्तकाचे लेखक प्रशांत कऱ्हाडे हे सॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत. विप्रोमध्ये काम करतात. वय ३५. आपल्या आयुष्याच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण घटना लिहून काढल्यावर त्यांनी प्रकाशकाचा शोध घेण्यास आरंभ केला. तेव्हा काही प्रकाशकांनी वीस-तीस हजार रुपये द्या; मग पुस्तक काढतो असे म्हटले. दुसऱ्या एकाने म्हटले, ''मी या पुस्तकाची चांगली पब्लिसिटी करीन पण त्यासाठी दोन लाख रुपये तरी लागतील...'' त्यामुळे प्रशांत कऱ्हाडे हे वैतागले. पुस्तक प्रकाशन हा व्यवसाय लेखकाच्या पैशावर चालतो

की काय असा प्रश्न त्यांना पडला. प्रकाशक जेव्हा सरळ पैसे मागण्याचे टाळत तेव्हा म्हणत, ''पुस्तकाच्या पाचशे प्रती तुम्हाला विकत घ्याव्या लागतील.'' एका प्रकाशकाने पुस्तक काढू, पण निम्मा खर्च तुम्हाला करावा लागेल असे म्हटले. एका प्रकाशन संस्थेने पुस्तक वाचून निर्णय घेऊ; पण त्यासाठी वाचन फी भरावी लागेल आणि सहा महिने निर्णयाला लागतील असे सांगितले...

अशा प्रकारच्या अनुभवांमुळे पुस्तक छापण्याचा उत्साहच उरला नाही. परंतु अशाच अनुभवातून गेलेले डॉ. शैलेंद्र वैशंपायन यांची माहिती त्यांना मिळाली. मुंबईचे डॉ. वैशंपायन यांनी आपले 'सॅटर्न अँड आय' हे पुस्तक छापण्यासाठी बऱ्याच प्रकाशन संस्थांशी संपर्क साधला, परंतु कोणीही पैसे घेतल्याशिवाय पुस्तक काढायची तयारी दर्शविली नाही. तेव्हा त्यांनी स्वत:च ते पुस्तक काढले (२३ डिसेंबर २००७) ते पुस्तक विक्रीसाठी ठेवायला ग्रंथविक्रेते तयार नव्हते. तेव्हा फूटपाथवर पुस्तकविक्री करणाऱ्या लोकांशी त्यांनी संपर्क साधला आणि त्यांचे नशीब बलवत्तर; फूटपाथवरील पुस्तक विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या संघटनेचे श्री. जमाल यांची त्यांची गाठ पडली. श्री. जमाल यांनी या संघटनेतर्फे पुणे, मुंबई, चेन्नई, दिल्ली, कलकत्ता वगैरे ठिकाणी या पुस्तकाच्या विक्रीची व्यवस्था केली. एक हजार प्रती एका महिन्यात विकल्या गेल्या. ही हकिकत कळल्यावर अबिद सुरती या लेखक पत्रकाराने डॉ. वैशंपायन आणि जमाल यांच्याशी संपर्क साधला. मान्यवर प्रकाशन संस्थांची 'दादागिरी' संपुष्टात आणण्यासाठी काहीतरी करायला हवे. कमी खर्चात नव्या लेखकांची पुस्तके निघायला हवीत. त्यासाठी आपण प्रकाशन संस्था का काढू नये असा विचार सर्वांनी केला आणि पेव्हमेंट पब्लिशर्स नावाने प्रकाशन करायचे ठरवले. श्री. जमाल या पुस्तकांच्या फूटपाथ-विक्रीची तयारी दाखवली. डॉ. वैशंपायन यांनी प्रशांत कऱ्हाडे यांचे मेमरी रिमेन्स हे पुस्तक काढण्याचे मान्य केले... त्याप्रमाणे रविवार दि. १६ जून रोजी पुण्यात प्रकाशन सोहळा अत्यंत अनौपचारिकपणे घेण्यात आला. ही पुस्तके चांगली विकली गेली तर आणखी पुस्तकेही भराभर निघत राहतील. नव्या लेखकांना संधी दिली जाईल.

पुण्यातील या कार्यक्रमाला आहारतज्ज्ञ मालती कारवारकर, सुनील लांबे वगैरे उपस्थित होते. मालती कारवारकर यांची आहारावरची बरीच पुस्तके निघालेली आहेत. तरीही क्रीडापटूंसाठी आहार व उपचार हे आपले पुस्तक त्यांनी पेव्हमेंट प्रकाशनतर्फे काढायचे ठरवले आहे.

पेव्हमेंट पब्लिशर्समुळे प्रकाशन क्षेत्रात क्रांती वगैरे काही घडणार नाही. प्रस्थापित प्रकाशन संस्थांच्या कार्यपद्धतीवर वा उलाढालीवर काही परिणाम होणार नाही. स्वत:च पैसे खर्च करून आजही शेकडो कवी आपली पुस्तके काढतात. त्यांचे गठ्ठे

नंतर रद्दीच्या दुकानात नाहीतर भेळवाल्याकडे जातात. वाचक त्याला कुतूहल वाटले तरच पुस्तक घेतो. प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांपैकी शेकडा ऐंशी पुस्तके गोडाऊनमध्येच धूळ खात पडतात. ज्यांचा गाजावाजा आणि जाहिरात खूप होते, वृत्तपत्रांमध्ये ज्यांच्याविषयी बातम्या येतात अशा पुस्तकांचा उठाव चांगला होतो. ज्या प्रकाशनाची मार्केटिंगची यंत्रणा चांगली असते त्याची पुस्तके त्यामानाने चांगली खपतात आणि लेखक-प्रकाशक दोघांनाही अर्थलाभ घडवतात. सेल्फ पब्लिशिंगची बहुसंख्य पुस्तके पडून राहतात... पेव्हमेंट पब्लिशर्सने हौस म्हणून वर्षाला पाचदहा पुस्तके काढली तर त्यामुळे धंद्यात काय मोठी भर पडणार? शेदोनशे पुस्तके वर्षाला काढायची योजना आखली तर व्यावसायिक पातळीवर त्यासाठी संपादक, चित्रकार, मुद्रितशोधक, मांडणीकार, प्रसिद्धी वगैरेंची यंत्रणा उभी करावी लागेल. त्यामुळे छपाईखर्च वाढणार. जी पुस्तके खपू शकतील असा विश्वास वाटेल तीच काढण्याकडे मग कल राहणार. 'ग्रंथाली'ने मराठी प्रकाशक पुस्तकांच्या किंमती भरमसाट ठेवतात त्यामुळे वाचकांना ती घेणे परवडत नाहीत अशी भूमिका मांडून प्रकाशनाला आरंभ केला. आरंभी पुस्तकांच्या किंमती कमी ठेवल्या. पण पुढे इतर प्रकाशकांचेच अनुकरण केले. नंतर ५० टक्के-सत्तर टक्के सवलती जाहीर केल्या.

पेव्हमेंट पब्लिशर्सचे कौतुक करायला हरकत नाही; परंतु प्रकाशन व्यवसायात त्यामुळे अभूतपूर्व क्रांती होणार आहे वगैरे भ्रमजालात कोणी राहू नये. मराठीचा ग्रंथव्यवहार हजार कोटी रुपयांच्या घरात आहे. दहावीस पुस्तकांच्या दोन-तीन लाखांच्या उलाढालीने त्यात एखादी लाटदेखील उमटणार नाही. प्रस्थापित विक्रेत्यांच्या आणि प्रकाशन संस्थांच्या वर्षानुवर्षे चाललेल्या व्यवहारात त्यामुळे काही घट होणार नाही. गावोगावची ग्रंथालये, शाळा-कॉलेजची खरेदी, संस्थात्मक खरेदी, जिल्हा परिषद-शिक्षणमंडळे यांची खरेदी ही फुटपाथवरच्या विक्रेत्यांकडून होत नाही. परंतु या निमित्ताने नव्या लेखकांच्या पुस्तकांना नवा ग्राहकवर्ग मिळणार असेल तर ती गोष्ट स्वागतार्ह मानायला हवी.

## ● मोबाईल लायब्ररी

काही दिवसांपूर्वी ओम साई मोबाईल वाचनालयाचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले... हे वाचनालय वैशिष्ट्यपूर्ण होते. कारण ते फिरते वाचनालय होते. फिरते म्हणजे मोबाईल. एका व्हॅनमध्ये पुस्तके ठेवून, ती व्हॅन शहराच्या वेगवेगळ्या भागात विशिष्ट वेळापत्रकाप्रमाणे उभी करायची; वाचक सदस्यांनी त्यावेळी आपल्याला हवी असणारी पुस्तके घेऊन जायची. पुस्तक घेण्यासाठी वा बदलण्यासाठी वाचनालयाच्या इमारतीपर्यंत जायला नको. आपल्या घराजवळच्या थांब्यावर गेले की झाले! अशी या मोबाईल लायब्ररीची मागची संकल्पना. पुस्तके तुमच्या दारात. या लायब्ररीचे नाव

ओम साई मोबाईल लायब्ररी. ही निगडी भागातील लायब्ररी.

या फिरत्या लायब्ररीची कल्पना मूळ नेरूळ येथे राहणाऱ्या आनंद पाटील या तरुणाची! त्याचे वडील कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी जवळचे. गिरणी कामगार. तीस वर्षांपासून नवी मुंबईत वास्तव्य. बारावीपर्यंत आनंदची मजल गेली. नंतर अभ्यासाचा कंटाळा आला तेव्हा त्याने शिरवण येथील औद्योगिक वसाहतीत कारखान्यात कामगार म्हणून नोकरी मिळवली. संध्याकाळी ५ नंतर वेळ मोकळा. त्याला वाचनाची आवड. त्यामुळे त्याने आपल्या राहत्या घरी लायब्ररी सुरू केली... पहिल्यांदा पाचसहा सभासद मिळाले... हळूहळू ही संख्या आठशेवर गेली. काही लोक म्हणत, ''तुमच्या लायब्ररीत यायला वेळ मिळत नाही. तुम्ही घरीच पुस्तके का आणून देत नाही?'' तेव्हा तशी सेवा त्याने सुरू केली. त्यात पुस्तके व्यवस्थित मांडता येतील अशी मांडणी करून घेतली. दीड-दोन हजार पुस्तके घेऊन ही लायब्ररी नवी मुंबईतल्या वेगवेगळ्या भागांत ठरलेल्या वेळी उभी राहू लागली. अडीचशेवर सभासद झाले. शंभर रुपये मासिक शुल्क. आठवड्याला तीन पुस्तके वाचकाला मिळतात. नव्या मुंबईत या फिरत्या लायब्ररीची माहिती आता घरोघर पोचली आहे. लोक 'लायब्ररीची' वाट बघत असतात.

काही वाचकांनी पुस्तके विकत घेण्याची इच्छा दर्शविली. तेव्हा लायब्ररी बरोबरच पुस्तकविक्रीचाही उपक्रम आनंद पाटील यांनी सुरू केला. त्यातूनही चांगले उत्पन्न मिळू लागले. आनंद पाटीलच्या या लायब्ररीच्या कामात त्याच्या पत्नीनेही लक्ष घातले. महिलावर्गाची सदस्य संख्या त्यामुळे वाढू लागली.

सुशिक्षित तरुणांनी तालुका-जिल्हा ठिकाणी मोबाईल लायब्ररीची कल्पना राबवायला हरकत नाही. एक टेंपो तेवढा हप्त्याने घ्यायचा. त्यात पुस्तकांच्या रॅक्स बसवायच्या. एक लाखाच्या आत गुंतवणूक... पाचशे सदस्य झाले तर... दहा हजाराची कमाई अवघड नाही.

## ● तीन तीन लाखांचे क्रॉसवर्ड पुरस्कार

३ जुलै २००८ रोजी मुंबईत व्होडाफोन-क्रॉसवर्ड ग्रंथपुरस्कारांचे वितरण झाले. इंग्लिशमध्ये प्रसिद्ध झालेल्या भारतीय लेखकाच्या कादंबरीला आणि ललितेतर पुस्तकाला क्रॉसवर्डतर्फे पुरस्कार देण्यात येतात. तेही प्रत्येकी तीन तीन लाख रुपयांचे. त्यामुळे या पुरस्काराचे भारतीय साहित्यविश्वात 'बुकर'सारखेच कोणालाही हेवा वाटावे असे स्थान आहे. त्याचबरोबर प्रादेशिक भाषेतील कादंबरीच्या इंग्लिश अनुवादालाही दोन पुरस्कार देण्यात येतात. त्यांची रक्कमही तीन तीन लाखांचीच आहे, परंतु ती मूळ लेखक आणि अनुवादक यांच्यात समान विभागली जाते. म्हणजे प्रत्येकाला दीड दीड लाख रुपये मिळतात. ज्ञानपीठ पुरस्कार, सरस्वती सन्मान हे

पाच पाच लाखांचे पुरस्कार एखाद्या विशिष्ट कृतीला म्हणून देण्यात येत असले तरी त्यांचे स्वरूप हे जीवनगौरव पुरस्कारासारखे असते. त्यामुळे बहुतेक लेखकांना ते मिळवण्यासाठी साठी तरी गाठावी लागते. क्रॉसवर्डचे हे पुरस्कार एकेका पुस्तकाला असल्याने तरुण लेखकांनाही त्यावर हक्क सांगता येतो.

उषा के. आर. यांच्या ए गर्ल अँड ए रिव्हर या कादंबरीला इंग्लिश फिक्शनचा पुरस्कार यंदा मिळाला. कर्नाटकातील एका छोट्याशा खेड्यात स्वातंत्र्यपूर्व काळात घडलेल्या घटनांचा पट या कादंबरीत उलगडून दाखवला आहे.

फिल्मिंग (तबिश खैर), दि सिटी ऑफ लव्ह (रिमी बी. चॅटर्जी), ल्युनॅटिक इन माय हेड (अंजुम हसन), होम प्रॉडक्टस (अमिताव कुमार), दि ॲसॅसिन्स सॉंग (एम. जी. वासनजी) या कादंबऱ्याही अखेरच्या यादीत होत्या.

ललितेतर साहित्यात वुइल्यम डलरिम्पल याच्या दि लास्ट मुघल या बहादुरशाह जफरच्या कारकिर्दीवरील, १८५७ च्या उठावावर आधारित पुस्तकाची परितोषिकासाठी निवड झाली. हिचे मराठी भाषांतर मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केलेले आहे.

इंडिया आफ्टर गांधी (रामचंद्र गुहा), मोहनदास (राजमोहन गांधी), दि म्युझिक रूम (नमिता देवी दयाल) आणि सिटी ऑफ फीअर (रॉबिन डेव्हिड) या पुस्तकांशी दि लास्ट मुघलची स्पर्धा होती.

प्रादेशिक भाषेतून इंग्रजीत अनुवाद झालेल्या कादंबरीचा एक पुरस्कार बंगाली लेखक शंकर (मणीशंकर मुखर्जी) यांच्या 'चौरंगी'च्या अनुवादाला मिळाला. हा अनुवाद अरुणव सिन्हा यांनी केला आहे. दुसरा पुरस्कार मल्याळी लेखक अनंत सी. पी. सच्चिदानंदन यांना 'गोवर्धन्स ट्रॅव्हल्स' या कादंबरीला मिळाला. तिचा अनुवाद गीता कृष्णनकुट्टी यांनी केला आहे.

नेहरू ऑडिटोरियममध्ये अमिताव घोष (इ. स. २००४ मध्ये क्रॉसवर्ड पुरस्काराचे मानकरी) यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. पुरस्कारप्राप्त पुस्तकातील काही भाग्य नाट्यप्रवेशाच्या रूपात त्यावेळी सादर करण्यात आले. अभिनेता टॉम अल्टर याने सूत्रसंचालन केले. गायिका शोभा मुद्गल यांनीही काही गीते म्हटली. मंजुळा पद्मनाभन, काई फ्रिझ, मुकुल केशवन, अनिता रॉय, मुकुंद पद्मनाभन, हरीष सेठी, उर्वशी बुटालिया, पॉल झकारिया हे परीक्षक समितीचे सदस्य होते.

## ● पुनर्जन्मावर तुमचा विश्वास आहे का?

'जन्म-पुनर्जन्म' हे एक आत्मकथनात्मक पुस्तक आहे. दत्ता वाकणकर या ऐंशीतील गृहस्थांनी ते लिहिले आहे. आपल्या जीवनातील प्रत्यक्ष घडलेल्या काही चमत्कृतिपूर्ण घटनांबद्दल या पुस्तकात त्यांनी विवेचन केले आहे. पुनर्जन्म, पूर्वजन्मातील अतृप्त इच्छांची पूर्तता न झाल्यास अतृप्त राहिलेल्या आत्म्याने एखाद्या व्यक्तीच्या

अंगात संचार करून इच्छा पूर्ततेचा प्रयत्न करणे, त्याबद्दल स्वप्नात संकेत देणे, भावी घटनांचे पूर्ण संकेत मिळणे, पिशाच योनीची प्रचिती येणे, कर्णपिशाचाद्वारे काही धोक्यांबद्दल इशारा मिळणे, भृगुसंहिता किंवा छायाज्योतिष्याकडून नेमके मार्गदर्शन मिळणे, मांत्रिकाकडून विशिष्ट ठिकाणी अशा भूत-पिशाचांचा विशिष्ट विधीने बंदोबस्त होणे अशा अनेक प्रकारांशी या पुस्तकातील घटनांचा संबंध सहजगत्या आला आहे. आपण बुद्धिवादी, बुद्धिप्रामाण्यवादी लोक अशा प्रकारांवर विश्वास ठेवायला सहजासहजी तयार होत नाहीत परंतु आपल्याला आयुष्यात असे काही प्रकार घडत गेले तर अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे धाव घ्यायची का?

दत्ता वाकणकर यांनी गोविंदराव-गंगाबाई, कृष्णाजीपंत-सरस्वतीबाई, मधुसूदन यांच्या हकिकतींद्वारे एक चमत्कृतिपूर्ण घटनाक्रम पेश केला आहे. गोविंदरावांच्या पत्नीला (गंगाबाईला) स्वप्नामध्ये भावी घटनांचे संकेत मिळतात. अमेरिकेत आपल्या मुलाकडे गेल्यावर नातवाबरोबर रममाण होतानाही गंगाला असेच संकेत मिळतात आणि तिचे आकस्मिकपणे निधन होते. गोविंदरावांना एकट्यालाच भारतात परतावे लागते. त्यांचा मुलगा एक प्लॉट घेण्यास सांगतो. तसा प्लॉट वाईला उपलब्ध होतो. त्याचा व्यवहार कृष्णाजीपंत वकील पूर्ण करतात. ते आपल्या पत्नीच्या संदर्भातले विचित्र अनुभव सांगून एक मृत्युपत्र दाखवतात. १८६३ सालच्या त्या मृत्युपत्रात कृष्णाजीपंतांच्या पूर्वजांकडे एका संन्याशाने ४०० रुपये मृत्युपत्राद्वारे देऊन त्यांची विशिष्ट प्रकारे विल्हेवाट लावण्यास सुचवलेले असते. काही कारणाने त्यांना तसे करणे जमत नाही. त्यामुळे त्या संन्याशाच्या वतीने कृष्णाजीपंतांच्या पत्नीला अतृप्त आत्मे त्रास देतात. भोरच्या मांत्रिकाद्वारे त्या आत्म्यांचा तपास लावला जातो आणि नरसोबाच्या वाडीला जाऊन शिवाश्रम मार्जन विधीने त्यांची नेमकी तक्रार कळून त्याबाबत पूर्ततेचे आश्वासन दिल्यावर पिशाचांपासून मुक्तता होते. कृष्णाजीपंतांचा मुलगा मधुसूदन याला छायाज्योतिष्याचा पडताळा येतो... हे सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी या पुस्तकात मांडले आहे. ते वाचकाला थक्क करते.

आत्मा, मानवी मन, परलोकविद्या, संन्यासधर्म, मंत्रतंत्र-मांत्रिक, मृत्यूबद्दलचे समज, पिशाच विद्या, पुनर्जन्म याबद्दलही वेदान्त व अन्यत्र आलेल्या तपशिलांबाबतचे विवेचनही परिशिष्टात आले आहे. प्रा. आर. डी. करमरकर यांनी या घटनांची माहिती घेऊन १९५१ साली 'पिशाचांच्या जगात' या पुस्तकात दिलेली आहे. त्यातीलही टिपण उद्धृत केले आहे. त्यामुळे वाचकांचे कुतूहल चांगलेच चाळवले जाते. अत्यंत नाट्यपूर्ण ओघवत्या भाषेत वाकणकरांनी विविध व्यक्तींची आकर्षक व्यक्तिमत्त्वे उभी केली आहेत. अतींद्रिय अनुभवांविषयी त्यामुळे आकर्षक वाटेल. (ग्रंथविशेष प्रतिष्ठान, ९८२३२६१०२३)

**शंकर सारडा**

# द पेज थ्री मर्डर्स




□**कल्पना स्वामीनाथन्**
अनु. निर्मला मोने

**किंमत २००रु. पोस्टेज २५ रु.**

प्रत्येक खुनाच्या फाईलमध्ये शेवटी एक कोरं पान, वर एल.आर. असं लिहून ठेवलेलं असायचं. ते लल्लीसाठी असे साठीची आणि रुपेरी केसांची, ती अधिकृतपणे पोलीसफोर्समधून निवृत्त झाली होती; पण तरी त्यांचा 'अखेरचा आधार' – लास्ट रिसॉर्ट – होती. विशेषत: खुनाची केस हाताळताना.

एका वीकएन्डला यथेच्छ उत्तम खाण्यापिण्याच्या पार्टीसाठी लल्ली आणि तिची भाची, हिला ड्रायव्हरच्या समुद्रकाठच्या राजेशाही बंगल्यात जातात तेव्हा खून हा शब्दही मनात नसतो. लल्लीची भाची स्वैपाक्याच्या प्रेमात पडण्याच्या घाईला आलेली. 'पेज थ्री' संस्कृतीतली अनेक, नेहमी भेटणारी माणसंही असतात. एका प्रसिद्ध, लोकप्रिय **कादंबरीकार**, एक **जाझ नर्तक**, एक हृदयभंग झालेली **मॉडेल**, नाट्यमय भूतकाळ असणारी एक तापट **स्त्रीवादिनी** आणि एक सभ्य **गृहिणी**; पण नकोसा भूतकाळ असलेला , उत्तम व्यवसाय असणारा एक **डॉक्टर** आणि घोड्यांची आवड असणारा एक **उद्योगपती.** प्रत्येकाजवळ एकेक खास गुपित. ते ऐकवायला श्रोता गाठण्यासाठी तो उतावीळ.

ती एक संस्मरणीय पार्टी झाली असती; पण स्वैपाक्यानं तीत शाही पक्वान्नाशिवाय आणखीही काही दिलं.

पदार्थांच्या मेनूत एक खूनही होता. हिलाच्या सुदैवानं लल्लीनं खुनाच्या सोडवणुकीची सारी सूत्रं स्वत:कडे घेतली; कारण लल्ली सामान्य पाहुणी नव्हतीच.

# पुस्तक परिचय

## धीरूभाई अंबानी यांनी सर्वांगीण यशासाठी अधोरेखित केलेली सूत्रे

## धीरूभाईझम

**ए. जी. कृष्णमूर्ती**
**अनु. सुप्रिया वकील**



**‘रि**लायन्स’ हा भारतातील आज अग्रगण्य उद्योगसमूह ठरला आहे. त्याचे संस्थापक धीरूभाई हिराचंद अंबानी. औद्योगिक घराण्याची कसलीही पार्श्वभूमी नसलेल्या धीरूभाईंनी गुजरातमधल्या छोरवाड या छोट्याशा गावातून मॅट्रिक पास होऊन एडनमध्ये ए.बेस्सी या कंपनीत नऊ वर्षे पेट्रोल पंपावर अटेन्डंटसारखी कामे करून भारतात परतल्यावर वयाच्या चौतिसाव्या व्या वर्षी नरोडा येथे कापड उत्पादनास आरंभ करून व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली. भांडवलाची गरज असताना बँकांनी तोंडाला पाने पुसली तेव्हा आपल्या कंपनीचे भागभांडवल सामान्य मध्यमवर्गीय लोकांना विकून अंबानींनी लक्षावधी रुपये गोळा केले. भागधारकांना बँकांच्या व्याजदरापेक्षा जास्त डिव्हिडंड देऊन लक्षावधी भागधारकांना औद्योगिक गुंतवणुकीकडे वळवले. तोपर्यंत शेअर मार्केटमधील गुंतवणूक ही फक्त श्रीमंत व्यापारी घराण्यांचीच मिरासदारी होती... नंतर यार्न, पॉलिएस्टर, पेट्रोकेमिकल्स, तेल आणि वायु शुद्धीकरण वगैरे क्षेत्रात धीरूभाईंनी मुसंडी मारली आणि टाटा-बिर्ला यांच्यासारखा शतकावर औद्योगिक उत्पादन क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या घराण्यांपेक्षाही अधिक संपत्ती मिळवून अवघ्या तीस वर्षांच्या अवधीत आघाडी घेतली. पासष्टाव्या व्या वर्षी धीरूभाईंचे देहावसान झाले. त्यांचे दोन पुत्र मुकेश आणि अनिल यांच्यात धीरूभाईंच्या पश्चात दोन वर्षातच विभाजन झाले. आज त्यांची आपापसात स्पर्धा सुरू आहे. कोर्टकचेऱ्या चालू आहेत. परंतु दोघांचाही व्याप वाढतो आहे.

धीरूभाईंनी औद्योगिक उत्पादन क्षेत्रात हे जे यश मिळवले त्याचे रहस्य काय? त्यांनी ज्या वातावरणात हे यश मिळवले, भारत सरकारच्या लायसन्स परमिट राज्याच्या जमान्यात येथील नाठाळ नोकरशाहीला वश करून ज्याप्रकारे नवनवीन कारखाने सुरू केले, त्याला तोड नाही. गुरू हा चित्रपट त्यांच्या जीवनाशी नाते सांगणारा आहे. धीरूभाईंची भूमिका त्यात अभिषेक बच्चन यांनी केली आहे.

धीरूभाईंनी आपल्या आयुष्यात हे जे यश मिळवले, त्याचे श्रेय त्यांची जीवनदृष्टी आणि विचारसरणी यांना द्यायला हवे. त्यांच्या धडाडीला आणि कर्तृत्वाला द्यायला हवे.

त्यांच्या जीवनदृष्टीत आणि विचारसरणीत वेगळे असे काय होते?

त्यांच्या मुद्रा या जाहिरात संस्थेचे प्रमुख ए. जी. कृष्णमूर्ती यांनी दीर्घकाळ धीरूभाईंना जवळून बघितले. त्यांच्याबरोबर काम केले. त्यांच्या स्वभावाचे आणि विचारांचे, कार्यपद्धतीचे आणि भविष्याचा वेध घेण्याच्या द्रष्टेपणाचे अवलोकन केले. त्यावर आधारित एक लेखमाला लिहून ‘धीरूभाईझम’ हे पुस्तक तयार केले. त्याचा मराठी अनुवाद धीरूभाईझम याच नावाने प्रसिद्ध झाला आहे. सुप्रिया वकील यांनी तो केला आहे. धीरूभाईझम हा नवा शब्द कृष्णमूर्तींनी

घडवला आहे. धीरूभाईंचे तत्त्वज्ञान या अर्थाने.

कृष्णमूर्तींनी धीरूभाईझम तत्त्वज्ञान ॲकॅडमिक चौकटीत मांडावे अशी अपेक्षा असण्याचे कारण नाही. धीरूभाईंच्या एकूण कार्यपद्धतीवरून काही जीवनविषयक सूत्रे समोर येत गेली, त्याकडे अंगुलिनिर्देश करणे एवढाच मर्यादित हेतू ठेवून तासा-दीड तासात वाचून व्हावे असे हे छोटे पुस्तक तयार केले आहे.

धीरूभाईंच्या पहिल्याच भेटीत ए. जी. कृष्णमूर्ती यांना धीरूभाईंच्या विलक्षण, आश्चर्यकारक, रसरसलेल्या जीवनशक्तीचा प्रत्यय आला. त्यांचे बोलणे ऐकताना समोरचा माणूस त्यात गुंगून जायचा. त्या बोलण्यात उत्कटता असे. स्वत:बरोबर समोरच्या श्रोत्याला आपल्या भव्य स्वप्नांच्या दुनियेत घेऊन जाण्याची धीरूभाईंची अचाट कला... त्यांना प्रभावित करून गेली. धीरूभाई इतर बॉस मंडळींपेक्षा त्यांना निराळे वाटले. ते आपल्या कर्मचाऱ्यांचा आदर करीत. त्यांना मनमोकळेपणाचे कौतुक वाटे...

त्या भेटीनंतर काही आठवड्यातच ए. जी. कृष्णमूर्ती यांनी धीरूभाईंच्या 'मुद्रा' या नव्या कंपनीचा कार्यभार स्वीकारला. पुढची अठ्ठावीस वर्षे कृष्णमूर्ती आणि अंबानी यांचे घनिष्ठ संबंध राहिले. धीरूभाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू त्यांना जाणवले. 'पाताळगंगा' जवळच्या जाहिरात फलकावर एक चूक आढळली तर धीरूभाईंनी लगेच कृष्णमूर्तींना फोन केला. अहमदाबादहून विमानाने कृष्णमूर्तींनी लगेच पाताळगंगा गाठून त्या फलकातील चूक दुरुस्त केली. अशासारखे किस्से या पुस्तकात येतात तेव्हा धीरूभाईंचे प्रत्येक गोष्टीवर किती बारीक लक्ष असे हे तर लक्षात येतेच; अशा गोष्टींबाबत लगेच कृती करण्याची त्यांच्या अधिकाऱ्यांची तत्परता ही देखील त्याद्वारे दिसून येते. ते बॉस म्हणून लाभले हे आपले परमभाग्य असे कृष्णमूर्ती मानतात, यात काही नवल नाही.

एक सामान्य एक्झिक्युटिव्हपासून 'मुद्रा'चा संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष येथपर्यंतची मजल कृष्णमूर्तींनी मारली; भारतातील अग्रगण्य जाहिरात कंपनीत 'मुद्रा'चा समावेश होऊ लागला. रिलायन्स समूह हा धीरूभाईंच्या अदम्य जिद्दीचा आणि महत्त्वाकांक्षेचा, बांधीलकीचा आणि विचारमूल्यांचा निदर्शक आहे. अलौकिक द्रष्टेपणा आणि अभूतपूर्व अनुकंपा यांचे विलक्षण रसायन धीरूभाईंच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेले होते असे कृष्णमूर्तींना वाटते.

कृष्णमूर्तींना जाणवलेली धीरूभाईंच्या विचारातील प्रमुख सूत्रे पुढीलप्रमाणे:

१. मदतीसाठी सदैव तत्पर राहा.

२. आपल्या टीमला सुरक्षाकवच बनून जपत राहा.

३. प्रसिद्धीचा हव्यास न बाळगता लोककल्याणाची कामे करीत राहा.

४. भव्य स्वप्ने बघा, पण डोळे उघडे ठेवून बघा.

५. आपल्या सहकाऱ्यांना आपुलकीने वागवा. त्यांच्या खांद्यावर हात ठेवा.

६. आकर्षक उत्पादने बाजारात आणा. पुरवठ्यामुळे मागणी निर्माण होते.

७. पैसा हे उत्पादन नाही. ते जोड उत्पादन आहे. उत्पादन उत्तम करा. पैसा मिळेलच. उत्तम उत्पादन तुमचे आणि ग्राहकांचे संबंध कायमचे दृढ करते.

८. व्यावसायिकाला एकट्याने काम करण्याचे स्वातंत्र्य द्या. केवळ आज्ञा पाळणारा गुलाम कर्मचारी म्हणून वागवू नका.

९. सतत आपली कक्षा बदलत राहा. आपण जेव्हा आपली कक्षा जाणीवपूर्वक बदलतो तेव्हा त्याचा लाभ आपल्यालाच नव्हे तर आपल्याशी संलग्न असलेल्या प्रत्येकाला होतो. 'विकसनशील देश'ची कक्षा बदलून 'विकसित देश' म्हणून भारताकडे बघायला लागा, देशाचा विकासदर निश्चित वाढेल. कक्षाबदलामुळे नवी झेप घेण्याची प्रेरणा मिळते.

१०. आपली स्वप्ने वास्तवात आणण्याची क्षमता आपल्या अंगी आहे असा आशावाद बाळगा. कठोर परिश्रमाला अशा दुर्दम्य आशावादाची जोड मिळाली तर उत्तुंग भरारी घेता येईल. वारसा किंवा विशेषाधिकार, संपन्न पार्श्वभूमी नसतानाही केवळ आशावादाच्या आणि परिश्रमाच्या बळावर धीरूभाईंनी अवघ्या पंचवीस वर्षांत फॉर्च्युन ५०० यादीत स्थान मिळवले. असे स्थान मिळवणारी भारतातील खाजगी क्षेत्रातील रिलायन्स हीच पहिली कंपनी होती. थिंक बिग, भव्य योजना आखा. आशावाद बाळगा.

११. सर्वजण हे आपले मित्र आहेत, प्रत्येक माणूस आपल्याला मदत करायला तयार आहे असे समजून सर्वांशी आपुलकीने वागा. शिपायापासून ते अध्यक्षापर्यंत सर्वजणांना धीरूभाई मित्र म्हणून वागवत; त्यांच्याशी संवाद साधत. जेव्हा मोबाईल मिनिटाला १६ रुपये दराने उपलब्ध झाला तेव्हा धीरूभाई म्हणत, ''मोबाईल पास्टकार्डापेक्षाही स्वस्त व्हायला हवा...'' आज ते स्वप्न प्रत्यक्षात आलेले आपण बघतो आहोत. सामान्य माणसाला काय हवे हे धीरूभाईंना चांगले ठाऊक होते. कारण सामान्य माणसाशीही त्यांचे मित्रत्वाचे संबंध असत.

१२. थिंकिंग बिग-भव्य विचार करा. एखादे नवे उत्पादन बाजारात आणताना ते दणक्यात आले पाहिजे; यावर त्यांचा कटाक्ष असे. 'ओन्ली विमल'ची एकशे एक दुकाने त्यांनी १९७० च्या दशकात भारतभर दणक्यात एकदम सुरू केली. त्यासाठी देशभरात भव्य फॅशन शोज् आणि रोड शोज् आयोजित केले. बंगलोरमध्ये ओन्ली विमलची शोरूम उघडताना हेलिकॉप्टरमधून बंगलोरच्या नागरिकांवर गुलाबपाकळ्यांचा आणि माहितीपत्रकांचा वर्षाव केला. १९७७ साली ३ कोटी

रुपये त्यांनी केवळ विमलच्या जाहिरातीसाठी खर्च केले. टीव्हीवर जाहिरातींचा झपाटा लावला. रिलायन्सची ब्रँड इमेज त्यामुळे ऐंशीच्या दशकात भारतभर तयार झाली.

१३. भव्य स्वप्ने बघा; त्या स्वप्नांवर पकड ठेवा. ती स्वप्ने वास्तवात उतरविण्यासाठी सर्वस्व झोकून द्या. ॲडेनमध्ये ए.बेस्सी कंपनीच्या पेट्रोल पंपावर काम करीत असताना धीरूभाईंना त्या बंदरातील जहाजांना तेलाचे नमुने आणि वंगणे किती मोठ्या प्रमाणावर लागतात याची कल्पना आली... त्या व्यवसायाचे महत्त्व त्यांच्या मनावर ठसले...१९९५ साली, वयाच्या त्रेसष्टाव्या व्या वर्षी त्यांनी जामनगरला तेल शुद्धीकरणाची जगातील सर्वांत मोठी रिफायनरी सुरू केली. स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी मार्गात वेळोवेळी आडव्या येणाऱ्या अडीअडचणींना तोंड देण्याचीही तयारी व क्षमता हवी... तरच अशक्य ते शक्य होते.

१४. तुम्ही आपल्या सहकाऱ्यांवर भरवसा ठेवा. आपल्या माणसांच्या भरवशावर कोणताही धोका पत्करता येतो. रिलायन्स नरोडा सुरू करताना त्यांच्या मदतीला मोजकीच माणसे होती. ती माणसेही तांत्रिक ज्ञानात फारशी वाकबगार नव्हती. परंतु त्यांच्यावर धीरूभाईंनी संपूर्ण जबाबदारी सोपवली. आपल्यावर एवढा विश्वास दाखवला आहे; त्या विश्वासाला तडा जाता कामा नये या भावनेने सर्वच जणांनी आपल्या प्रयत्नांची शर्थ करून तो कारखाना व्यवस्थित चालावा या दृष्टीने काम केले. माणसांच्या अंगी खूप क्षमता असतात; त्यांना वाव दिला गेला तर त्या क्षमतांना फुलण्यास अवसर मिळतो, अर्थात आपले सहकारी म्हणून कोणाही व्यक्तींची निवड करताना धीरूभाई दक्ष असत. माणसाची त्यांना चांगली पारख होती. कोणीही माणसाच्या अंगी असणाऱ्या कौशल्यांचा छडा लावण्यात धीरूभाई प्रवीण होते. त्यामुळे धोका पत्करण्याचे धाडस ते दाखवत. त्याबाबत कधी त्यांना पश्चात्ताप करावा लागला नाही.

१५. जीवनाबद्दल नेहमी सकारात्मक दृष्टिकोन बाळगा, असे ते म्हणत. त्यामुळे अडीअडचणी आल्या तरी ते कधी नाउमेद झाले नाहीत. गिरण्यांच्या विस्तारीकरणासाठी प्रचंड गुंतवणूक करण्याची गरज होती; बँका कर्ज द्यायला तयार नव्हत्या. तेव्हा नकारात्मक विचार न करता त्यांनी शेअर मार्केटचा उपयोग करून घेतला. शेअर्स विक्रीला काढले आणि जनसामान्यांकडून भागभांडवल मिळवले. भारतीय रोखेबाजाराची भावी दिशाच बदलून टाकली. ज्यांनी १९७७ साली १०० रुपये रिलायन्समध्ये गुंतवले, त्यांना पंधरा वर्षांनी वीस हजारावर रुपये डिव्हिडंड आणि बोनसच्या रूपात मिळाले. इतक्या मोठ्या प्रमाणावर परतावा देणारी दुसरी कोणतीही उत्पादन संस्था त्यावेळी नव्हती. त्यांच्या सकारात्मक

दृष्टिकोनामुळे भारतीय उद्योगधंद्याचे स्वरूप पालटले. ''आशा, आत्मविश्वास आणि श्रद्धा यांच्या बळावर नकारात्मक शक्तींना आव्हान द्या. महत्त्वाकांक्षा आणि पुढाकार घेऊन काम करा. हमखास यश मिळेल.'' असे तरुण उद्योजकांना ते सल्ला देत.

या पुस्तकाला मुकेश अंबानी यांनी दिलेली प्रस्तावनाही प्रेरणादायक आहे. मुकेश अंबानी यांनी आपल्या पप्पांचे अनेक गुण प्रकट केले आहेत. ''आपल्या सहकाऱ्यांनी सर्वोच्च दर्जाची कामगिरी करून दाखवण्याची सतत प्रेरणा देत राह्यला हवे.... दुर्बल व वंचित घटकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्रातील परहित भावना प्रभावीपणे प्रकट व्हायला हवी असे ते मानत.''

''आपल्याला तसेच नव्या पिढीतील उद्योजकांना पुनरुत्थानाच्या नवकल्पनांचे शिलेदार म्हणून कार्यरत राहण्याची प्रेरणा धीरूभाई देत आहेत'' अशी त्यांची श्रद्धा आहे.

.... तशीच प्रेरणा वाचकांनाही हे पुस्तक देत राहील.

**किंमत : ८०रु. सभासदांना : ५६रु. पोस्टेज : २५रु.**

# ऑपरेशन मोलॅस्सिस




## अरुण हेबळेकर

एका जिज्ञासू भारतीय संशोधकाचा परदेशात झालेला अचानक मृत्यू आणि त्यातूनच त्याच्या सामान्य बहिणीला विचित्र वाटेवर खेचून नेणारं अतर्क्य गुपित...

**किंमत १२०रु.**
**पोस्टेज २५रु.**

# पुस्तक परिचय

## एका मनस्वी गुर्जर स्त्रीच्या जीवनाची चित्तवेधक वाटचाल

## अक्षयपात्र

**बिन्दु भट्ट**

अनु. अंजनी नरवणे



**अं**जनी नरवणे यांनी गेल्या पंधरा वर्षांत गुजरातीतून मराठीत दहा कादंबऱ्या आणून दोन भाषांमध्ये जो सेतू बांधला आहे, त्याला एक आगळे महत्त्व आहे. त्यापैकी चारपाच कादंबऱ्या मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाल्या आहेत.

'सागरतीरी' ही सौराष्ट्राच्या सागरपट्टीत राहणाऱ्या स्वाभिमानी कर्तव्यपरायण 'अवल'ची कहाणी सांगते; तर 'अणसार'मध्ये एका संपन्न श्रीमंत कुटुंबातील तरुणीला कुष्ठरोगामुळे प्रियजनांपासून दूर राहावे लागल्याचे दुःख प्रकट झाले आहे. 'गहाण पडलेली टेकडी'मध्ये साबरकांठा या अवर्षणग्रस्त भागातील आदिवासी जीवनाचे चित्रण आढळते... 'बावडी'मधील दरिया ही ग्रामीण महिला मनाचे संतुलन गमावलेल्या आपल्या नवऱ्याला सांभाळून कुटुंबाचीही काळजी घेते; तर 'रेतीचा पक्षी'मध्ये दोन तरुण मुले असणाऱ्या बिजवराशी लग्न करून सुनंदाला नवीन संसार मांडताना करावे लागलेले दिव्य जाणवते... गुजरातच्या निरनिराळ्या भागातील जनजीवनाची ही रूपे वेधकपणे वाचकांपुढे उभे करणाऱ्या, वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्या अनुवादासाठी निवडण्यात अंजनी नरवणे यांची प्रयोगशीलता दिसते. अखेपातर (अक्षयपात्र) ही बिन्दु भट्ट या लेखिकेची साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणारी कादंबरी अंजनी नरवणे यांनी आता मराठीत आणली आहे.

अक्षयपात्र म्हणजे श्रीकृष्णाने द्रौपदीला दिलेले पात्र. पांडवांना वनवासाचे कठीण दिवस या अक्षयपात्रामुळे खाद्यपदार्थांची कमतरता न भासता काढणे शक्य झाले होते. इच्छा असेल ते सर्व अक्षयपात्राद्वारे मिळू शके.

या कादंबरीतले अक्षयपात्र म्हणजे एक पितळी तसराळे आहे. ते तसराळे रुखीभाभींनी कंचनबांना दिलेले आहे. ते त्यांना जगण्याची, संकटाशी झुंजण्याची ताकद देते. वेळोवेळी आलेल्या आपत्ती, घरावर झालेले आघात - यातूनही कंचनबांचे पाय जमिनीवर भक्कम टिकवून ठेवणारे हे अक्षयपात्र आहे. ''काळ हीच सर्वांत मोठी शक्ती आहे. सुखाची शीतल सावली जर कायम टिकत नाही तर दुःखाचा लाव्हाही टिकणार नाही असा संदेश हे अक्षयपात्र कंचनबांना देत असते.'' सगळे काही काळावर सोपवून द्यायचे आणि संघर्ष करीत राह्यचे अशी प्रेरणा हे अक्षयपात्र आपल्याला देते आहे अशी त्यांची भावना होती. ''आपल्या आयुष्यात ही एक मात्र कमाई... ते तसराळं म्हणजे इतिहासाच्या बोधपाठाचं स्मृतिचिन्ह आहे'' असे त्या मानत.

घर सोडून जाताना हे अक्षयपात्र मोडीत काढण्याची कल्पना कंचनबांचा मुलगा चंद्रकांत बोलून दाखवतो, किंवा रुखीभाभींना ते परत देऊन टाकावे असेही तो सुचवतो. त्याला ते तसराळे म्हणजे भूतकाळाची नकोशी आठवण वाटे... परंतु कंचनबाचा मात्र त्या तसराळ्यावर जीव असतो आणि त्या गाव सोडून जायला निघतात तेव्हा दोन जोड कपड्यांबरोबर पिशवीत ते तसराळेही आवर्जून घेतात.

या कादंबरीचा आकृतिबंध लक्षणीय आहे. अवघ्या तीन दिवसांत संपूर्ण आयुष्याचा पट उलगडून दाखवला आहे.

कंचनबा आपल्या गावी दहा वर्षांनी परत येतात आणि आपल्या मैत्रिणीकडे किंवा आपले घर ज्यांना विकले आहे त्या ठाकोर साहेबांकडे न जाता ठाकुरजींच्या मंदिरात जातात आणि सतीमांचे दर्शन घेतात. त्यांची जिवाभावाची सखी त्यांना घरी चलण्याची विनंती करते; परंतु त्या मंदिरातच राहण्याचा निर्धार व्यक्त करतात. ''इथं शक्तिमाच्या मंदिरात राहूनच अनुष्ठान करायचंय... दोन दिवसांचं..'' ही मंदिराची ब्राह्मणवस्तीतली जागा काही पिढ्यांपूर्वी ठाकोरसाहेबांनी कंचनबांच्या पूर्वजांना दिली होती. सती गेलेल्या एका मुलीच्या स्मरणार्थ तेथे चबुतरा बांधण्यात आला होता आणि त्या सतीमांच्या चबुतऱ्याशी नारळ फोडण्याचा रिवाज गावातले सर्व लोक साखरपुड्याच्या वेळी भक्तिभावाने पाळत असतात. साखरपुडा झाल्यावर एक तरुण रानात गाई परत आणायला गेला आणि त्याचे देहावसान झाले. तेव्हा त्याची ठरलेली वधू त्याच्या चितेत उडी घेऊन सती गेली... त्यावेळेपासून गावात सतीमांची सर्वजण अशी आठवण ठेवतात. त्याच चबुतऱ्याजवळ ठाकोरसाहेबांनी सात वर्षांपूर्वी शक्तिमांचे मंदिर बांधून आपला कुठलासा नवस पूर्ण केला होता..

अठ्ठ्याहत्तर वर्षांच्या कंचनबा सतीमाच्या समाधीसमोर बसून मनोमन म्हणतात, ''ही सतीमां साक्षी आहे... मी कधी आपले कर्तव्य पाळण्यात कसूर केलीय का? ऐंशिव्या वयात अजून किती दिवस मी अशी कामं करीत राहू? तरीही मा, तुला माझी परीक्षाच बघायची असेल तर एक काम कर- मला शक्ती दे.''

शक्तिमांचं दर्शन घ्यायचं तर मंदिराचं गाभाऱ्याचं दार बंद असतं. त्यामुळे मंदिराच्या ओसरीची लोखंडी जाळी उघडून कंचनबा आत जातात. जळमटं आणि धूळ बघून नव्या पुजाऱ्याच्या कामसूपणाची पारख करतात. स्वत:च केरसुणी घेऊन झाडायला लागतात... बसण्याइतपत जागा स्वच्छ करून टाकतात...

त्यांची पंचाहत्तर वर्षे वयाची मैत्रीण रुखीबा येते. घरी चल म्हणते. चहापाणी... नाश्ता... पण कंचनबा म्हणतात, ''दोन दिवसांचं अनुष्ठान इथं राहूनच करायचंय...''

रुखीबा म्हणते, ''या उघड्या अंगणात... साप, किरडू...मोठा धोका आहे.''

कंचनबा म्हणतात, ''तुम्ही निश्चिंत राहा... मढ्यावर वीज पडत नाही.''

रुखीबा चकित होतात... ''काय झालंय कंचनबांना?... त्या चटदिशी काही सांगणार नाहीत... पण काहीतरी झालंय नक्की?...''

कंचनबा मग रुखीबांच्या मुलाबाळांची, सून-नातवंडांची चौकशी करतात...

रुखीबा, हरजी पटेल, जयुभा ठाकोर, रंजन, जगदीश पुजारी, राखीव वर्गातील सरपंच सविताबहेन, आमदार शनाभाई वगैरे गावातले माणसे भेटायला येतात... जुन्या आठवणींना उजाळा मिळतो.

कंचनबांचे बालपण जसापरमध्येच गेलेले. वडील ज्येष्ठाराम (बापूजी) कराचीला नोकरी करीत. ते एकदा आजोबा, आजी आणि सर्वांनाच कराचीला घेऊन जायला आले.

तेव्हा आजी-आजोबांनी या उतारवयात परदेशात जावेसे वाटत नाही म्हणून नकार दिला. कंचन आणि विश्वनाथ- हे वडिलांबराबर कराचीला गेले. आगगाडीचा पहिला प्रवास... कराची शहराचे, समुद्राचे पहिले दर्शन... सारेच विलक्षण!

कंचनचे वडील ज्येष्ठाराम व्यास हे शेठ देवशंकर यांच्या पेढीवर काम करीत असतात. त्या देवशंकरांचा मुलगा अमृत पंधरा वर्षांचा... त्याचे लग्न ज्या मुलीशी ठरलेले असते ती मुलगी तापाने आजारी पडून मरण पावल्याची बातमी येते. सुशिक्षित अमृतला ते लग्न नकोच होते.

...अमृत आणि कंचन यांचे लग्न होते. लग्नाचं पहिलं वर्ष एकमेकांचा शोध घेण्यात; शरीराची रोज नवी पडणारी कोडी सोडवण्यात जातं. एकाला उत्तर सापडायचं तर दुसऱ्याचा प्रश्नच हरवून जायचा... कंचनचे मन 'देवव्हिला'मध्ये स्थिरावत गेले. देवशंकर शहराचे मेयर झाले. कंचनचा पायगुण म्हणून तिचे महत्त्व वाढले. कराचीत कामधंद्यानिमित्त येणाऱ्या गुजराती माणसाला पहिले काही दिवस देवशंकरांचा पाहुणचार ठरलेला! ''माझ्याकडे आलेला कोणीही अतिथी आतिथ्याशिवाय जाता कामा नये. कोणाच्या भाग्याने हे सर्व लाभले आहे कोणास ठाऊक!'' तशात कंचनला पहिला मुलगा झाला गौतम. नंतर दुसरा मुलगा होतो चंद्रकांत.

अमृतने लंडन चेंबर ऑफ कॉमर्सचा तीन वर्षांचा कोर्स करायचे ठरवले. त्याचप्रमाणे आयातनिर्यातीत लक्ष घातले. त्याकाळात स्वातंत्र्य चळवळ जोरात होती. बदलत्या काळाची दिशा ओळखून व्यवसायाचे स्वरूप बदलले. बँकेचे संचालकपद मिळवले. तीन चित्रपटगृहे सुरू केली. त्यात कधीकधी नाटकाचे प्रयोगही होऊ लागले. इंग्लिश चित्रपटही लावले जात. कराचीला काँग्रेसचे अधिवेशन भरले. गांधी-नेहरूंची भाषणे कंचनला ऐकायला मिळाली. तेथेच तिला तिची मामेबहीण ललिता बऱ्याच वर्षांनी भेटली. ती बालविधवा असते. ती स्वामीनारायण पंथाची दीक्षा घेऊन गांधीजींच्या चळवळीत झोकून देते. बेचाळीसच्या आंदोलनात ललिता व तिच्या मैत्रिणी गुप्तपणे पत्रके छापताना पकडल्या जातात. त्यातील शारदा बहनला पोलिस जिवंत जाळून टाकतात. तिच्या बलिदानाची नोंद कोठेही घेतली जात नाही. ललिता 'लढून मरायची' प्रतिज्ञा करते. तिचा हा क्रांतिकारक जहालपणा कंचनमधल्या गृहिणीला धोकादायक वाटतो. ती ललिताला दुसरीकडे राहण्याची व्यवस्था कर असे सांगते. ललिताबरोबर तिची नणंद जया (हीही बालविधवा असते) जाते. त्याच रात्री कंचन तिसऱ्यांदा बाळंत होते. मुलगी होते अरुणा...

कराची पाकिस्तानात जाणार... आपण शक्य तितक्या लौकर येथून निघून जायला हवे हे अमृतच्या लक्षात येते. जातीय दंग्यात निभाव लागणार नाही असे अस्वस्थतेचे वातावरण. घरदार चीजवस्तू सर्व काही सोडून घाईगर्दीत निघणे भाग पडते. त्यात गौतम हरवतो. त्याला बघण्यासाठी गोडाऊनच्या मागे गेल्यावर तिच्यावर चौकशीदार जबरदस्ती करतो. ती कशीबशी सुटका करून पळ काढते.

पती अमृत जहाज सुटेपर्यंत येऊ शकत नाही. कंचन आपल्या आजारी सासऱ्याला घेऊन नवरा आणि थोरला मुलगा यांच्याशिवायच जहाजात चढते. चंद्रकांत आणि अरुणा ही मुले बरोबर असतात. बोटीवर भयानक गर्दी. तीन दिवसांनी कंचन निर्वासित कँपात... नंतर जसापरला माहेरच्या घरात...

फाळणीने कंचनबाच्या सगळ्या घरादाराची, कुटुंबाची वाताहत होते. नवरा दुरावतो. मोठा मुलगा गौतम हरवतो. त्याच्या कमरेला बांधलेले रुपये जातात. सासरेही बोटीवरच दम सोडतात...

जसापूरला आल्यावर ठाकोरसाहेब शिधा देत... त्यावर महिनाभर चूल पेटली. पुढे काय करायचे हा प्रश्न. माधुकरी हाच पर्याय होता. पौरोहित्य करणे, शास्त्रोक्त पूजा सांगून पोटापुरते मिळवणे... अटळ होते. रुखीभाभी म्हणते, ''पीठ मागायला जायचं नाही. दुसऱ्यानं आपण होऊन देऊ केलेलं घ्यायचं नाही. कोण समजता तुम्ही स्वत:ला?''

''भाभी, आजपर्यंत मी देवाजवळही कधी काही मागितलं नाही.''

''तीच तर विचार करण्यासारखी गोष्ट आहे. देव तरी इथं कुणी बघितलाय? देव म्हणा की माणूस म्हणा... सगळं एकच. जो गरजेला मदत करतो तो देव.''

कंचनबा मग पौरोहित्याची कामे आणि कथाकहाण्या सांगणे वगैरे सुरू करते... थोडाफार जम बसू लागतो. मुले शाळेत जाऊ लागतात. वडील काय करतात असा प्रश्न त्यांना विचारला जातो.

''कंपालामध्ये धंदा करतात.'' असे उत्तर कंचन देते. ती कुंकू लावत असते. नवऱ्याचे काय झाले असा प्रश्न तिला पडतो. तो कराचीतच राहिला असेल का? मुसलमान झाला असेल का? सारेच तर्क!

चंद्रकांत मॅट्रिक होतो. पुढच्या शिक्षणासाठी अहमदाबादला जातो. त्याला एकूणच जसापरमध्ये स्वारस्य नसते... पुढे तो तेथेच नोकरी मिळवतो.

कराची सोडून आल्यावरची वीस वर्षे भरभर जातात.

चंद्रकांतच्या लग्नाचे बघायला हवे म्हणून कंचनबा अहमदाबादला येते. चंद्रकांतने स्वत:च मुलगी पसंत केल्याचे तिच्या लक्षात येते. त्याच्याच ऑफिसमध्ये काम करणारी विशाखा. कंचन विशाखाच्या आईला भेटून सांगते, ''चंद्रकांत जितका माझा मुलगा... तितकाच तुमचाही... आपण लग्नाचं पक्कं करून टाकलं पाहिजे... आम्ही जेमतेम खर्चाची तोंडमिळवणी करणारी गरीब माणसं आहोत...

जरा बेताबेतानंच करावं लागेल... माझ्या घरी येऊन तुमची मुलगी दु:खी होणार नाही एवढं मात्र नक्की!''

लग्न ठरवून कंचनबा जसापरला येते. तेथे एक पत्र तिची वाट बघत असते. ते इंग्रजीतले पत्र वाचून घेण्यासाठी कंचन ठाकोरससाहेबांकडे जाते.

ते पत्र ईव्हचे असते. कंपालाहून आलेले.

''पंधरा वर्षापूर्वी श्री. अमृत शुक्ल आमच्या इस्टेटीचे मॅनेजर म्हणून काम करू लागले. त्यांच्याशी माझे लग्न माझ्या वडिलांनी लावून दिले... आमचा मुलगा केव्हिन तीन वर्षांनी जन्मला.... दोन महिन्यांपूर्वी अमृतना अपघाती मृत्यू आला.... त्यांच्या खाजगी लॉकरमध्ये सापडलेल्या डायरीवरून तुमचा त्यांच्याशी विवाह झाला आहे हे लक्षात आले... अमृतने तुम्हाला मागे पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर न आल्याने तुम्ही मृत्यू पावला आहात असे समजून डायरीत जागोजाग दु:ख व्यक्त केले आहे... त्याने तुमच्यासाठी काही रक्कम ठेवली आहे. वारसदार म्हणून तुमचे नाव आहे... तुमचे पत्र आल्यावर ती रक्कम तुमच्याकडे पाठवीन.''

त्या पत्राची माहिती कंचनबा मुलांना देते. चुडा उतरवते. कुंकू पुसते. पांढरी साडी नेसते. जसापारचे घर विकून कंचनबा अहमदाबादला मुलाकडे राहण्याची ठरवते. नातवात रमते.

... सात-आठ वर्षे जातात....

एके दिवशी कंचनबाला लंडनहून तार येते... ''मी सहा तारखेला भारतात येत आहे. केव्हिन.'' अशी ती तार असते.

केव्हिनचे नाव कानावर पडल्यावर कंचनबा सुन्न होते.

चंद्रकांत ही तार वाचून आईला सांगतो, ''मी मागे ईव्हच्या पत्राचे उत्तर पाठवले होते. तिने दोन लाख रुपये पाठवले. त्यातून पन्नास हजारांत हे घर घेतले. शेअर बाजारात दीड लाख गुंतवले. मी तुला सांगितले नव्हते... ही माझी चूक...''

कंचनबा हे ऐकताच म्हणते, ''चंद्रकांत, तू चूक नाही केलीस. अपराध केला आहेस. माझ्या दुधाला बट्टा लावला आहेस. मी आता इथं राहू शकणार नाही.''

...आणि कंचनबा मुलाचे घर सोडून जसापारला जाते. तीन दिवस तेथील शक्तिमांच्या देवळात अनुष्ठान करते... या तीन दिवसांत अवघ्या आयुष्याचा पट पुन्हा सगळा न्याहाळते...

कंचनबा येथे का आलीय हे सगळ्या गावकऱ्यांना एक गूढ असते. पुन्हा या देवळाच्या पुजारीपणावर ती हक्क सांगणार का? लोक तर्क करीत राहतात.

पण त्या तीन दिवसांत कंचनबा गेली पन्नास वर्षे जणू पुन्हा जगते. ज्या आठवणी पूर्वी पिळवटून टाकत त्या आठवणींकडे तटस्थपणे बघू लागते. मनावरचे

ओझे उतरल्यासारखे वाटते. मन हलके होते. रागलोभ संपतात. प्रत्येक माणूस स्वत:च्या बुद्धीप्रमाणे, शक्तीप्रमाणे आणि नियतीप्रमाणे चुका करत असतो, सावरत असतो. चुका करतो म्हणून तर तो माणूस असतो... हे तिला जाणवते... मनावरचे अभ्रपटल दूर होते. आता आपली दिशा आपणच ठरवू. ती बरोबर असेल असे तिला कळून चुकते.

ती आपली पिशवी घेते. शक्तिमाच्या मंदिराकडे बघते. बसस्टँडकडे चालू लागते. एक टेंपोवाला थांबतो. ''कुठे चाललाय?''

''कांपमध्ये.''

कंचनबा त्यात बसते...

कंचनबाच्या जीवनाची ही कहाणी... तीन दिवसांच्या जसापारच्या वास्तव्यात गत पन्नास वर्षांची झालेली उजळणी. आयुष्याची अकल्पित फरफट...

फाळणीच्या वेळी कराचीत काय झाले याची गुजराती भाषेत प्रथमच आलेली वास्तवता...

लेखिका बिन्दु भट्ट यांना त्यांच्या सत्त्याऐंशी वर्षे वयाच्या आईच्या आठवणींतून या कादंबरीच्या लेखनाची प्रेरणा मिळाली... कराचीतले तपशील त्या आठवणीतूनच उभे राहिले. 'जन्मभूमी प्रवासी'मध्ये दर आठवड्याला एक प्रकरण अशा स्वरूपात तिचे लेखन झाले. वाचकांनी तिला डोक्यावर घेतले. साहित्य अकादमीने २००३चा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार दिला.

गुजराती जनजीवनाची ही झलक मराठी वाचकांना एक वेगळीच अनुभूती देणारी ठरेल.

**किंमत : २००रु. सभासदांना : १४०रु. पोस्टेज : २५रु.**


**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

# ऑन हर मॅजेस्टीज् सीक्रेट सर्व्हिस




**इयान फ्लेमिंग**
अनु. अजीत ठाकूर

**किंमत २५० रु. पोस्टेज २५ रु.**

टप खाली घेतलेली लान्शिया स्पायडर गाडी त्याच्या शेजारून झपाट्याने पुढे गेली. त्याच्या गाडीच्या बॉनेटला ओझरता स्पर्श करून दूर जाऊ लागली आणि लान्शियाच्या दुहेरी एक्झॉस्ट पाइपमधून घुमणारा आवाज त्याच्या दिशेने येऊ लागला. केसांना भडक गुलाबी रंगाचा रुमाल बांधलेली एक मुलगी ती गाडी चालवत होती. जेम्स बाँडला उत्तेजित करणारी जगात एकच गोष्ट होती, ती म्हणजे एखाद्या सुंदर मुलीने त्याला मागे टाकणे.
बाँड सुंदर पण बिनधास्त मुलीला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करतो, पण त्याचवेळी पृथ्वीवरील एका अत्यंत भयानक व्यक्तीच्या कारवायांचा त्याला सुगावा लागतो. ही व्यक्ती म्हणजे स्पेक्टर या अत्यंत घातक अशा संस्थेचा प्रमुख अर्न्स्ट स्टाव्हरो ब्लोफेल्ड. आल्प्स पर्वतावरील त्याच्या बर्फाच्छादित अशा गुप्त ठिकाणी साऱ्या जगाची सुरक्षितता धोक्यात येईल, असे काही प्रयोग ब्लोफेल्ड करत असतो. या अत्यंत बुद्धिमान परंतु खुनशी माणसाला नष्ट करायचं असेल तर तिथे बाँडला स्वतः जाऊन महत्त्वाची माहिती गोळा करावी लागणार असते आणि तेही स्पेक्टरच्या गुप्तहेरांच्या नजरेस न पडता. पण त्यासाठी अत्यंत वेगाने हालचाल करणाऱ्या एखाद्या व्यक्तीची त्याला गरज भासणार होती...
''प्रत्येक पुरुषाला आपण जेम्स बाँड व्हावं असं वाटतं आणि प्रत्येक स्त्रीला आपण त्याच्या अंथरुणात शिरावं असं वाटतं.''

# पुस्तक परिचय

## यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षणमंत्री म्हणून यशस्वी केलेली पहिली मोहीम

# पहिली फेरी

**राम प्रधान**



१९६५ मध्ये पाकिस्तानने काश्मीरच्या छांब क्षेत्रात आणि कच्छच्या रणात आक्रमण केले. भारताने ते परतून लावले. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण या युद्धाला 'पहिली फेरी' मानत. त्याची माहिती देणारे हे पुस्तक राम प्रधान यांनी लिहिले आहे. यशवंतरावांच्या डायरीचा त्याला आधार आहे.

भारताचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी नोव्हेंबर १९६२ मध्ये सूत्रे स्वीकारली. त्यांनी २१ नोव्हेंबरला मंत्रीपदाची शपथ घेतली. त्याचवेळी चीनने युद्धबंदीची घोषणा केली. त्यांच्या संरक्षण मंत्रीपदाला खो घालण्याचे हितशत्रूंचे प्रयत्न त्यांनी हाणून पाडले; कृष्णमेनन, विजू पटनाईक वगैरेंना गप्प बसवले आणि संरक्षण खात्याची घडी नव्याने बसवली. सैन्य, नौदल आणि हवाई दल या तिन्ही विभागाच्या प्रमुखांशी जवळचे संबंध प्रस्थापित करून त्यांचे मनोधैर्य वाढवले. माओत्से तुंग यांच्या युद्धनीतिविषयक धोरणाचे अध्ययन केले आणि शत्रूच्या मानसिकतेचा मागोवा घेत आपल्या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने काही धोरणे निश्चित केली. (१) आक्रमण वृत्तीसाठी, लढाईसाठी वेगाने हालचाली करा. मोठ्या प्रमाणावर फौजांची जमवाजमव करून हल्ला चढवा. (२) शत्रू कोणत्या हालचाली करतो याची प्रतीक्षा न करता स्वत:च पुढाकार घेऊन कल्पकतेने आक्रमणाची बारीकसारीक तपशीलासह आखणी करा; केवळ शत्रूच्या कृतीवर प्रतिक्रिया म्हणून कृती करायची असे समजून चालू नका. (३) लढायचे असेल तर पुरेपूर पूर्वतयारीनिशी आणि विजयाची पूर्ण खात्री वाटत असेल तरच लढा. तशी खात्री व तयारी नसेल तर युद्धाच्या भानगडीत पडू नका.

या धोरणाची कसोटी ऑगस्ट-सप्टेंबर १९६५ च्या दरम्यान पाकिस्तानने काश्मीर खोऱ्यात आणि कच्छमध्ये केलेल्या छुप्या हल्ल्याच्या वेळी लागली. त्यावेळी लालबहादुर शास्त्री हे पंतप्रधान होते. भूसेनाप्रमुख जनरल जे. एन. चौधरी, ॲडज्युटन्ट जनरल ले. ज. पी. कुमारमंगलम्, वायुसेना प्रमुख एअर मार्शल अर्जन सिंह आणि नौसेनाप्रमुख व्हाइस ॲडमिरल बी. एस. सोमण हे होते. पाकिस्तानी नौसेनेविरुद्ध भारतीय नौसेनेने कोणतीही हालचाल करू नये असा आदेश दिला गेल्याने सोमण आणि एअर ॲडमिरल एस. एम. एस. नंदा हे बरेच अस्वस्थ होते. खरे तर यशवंतरावांनी नौसेनेलाही युद्ध स्वरूपाच्या काही हालचाली करण्याची विनंती केली होती; ११ सप्टेंबरला पंतप्रधानांशी त्याबाबत चर्चाही केलेली होती. परंतु त्याबाबत एकमत न झाल्याने, नौसेनेला या लढाईत दूर ठेवण्याचा निर्णय झालेला होता. १ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर १९६५ च्या दरम्यानची यशवंतरावांची डायरी त्यांचे त्यावेळचे स्वीय सचिव राम प्रधान यांनी वेणूताई चव्हाण ट्रस्टचे विश्वस्त शामराव पवार यांच्या औपचारिक अनुमतीने डिबॅकल टू रिव्हायवल या पुस्तकात प्रसिद्ध केली. (१९९८) ती यशवंतरावांच्या

स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिली गेलेली डायरी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. यशवंतरावांच्या त्यावेळच्या मानसिकतेवर आणि विचारांवर प्रकाश पडतो; तसेच निर्णय घेताना या प्रश्नांशी निगडित विविध घटकांच्या संदर्भातील ताणतणावही लक्षात येतात. पंतप्रधानांशी बोलण्याआधीच यशवंतरावांनी त्यावेळी निकडीची परिस्थिती बघून छांब भागात पाकिस्तानी रणगाड्यांवर हवाई हल्ले करण्याचा आदेश दिला होता - ही गोष्ट डायरीवरून स्पष्ट होते. अर्थात नंतर त्यांनी शास्त्रीजींना या आदेशाची कल्पना दिली आणि शास्त्रीजींनीही त्याबाबत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली हेही नमूद केले आहे.

राम प्रधान हे यशवंतरावांचे १९६० ते १९६५ या दरम्यान स्वीय सचिव होते; त्यांनी वादळमाथा, राजीव गांधींच्या सहवासात, डिबॅकल टू रिव्हायबल - वाय. बी. चव्हाण, डिफेन्स मिनिस्टर, १९६५ वॉर इनसाइड स्टोरी वगैरे पुस्तके लिहिली आहे. १९५२ ते १९८६ अशी चौतीस वर्षे भारतीय प्रशासकीय सेवेत त्यांनी विविध पदे भूषविली. निवृत्तीनंतर अरुणाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणून तीन वर्षे कार्य केले. १९८७ मध्ये पद्मभूषण हा किताब देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

१९९८ मध्ये इंग्रजीत प्रसिद्ध झालेला 'डिबॅकल टू रिव्हायवल'चे मराठी रूप 'पहिली फेरी' या पुस्तकाद्वारे मराठी वाचकांपुढे येत आहे.

चीनच्या आक्रमणाने हादरून गेलेल्या हिमालयाच्या मदतीला यशवंतरावांच्या रूपाने सह्याद्री धावून गेला. तेव्हा यशवंतरावांनी स्वीय सचिव म्हणून राम प्रधान यांना आपल्याबरोबर दिल्लीला नेले... 'वादळमाथा' या पुस्तकात यशवंतराव आणि राम प्रधान यांच्या स्नेहसंबंधांचा विस्तृत आलेख बघायला मिळतो.

पहिली फेरी या पुस्तकात यशवंतरावांनी संरक्षणमंत्रीपदाची सूत्रे घेतल्यापासून जे काम केले त्याचे धावते दर्शन घडवले आहे; आणि १९६५ मध्ये पाकिस्तानने प्रथम काश्मीरच्या छांब भागात आणि नंतर कच्छच्या रणात गनिमी सैनिक पाठवून जे आक्रमण केले, त्याचा मुकाबला भारताने कशा प्रकारे केला याचे सविस्तर तपशील दिले आहेत. यशवंतरावांच्या रोजनिशीतील उतारे दिल्यामुळे या युद्धाच्या दरम्यान घडलेल्या घटना आणि त्या संदर्भात यशवंतरावांच्या मनात उमटलेल्या प्रतिक्रिया, सेनादलांच्या प्रमुखांच्या मनातील भावना आणि व्यूहरचनांच्या संदर्भातील मतमतांतरे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया वगैरेंची कल्पना येते. भारताने काश्मीरमधील हाजीपूर-पूंछ, टिथवाल वगैरे भाग ताब्यात घेतला. आझाद काश्मीरमधील हा भाग ताब्यात आल्यामुळे पाकवर दबाव आणण्याची संधी मिळाली. २२ सप्टेंबर रोजी युद्धबंदी झाली तेव्हा हा भाग आपल्या वर्चस्वाखाली आला आहे याचा आनंद आणि अभिमान संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांना निश्चित

वाटला असणार. पुढे ताश्कंदमध्ये भारत-पाक वाटाघाटीच्यावेळी हा भाग पाकला परत देण्यास पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी रशियन पंतप्रधान कोसिजिन यांच्या दबावाखाली संमती दिली आणि त्याच रात्री शास्त्रीजींचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले... काश्मीरचा प्रश्न राजकीय पातळीवर वाटाघाटी करून सुटणार नाही अशी यशवंतरावांची खात्री पटलेली होती. १२ सप्टेंबरला आपल्या डायरीत तशी नोंद त्यांनी केलेली आहे. ताश्कंदमध्ये शास्त्रीजींचे आकस्मिक निधन झाल्याने यशवंतरावांना या सर्व प्रकरणाबद्दल मौन बाळगावे लागले. हाजीपीर वगैरे भाग परत पाकिस्तानला देण्याचा निर्णय त्यांना फारच नामुष्कीचा वाटला असणार.

२२ सप्टेंबरच्या डायरीतील नोंदीमध्ये पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष जनाब भुत्तो यांनी युद्धविरामाला मान्यता दिली आणि आपल्या पंतप्रधानांनी साडेतीन वाजता संसदेत त्याबद्दल निवेदन केले याचा उल्लेख केला आहे. यशवंतरावांचे सर्व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले. भूदल आणि हवाईदल यांच्या कामगिरीचाही गौरव झाला. ''ए ग्रेट डे फॉर मी. ए ग्रेट डे फॉर चौधरी अँड अर्जन सिंह'' असे यशवंतरावांनी लिहिले आहे.

चौधरींच्याबद्दल माजी संरक्षणमंत्री कृष्ण मेनन हे यशवंतरावांशी सतत नकारात्मक बोलत, ''चौधरी कधीच न लढणारा सेनापती आहे,'' हे कृष्ण मेनन यांचे मत चव्हाणांना मान्य नव्हते.

१ सप्टेंबरच्या नोंदीत चौधरींनी आपल्या मनावर कसले दडपण आहे हे यशवंतरावांना सांगितल्याची नोंद आहे. ''चौधरी काहीसे विषण्ण आणि निराश (डिप्रेस्ड) वाटले.''असे त्यांनी लिहिले आहे. ३ सप्टेंबरला चौधरींची मन:स्थिती चांगली दिसली. ''काल आपण काहीसे निराश होतो. त्याबद्दल मला वाईट वाटते'' असे ते म्हणाले. चौधरींनी आपल्याशी मन मोकळे केले याबद्दल यशवंतरावांनी समाधान व्यक्त केले. ४ सप्टेंबरला छांब क्षेत्रात झालेल्या 'पाडावामुळे' चौधरी पुन्हा निराश झालेले त्यांना दिसले. ५ सप्टेंबरला ते काळजीमुक्त झालेले दिसले. ९ सप्टेंबरला भूसेनाप्रमुख चौधरी दोलायमान मन:स्थितीत वाटले. तेव्हा रणक्षेत्र आघाड्यांना भेट देण्याचा सल्ला यशवंतरावांनी त्यांना दिला. वस्तुस्थितीशी थेट संपर्क साधल्याने त्यांना कृती करताना आत्मविश्वास वाटेल असा यशवंतरावांचा सल्ला. अशा भेटी देऊन आल्यावर चौधरींनी आपली मते अधिक ठामपणे मांडली असे यशवंतरावांना जाणवले. (१० सप्टेंबर) कसूर (लाहोर आघाडी) येथे शत्रूचे सतरा रणगाडे नष्ट केल्याची बातमी चौधरींनी दिली. (११ सप्टेंबर). १२ सप्टेंबरला चौथ्या शीख बटालियनने खेमकरणमध्ये शिरून शत्रूच्या पिछाडीवरून मारा करून शत्रू सैन्यात घबराट निर्माण करण्याचे ठरवले, पण या प्रयत्नात

गफलत झाली. या बटालियनने रणगाडाविरोधी तोफा मागे ठेवून पुढे आगेकूच केली. सिग्नल सैनिक गट मुख्य लढाऊ गटापासून अलग पाडले. ते सैनिक उंच पिकात शिरले. शेजारीच पाकिस्तानी रणगाड्यांची तुकडी विश्रांती घेत होती. शीखांना पाहून पाकिस्तानी सैनिकांनी मशीनगन्सचा मारा सुरू केला. १२६ शीख सैनिकांना पकडले. ले. कर्नल अनंत सिंह हेही शत्रूच्या तावडीत सापडले. २० सैनिक ठार झाले. नंतर आलेल्या महार रेजिमेंटलाही बरीच हानी पोचली. यशवंतरावांनी 'स्टुपिड इन्सिडेंट' अशी या घटनेची नोंद केली आहे. (१३ सप्टेंबर)

विशेष काही घडले नाही हा भूसेनाप्रमुखांचा अहवाल यशवंतरावांना चमत्कारिक (अनयुझवल) वाटला. आपण स्वतः याकडे लक्ष द्यायला हवे असे त्यांनी ठरवले. १६ तारखेला त्यांनी कुमारमंगलम यांना बोलावून घेतले. त्यांनी पाकिस्तान सियालकोटवर जोरदार हल्ला करील असा अंदाज व्यक्त केला. आघाडीवरील थंडाई (स्टेलमेट-संथपणा) मोडायला हवी असे यशवंतरावांनी सुचवले. १७ सप्टेंबरला चीनच्या धमकीबद्दल चौधरींशी चर्चा झाली. १८ तारखेला लढाईत एकूण उद्दिष्टांचा आणि रसद-शस्त्रपुरवठ्याचा आढावा घेण्यात आला. सर्वांनी आपले विचार व्यक्त केले.

पाकच्या युद्ध सामर्थ्याला व सैन्याला हानी पोचवणे आणि काश्मीरवर लष्करी बळाने कब्जा करणे ही दोन उद्दिष्टे समोर ठेवून चौधरींनी पुढची व्यूहरचना करण्याचे ठरवले.

...चौधरींच्या दररोजच्या बदलत्या मनोवस्थेचे यशवंतरावांचे हे अवलोकन उद्बोधक वाटते.

शेवटी ए ग्रेट डे फॉर चौधरी ॲंड अर्जन सिंह असे त्यांनी म्हटले. आपल्या सहकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढवून त्याच्याकडून उत्तम काम करून घेण्याची यशवंतरावांची हातोटी दिसते. विश्वासाने विश्वास वाढतो. महाराष्ट्रात जिल्ह्याजिल्ह्यात त्यांनी तरुण कार्यकर्ते हेरले आणि त्यांना कामाची संधी दिली. सहकारी क्षेत्राद्वारे महाराष्ट्राचे रंगरूप पालटले. कार्यकर्त्यांमध्ये चुरस निर्माण करून त्यांना सतत कार्यप्रवण ठेवले. तसाच प्रयोग यशवंतरावांनी दिल्लीत संरक्षणखात्याचे काम करताना यशस्वी करून दाखवला असे या रोजनिशीवरून आणि 'पहिल्या फेरी'तील यशावरून लक्षात येते. दुर्गादास वगैरे इतिहासकारांनीही यशवंतरावांचे चौधरींबद्दलचे मूल्यमापन रास्त ठरल्याचे नमूद केले आहे. (१३२)

राम प्रधान यांनी या 'पहिल्या फेरी'चे वस्तुनिष्ठ दर्शन घडवून यशवंतरावांच्या कर्तृत्वाकडे आणि योगदानाकडे लक्ष वेधले आहे.

यशवंतराव आणि पंतप्रधान लालबहादुर शास्त्री या दोघांच्या संबंधांविषयीही त्यांनी भाष्य केले आहे. (पृष्ठ ११९-१२१). लालबहादूर शास्त्री कमी, पण

स्पष्टपणे बोलत. हात राखून बोलण्याची, मनात आहे ते सर्व प्रकट न करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. गृहमंत्री म्हणून शास्त्रीजींना यशवंतरावांची संरक्षणमंत्रीपदी झालेली योजना कितपत ग्राह्य वाटली असावी, याबद्दलही साशंकता वाटते. या दोघांमध्ये फारसे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होऊ शकले नाहीत असे, राम प्रधान स्पष्ट नमूद करतात. कच्छच्या युद्धानंतर मात्र दोघांमधील स्नेह व विश्वास वृद्धिंगत झाला. ''मोकळेपणाने विचारांची देवाणघेवाण होऊ लागली. त्यामुळे मी निश्चिंतही झालो आणि समाधानही वाटले, कारण वेळ फार आणीबाणीची होती.'' त्यानंतर काश्मीर आघाडीवरच्या गंभीर परिस्थितीमुळे हवाई दलाला बॉम्बहल्ल्याचा हुकूम यशवंतरावांनी दिला; तो दिल्यावर शास्त्रीजींना त्याबद्दल माहिती दिली तेव्हा शास्त्रीजींनी अच्छा किया असे म्हटले; त्यामुळे आपल्या मनावरचे ओझे हलके झाले असे यशवंतरावांनी एका लेखात म्हटले आहे. काही पत्रकारांनी हा हवाई हल्ल्याचा हुकूम शास्त्रीजींना दिला असे प्रसिद्ध केले असले तरी यशवंतरावांनी त्याचा कधी प्रतिवाद केला नाही. ''हे सर्व चव्हाण आणि लालबहादुर शास्त्री यांच्या आदरपूर्ण व विश्वासयुक्त संबंधाचे द्योतक आहे'' असे राम प्रधान म्हणतात. (१२१)

यशवंतरावांनी या युद्धाला 'पहिला राऊंड' म्हटले. पुढचे राउंडस कधी व केव्हा अस प्रश्नही उपस्थित केला. त्यांचे द्रष्टेपण त्यात दिसते. काश्मीर प्रश्न राजकीय वाटाघाटींनीच सुटू शकतो, लष्करी कारवाईने नाही याबद्दलही त्यांची खात्री पटलेली होती.. ती योग्यच होती हे पुढच्या घटनांवरून मान्य करावे लागते.

भारतीय आत्मसन्मानाच्या भावनेला परिपुष्ट करणाऱ्या या भारत-पाक संघर्षातील पहिल्या फेरीबद्दलची वस्तुस्थिती स्पष्ट करणारे हे पुस्तक अभ्यासकांना तसेच सर्वसामान्य वाचकांनाही महत्त्वपूर्ण वाटेल यात शंका नाही.

**किंमत : १५०रु. सभासदांना : १०५रु. पोस्टेज : २५रु.**


**चौथी आवृत्ती**

# मी भरून पावले आहे

**मेहरुन्निसा दलवाई**

**किंमत १६० रु. पोस्टेज २५ रु.**

## पुस्तक परिचय

### युगपुरुष श्रीकृष्णाच्या लीलांचे गीतरूपातले सादरीकरण

# गीतकृष्णायन

**प्रसाद औटी**



**गी**त रामायणाच्या लोकप्रियतेमुळे त्या धर्तीवर अनेक देवदेवतांच्या जीवनकार्यावर बऱ्याच रचना होऊ लागल्या आणि त्यांचे नामवंत गायकगायिकांकडून सादरीकरणही होऊ लागले. त्यांच्या कॅसेटस आणि व्हीसीडी निघू लागल्या. मराठीत हा एक वैशिष्ट्यपूर्ण काव्यप्रकार म्हणून प्रस्थापित झाला. अर्थात गीत रामायणाएवढी लोकप्रियता सर्वांनाच मिळेल अशी अपेक्षा कोणी बाळगली नाही. गीत रामायण अजोडच राहिले.

गीत कृष्णायन हा गीतरामायणाच्या धर्तीवरचाच एक उल्लेखनीय प्रयत्न म्हणावा लागेल. कॉम्प्युटर सॉफ्टवेअर तज्ज्ञ म्हणून काम करणाऱ्या, मुंबई आयआयटीमधून एम. टेक केलेल्या प्रसाद औटी यांनी पन्नास गीतांद्वारे श्रीकृष्णाचे देदीप्यमान चरित्र आणि अद्भुत व्यक्तिमत्त्व रसिकांपुढे पेश करण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीकृष्णाच्या शिकवणीचा प्रभाव जनताजनार्दनावर पडेल, कौटुंबिक, समाजिक, राजकीय, वैश्विक आनंदाची त्याद्वारे निर्मिती होईल असा विश्वास कवीला वाटतो. समाजसेवा, हरिसेवा आणि साहित्यसेवा हे तीन हेतू मनात बाळगून श्रीकृष्णाच्या चरित्रातील महत्त्वाच्या घटनांवरील ही गीतपुष्पमाला कवीने सिद्ध केली आहे. सकाळच्या रविवार पुरवणीत २००६ साली ही गीते क्रमश: प्रसिद्ध झाली. त्यातील आठ निवडक गीतांचा म्युझिक अल्बम निघाला. तीन तासांचा दृक्‌श्राव्य प्रयोगही एकदा सादर करण्यात आला. आता पुस्तकरूपाने ही गीतपुष्पमाला वाचकांना उपलब्ध होत आहे. ''स्वत: भगवान श्रीकृष्ण प्रेरणा देऊन आणि मला निमित्त करून हे करीत आहे अशी माझी भावना आणि भूमिका आहे'' असे कवीला जाणवते आहे.

हा एक खेळ आहे आणि या खेळात सर्वांनी सामील व्हावे असे सूत्रधार म्हणून हरिदासाचे आवाहन आहे. गोपाळकाल्याने या खेळाचा आरंभ होतो.

श्रीकृष्णाचा जन्म, **बाललीला**, (गोकुळात नामकरण, पूतनावध), **कृष्णलीला** (गोकुळातील बालपणचे उद्योग, गोपींच्या तक्रारी, अर्जुनोद्धार, विश्वरूपदर्शन, वृंदावनातील गोपालन, गोपाळकाला, रासक्रीडा, वेणुवादन, बलोपासना, कालियामर्दन, गोवर्धनपर्वत) **युगपुरुष** (मथुरेला प्रयाण, कंसाचा वध, सांदीपनींच्या आश्रमात विद्याध्ययन, गोमंतपर्वताख्यान, कालयवनाचा समाचार, द्वारकेची उभारणी, रुक्मिणीला पत्र, रुक्मिणीहरण, रुक्मिणी स्वयंवर, स्यमंतक मणी, विदुराच्या वाड्याला भेट) **योगेश्वर** (नरकासुरवध, सत्यभावा गर्वहरण, खांडववन, द्वारकानिवास, मगध विजय- जरासंध वध, शिशुपालवध, द्रौपदीचा धावा, वस्त्रहरण, सुदाम्याची भेट) **कुरुक्षेत्र** (श्रीकुष्ण शिष्टाई, अर्जुन विषाद योग, अर्जुनमोह निरसन, विश्वरूप, गीतासंदेश, भीष्मनिर्माण, अभिमन्यू, हा सूय हा जयद्रथ, कर्णाच्या रथाचे चाक जमिनीत रुतणे, दुर्योधन वध) **युगान्त** (रथत्याग, गांधारीचा शाप, कुंतीचे मागणे, महानिर्वाण, हरिदासकृत हरिप्रार्थना, गुरुकृपा इ.) अशा प्रमुख घटना निवडून

त्यावर काव्यरचना करण्यात आली आहे. प्रत्येक गीताच्या अनुषंगाने कथाभागाचे निरूपण करण्यात आले आहे. त्या घटनेचे सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक पैलू स्पष्ट उलगडून दाखवले आहेत.

या गीतरचनांसाठी शार्दूलविक्रीडित, भुजंगप्रयात, शालिनी, देवराज, मालिनी, मंदाक्रांता, हरिभगिनी, जीवनलहरी, समुदितमदना, अचलगती, कामदा, देवीवर, तोटक, पादाकुलक वगैरे वेगवेगळ्या वृत्तांचा आणि छंदांचा वापर केला आहे. सध्या मुक्तछंदाचा जमाना आहे. अक्षरवृत्तांमध्ये कोणी फारसे लेखन करीत नाही. परंतु प्रसाद औटी यांनी जाणीवपूर्वक वृत्तमात्रांचा अवलंब केला आहे हे गीत कृष्णायनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून नोंदवायला हवे.

माधुरी हे एक नवीन वृत्त तयार करून त्यात श्रीकृष्णाच्या महानिर्वाणाचे गीत बसवले आहे. या वृत्ताची कल्पना पुढील पंक्तीवरून येऊ शकेल.

*तनु त्यागतसे गर्द वनी तरुतळि गोपाल.*
*अवतार करी पूर्ण युगा येई अंतकाल*
*देवकिनंदन राधेश्याम देवकिनंदन राधेश्याम ।।धृ।।*
*अवतार घेइ भूवर जंव घोर अंधकार*
*ग्रासोनि सकळ विश्व करी जीवना असार*
*त्या समयि विधाताच करी एक चमत्कार*
*घनश्याम रूप घेऊन हो गुणिजन आधार*
*घनदाट निशा उलटून ये परत उषःकाल।।१।।*

कृष्णाने आपल्याला स्वप्नात दर्शन दिले असे कवी म्हणतो. शार्दूलविक्रीडित वृत्तातील रचनेद्वारे त्याविषयी खुलासा केला गेला आहे.

*कृष्णाने अपुलेच दर्शन मला स्वप्नामध्ये दीधले*
*घेऊन जवळी लगेच पुढती हासोनि संबोधले*
*'वत्सा नेक तसेच मंगल तुझे आदर्श हे वागणे*
*संकोचा विसरी मला झडकरी सांगी तुझे मागणे'।।१।।*

''हाती हात धरून मजसवे कालत्रयी चाल रे'' असे मागणे केल्यावर श्रीकृष्ण म्हणतो, ''आपले कर्तव्य करीत राहा. मागे बघितलेस तर तुला माझ्या खुणा दिसतील.'' तशी ती पावले मागे दिसतात. अधेमधे ती पावले न दिसल्याने आश्चर्य वाटते. तेव्हा श्रीकृष्ण म्हणतो, ''अरे, तुझ्यावर आपत्ती कोसळल्या तेव्हा मी तुला खांद्यावर घेऊन मी चाललो; त्यामुळे तुला तुझी पावले दिसत नाहीत.''

**किंमत : १००रु. सभासदांना : ७०रु. पोस्टेज : २५रु.**

# त्रिधारा

**मूळ लेखक**
**डॉ. कमल चोपडा**
**मोहनलाल गुप्ता**
**सरला अग्रवाल**

**अनु. उज्ज्वला केळकर**

**किंमत १५० रु.**
**पोस्टेज २५ रु.**




शिशिरबाबूंना वाटलं, आपलं सारं भविष्यच या नातवंडांच्या रूपानं आपल्याला कवळतंय! आपण जाणार नाही आहोत! आपण मरणार नाही आहोत! ही मुलं... नातवंडं... यांत आपला अंश आहेच! यांच्या रूपानं आपलं अस्तित्व शाश्वत आहे! मग कशाची खंत? कशाचं दु:ख? आपण शेवटच्या घटका नाही मोजत आहोत. आपण पूर्ण शक्तीनिशी

छाती भरून श्वास घेत आहोत!

एक आगळं चैतन्य शिशिरबाबूंच्या शरीरात सळसळू लागलं.

शिशिरबाबूंनी खिडकीकडे दृष्टी वळवली. मावळतीचा सूर्य शेंदरी लाल होऊन चमकत होता.

''अच्छा!'' मी विस्मयानं टक लावून तिच्याकडे पाहू लागले. आज दुपारच्या स्वप्नात मणकी आणखी एक पद्मिनी होऊन माझ्या डोळ्यातून वाहत होती; पण आता ती एका द्रौपदीच्या रूपात माझ्यासमोर उभी आहे. द्रौपदी. अशी द्रौपदी, जी केवळ अर्जुनाचीच आहे... केवळ आपल्या अर्जुनाची. आणि नेहमी त्याचीच राहणार आहे.

बादलीच्याजवळ पोहोचताच त्यानं डोळे बंद केले. हात जोडले आणि मनातल्या मनातच म्हटले, ''हे शनिदेवा, मी तुझ्या बादलीतले पैसे घेतोय. मला पैशांची केवढी गरज आहे, हे तुला माहीत आहे. तुला इतके पैसे मिळताहेत. तू इतक्या पैशांचं काय करणार आहेस ? शिवाय, तुला गरज असेल तर तू तुझ्या जादूमंत्रानं पैशांचा पर्वत उभा करू शकतोस, होय की नाही? ठीक आहे. मी तुझ्या बादलीतले काही पैसे घेतोय. मी ते घेऊ नयेत, अशी तुझी इच्छा असेल, तर तू तुझी मान 'नको' अशी हलव. तू काहीच बोलला नाहीस, हलला नाहीस, तर त्याचा अर्थ होईल, मी पैसे घ्यायला तुझी काही हरकत नाही. ठीक आहे नं?''

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# पुस्तक परिचय

## भाऊसाहेब खांडेकरांच्या चार दशकांतील साहित्य आणि जीवनविषयक चिंतनाचा व्यापक पट

# ऋतू न्याहाळणारं पान

**वि. स. खांडेकर**

संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे



१९३५ ते १९७६ अशा चार दशकांच्या कालखंडात मराठीतील नामवंत कादंबरीकार वि. स. खांडेकर यांनी वेगवेगळ्या व्यक्तींना दिलेल्या निवडक मुलाखतींचे संकलन करून डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी 'ऋतू न्याहाळणारं पान' या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

डॉ. लवटे यांनी आधी संपादित केलेल्या 'पहिली पावलं' (खांडेकरांच्या विविध गुणवैशिष्ट्यांच्या अनुषंगाने त्यांनीच व्यक्त केलेली मनोगते) आणि 'सशाचे सिंहावलोकन' (खांडेकरांच्या जीवनदृष्टीची चौफेर कल्पना स्पष्ट करणारे उतारे) या दोन पुस्तकांच्या मालिकेतले हे नवे पुष्प.

एका परीने हे पुस्तकही आत्मकथनात्मकच म्हणावे लागेल. वेगवेगळ्या व्यक्तींनी वेगवेगळ्या प्रसंगी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने आपले जीवन, आपले साहित्य, आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान, आपल्या काही पुस्तकांच्या जन्मकथा, आपले वाचन, आपले अनुभव, आपल्याला प्रभावित करणाऱ्या व्यक्ती आणि पुस्तके, सद्य:स्थितीवरील मते, याबद्दल खांडेकरांनी केलेले भाष्य आपल्याला वाचायला मिळते. मुलाखतीतून समग्र खांडेकर उभे राहावेत हा सुनीलकुमार लवटे यांचा संकल्प त्यामुळे बऱ्याच प्रमाणात पूर्ण होतो. यापैकी काही मुलाखती जयवंत दळवी, विद्याधर पुंडलीक, रवींद्र पिंगे, रमेश मंत्री, यमुनाबाई शेवडे, डॉ. व. दि. कुलकर्णी, श्री. ज. जोशी, चारुशीला गुप्ते अशा मान्यवरांनी घेतलेल्या असल्याने आणि षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ, अमृत महोत्सव, पद्मभूषण प्राप्ती, ज्ञानपीठ पुरस्कार वगैरे निमित्तामुळेही घेतलेल्या असल्याने मनमोकळ्या झाल्या आहेत. किती सांगू किती नको असा त्यांचा बाज आहे. माझे कादंबरीलेखन, कला आणि नीती, माझे टीकाकार, माझे लेखन, माझे वक्तृत्व, आधुनिक कादंबरीतील प्रवाह, ध्येयवादी साहित्य, शिक्षण आणि तरुणवर्गातील वैफल्य, संस्कृतीतील बदलांचा साहित्याने घेतलेला वेध, बहुजन-दलित साहित्यिक, आत्मचरित्रविषयक चिंतन, मराठी साहित्यातील विश्वात्मकतेचा अभाव, लेखनगुरू कोल्हटकर, कुसुमाग्रजांची प्रतिभा अशी वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भात या मुलाखतींमधून खांडेकरांची मते प्रकट झाली आहेत. यातील काही मुलाखती त्रोटक तर काही विस्तृत आहेत. बहुतांशी मुलाखती कालानुक्रमे दिल्या आहेत.

१९३५ साली 'विहंगम'ला दिलेल्या पहिल्याच लेखी मुलाखतीत खांडेकरांनी कादंबरी लेखनात सत्यावर कलेचे संपूर्ण संस्कार करून मगच त्याचा उपयोग करणे इष्ट, सत्याच्या पायावर उभारलेली कल्पनेची इमारत असेच ललित वाङ्मयाचे स्वरूप असावे, सामाजिक कादंबऱ्यांबाबत कल्पनाशक्तीचा वापर संयमानेच करायला हवा असा विचार मांडला आहे. कला आणि तत्त्व यात कला म्हणजे शरीर आणि तत्त्व म्हणजे प्राण... परंतु शरीरविरहित स्थितीप्रमाणेच अस्तित्व ही कल्पनाच दुरापास्त- या वास्तवाचेही भान त्यांना आहे.

कलेसाठी कला की जीवनासाठी कला हा वाद त्यांच्या अनेक मुलाखतींतून आला आहे. ते जीवनासाठी कला या भूमिकेचा आग्रह धरीत आणि ना. सी. फडके यांच्या कलेसाठी कला या भूमिकेवर झोड उठवत. प्रत्यक्षात या दोन्ही भूमिकांचा त्यांच्या कथाकादंबऱ्यात संकर जाणवतो. गांधीवाद आणि मार्क्सवाद यांच्या संदर्भातही खांडेकरांची अशीच समन्वयवादी भूमिका दिसते. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी मार्क्सवाद हवा, पण माणसाच्या मनात परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रक्रियेसाठी गांधीवादच हवा. असे प्रत्येक बाबतीत त्यांना काहीतरी सकारात्मक दिसते आणि त्यामुळे कुठल्याच गोष्टीला पूर्णतया त्याज्य किंवा निरुपयोगी मानून तिच्यावर झोड उठवणे त्यांना शक्य होत नाही. विशिष्ट भूमिका काटेकोरपणे घेणे आणि तर्कशुद्ध मांडणीद्वारे तिचे समर्थन करणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यांची भूमिका सर्वस्पर्शी, सर्वसमावेशक, समन्वयवादी होती असे म्हणावे लागते. वास्तवाची पूर्ण जाणीव आहे, पण आदर्शाविषयीची ओढही अनावर आहे अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण; त्यामुळे ते उदारमतवादी म्हणूनच आपली मुद्रा उमटवतात. मानवतावादी, मांगल्याचे पूजक, सात्त्विक प्रवृत्तीचे, सर्वांचे मंगल चिंतणारे, आदर्शवादी काहीसे स्वप्नाळू असेच त्यांचे लेखन आहे. या मुलाखतींमधून ही गोष्ट पुन:पुन्हा समोर येते.

भोवतालचं जग सुंदर व्हावं या साहित्यिक स्वप्नामुळे ते लेखनाकडे वळले.

''भोवतालची सामाजिक चौकट जाऊन मूलगामी क्रांती व्हावी या स्वप्नानं मला पछाडलं होतं. त्याचा लेखनावर परिणाम झाला. मी लेखक होतो म्हणून लेखक झालो का हा प्रश्नच आहे... उल्का आणि दोन ध्रुव या कादंबऱ्या लिहिताना मी त्या वेळच्या त्या पिढीला उद्‌गाता होतो; त्या पिढीचं कार्य मी केलं.'' अस मुद्दा ते मांडतात. (१५०)

कलात्मक साहित्यातसुद्धा सामाजिक रस हवाच. देशापुढे व जगापुढे जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्याचे लागेबांधे ललित लेखकाला टाळता येणार नाहीत... मानवी जीवन यथार्थ रंगवल्यावरही मानवी जीवनात उदात्त हेतू असतो हे दाखवणारं साहित्य टिकतं. 'ययाति' आणि 'अमृतवेल' याच कारणांमुळे आजच्या पिढीलाही आवडते. माझं साहित्य कलात्मक नाही असा आक्षेप आह, पण साहित्यात समाजाला प्रेरक असं काहीतरी असलं तरच ते टिकतं... (१५१) अशी त्यांची कैफियत पुन:पुन्हा वाचायला मिळते. शरीर आणि आत्मा, भोग आणि त्याग, कला आणि जीवन या सर्वांचाच सुवर्णमध्य साधता यावा असा त्यांचा आग्रह होता; तो शेवटपर्यंत टिकून राहिलेला होता हे यमुनाबाई शेवडे यांना कऱ्हाड साहित्य संमेलनानंतर दिलेल्या मुलाखतीतही आढळून येते. (१५४)

या मुलाखतींमधून काही वाङ्मयबाह्य विधानेही सहज ओघात येतात. ती प्रसंगोचित असली तरी आज गमतीदार वाटतात.

* वाङ्मयाने वैचारिक क्रांती घडविता येईल की नाही हे सांगणे कठीण आहे, पण वाङ्मयाच्या वाचनाने माणूस संस्कारक्षम बनतो हे खरे... समाजाची वैचारिक शक्ती वाढविण्याचे कार्य वाङ्मय बजावत असते. (५)
* 'उल्का' आणि 'दोन मने' या माझ्या कादंबऱ्यांवर जे टीकालेख आले त्यांपैकी बहुतेक उथळ होते. (७)
* 'समाजस्वास्थ्य'मधील शकुंतला परांजपे यांची परीक्षणे व्यक्तिनिष्ठ असतात... **या बाईंच्या मनाच्या रसिकतेची अनेक द्वारे बंद आहेत.** त्याचे प्रायश्चित्त लेखकांना का?...
* कोणत्याही कामगार पुढाऱ्याइतकाच मी मनाने समाजवादी आहे, पण केवळ तात्त्विक अशी स्वभावचित्रे रेखाटणे मला आवडत नाही. (९) (१९३९)
* ...निव्वळ लेखनकलेवर महाराष्ट्रात उपजीविका करणे धोक्याचे आहे असे म्हणता येईल. चांगल्या लेखकाने देखील निर्जली एकादशी, कडक संकष्टी, लंघने इत्यादिकांचा अभ्यास करूनच लेखनकलेवर पोट भरायला निघावे हे चांगले. (१४)
* औषधामुळे जसा रोग्याचा तसा टीकेमुळे ग्रंथकाराचा फायदा होतो असा माझा समज आहे. (१५)
* वक्तृत्वासाठी मी कुठलेही परिश्रम केलेले नाहीत. थोडा जिव्हाळा, थोडे ज्ञान, थोडे भाषाप्रभुत्व एवढेच माझे भांडवल आहे... कला या नात्याने मी वक्तृत्वाचा अभ्यास कधीच केलेला नाही... **साहित्यिक झाल्यामुळे मी वक्ता असलोच पाहिजे हे लोकांनी परस्पर ठरवले.** (१८)
* नवकथेतील कामुकतेवर माझा मुळीच आक्षेप नाही. हे कामुकतेचं चित्रण आजचे सहित्यिक प्रामाणिकपणे करीत नाहीत ही माझी तक्रार आहे. (२१)
* उंट व लंबक (गंगाधर गाडगीळ), अधर्म (अरविंद गोखले) या दोन्ही कथांना व्यभिचारात्मक विचारांचे जे अधिष्ठान आहे ते आपल्या समाजातले नाही हा माझा खरा आक्षेप आहे. हा व्यभिचार फ्रेंच, अमेरिकन, इटालियन साहित्यातून आपल्याकडे आला आहे... (२१)
* आम्ही सर्व रोमँटिक रिॲलिस्ट आहोत. माडखोलकर हे राजकीय रोमँटिसिस्ट आहेत, सानेगुरुजी गांधीवादी रोमँटिसिस्ट आहेत, फडके प्रेमविषयक तर मी जीवनविषयक रोमँटिसिस्ट आहोत... पण ही कल्पनारम्यता उत्कट असेल तर ती वाङ्मयदृष्ट्या वाईट नाही. व्यंकटेश माडगूळकर सोडल्यास आजचे इतर सारे नवलेखकसुद्धा आत्मनिष्ठ म्हणजे रोमँटिक आहेत.

जिथे आम्ही तिथेच तेही आहेत. (२३) (१९५३).

* माझी वृत्तीच भूतदयावादी आहे त्याला मी तरी काय करू? **भाजीवालीशी दोन पैशांसाठी हुज्जत घालणंसुद्धा माझ्या जिवावर येतं** आणि मला वाटतं, सहृदयता हा ललित लेखकांचा सर्वश्रेष्ठ गुण होय. (२३)
* माणसं आणि गप्पा ही दोन्ही मला आवडत असल्यामुळं अनेकदा परिचिताशी अगर अपरिचिताशी बोलण्यात माझे तासच्या तास निघून जातात. (२६)
* डोळे अधू असल्यामुळे बालपणापासूनच मला कल्पना करीत बसण्याचा छंद लागला आणि त्यातूनच माझी कल्पकता विकसित झाली असावी असं मला वाटतं. (२६)
* प्रारंभी मी कविता लिहीत असे. पण माझ्या कवितेत भावना विलासापेक्षा बुद्धिप्राधान्य अधिक आहे. गडकरींनी सांगितल्यावरून मी कॉलेजात केलेल्या बऱ्याच कविता फाडून टाकल्या होत्या. **कविता करताना माझी बुद्धी आणि भावना सारख्या भांडत असत**. (२८)
* हार्डीप्रमाणे मीही अगदी वृद्धपणी काव्याचा आश्रय घेईन असं मला वाटतं. (२८)
* आजच्या टीकाकारांवर माझा जो मोठा आक्षेप आहे तो असा की, लेखकाच्या स्वाभाविक मर्यादा ते ध्यानात घेत नाहीत... प्रथम लेखकाच्या दोषांसकट त्याचा स्वीकार करा; मगच त्याच्यावर टीका करा. **उथळ अथवा पढीक टीकेमुळे सामान्य वाचकांचा बुद्धिभेद होतो.** (२९)
* समाजाची मनोभूमी भाजून पिकाकरिता तयार करणं हे साहित्यिकाचं काम आहे. त्या भूमीत बीज पेरून पिकं काढणं हे मुत्सद्यांचं, समाजसेवकांचं आणि विचारवंतांचं कर्तव्य आहे. (२९)
* स्वभावत:च कारुण्याकडे माझा ओढा आहे. आयुष्य हे कितीही सुखांनी भरलेलं असलं तरी ते मूलत: ट्रॅजिक असतं अशी माझी कल्पना आहे.
* साहित्यामुळे विशुद्ध आनंद व दुसऱ्याच्या भूमिकेची अनुभूती आणि तिच्यामुळे मनाला प्राप्त होणारी सात्त्विकता या गोष्टींची मी अपेक्षा करतो. (३१)
* स्वातंत्र्यानंतरच्या या काळात साऱ्या देशाचा प्रवास मला करायला मिळावा आणि त्या विशाल अनुभूमीच्या पार्श्वभूमीवर चार भागांची वास्तव कादंबरी लिहावी असं माझं एक सुखस्वप्न आहे.. (३१)
* जीवनाकरिता कला ह्या संकुचित शब्दप्रयोगाने जे सूचित होते ते मी कधी सूचित कलेले नाही.. **जीवनासाठी कला हा शब्दप्रयोग मी सहसा कुठं वापरलेला नाही.** (४१) (१९५५)
* माझी भूमिका हरिभाऊंपेक्षा फारशी भिन्न नाही. शुद्धबोधवादी वाङ्मय हे

कलावादी वाङ्मय कधी होणार नाही. परंतु बोधवादी आणि कलावादी या वाङ्मयामध्ये संस्कारवादी वाङ्मय उभं राहतं... संस्कार आणि कला एकत्र आलेले साहित्य हे श्रेष्ठ मानलं पाहिजे. (४१)

* कविता थांबली. तिचं रूपककथेत रूपांतर झालं. पुढं रूपककथांच्या विस्ताराची परिणती कादंबरीत झाली असं म्हणता येईल. (४३)
* लिहिण्यापेक्षा मला वाचण्यात मोठा आनंद आहे. एखादा मोठा लेखक वाचतो तेव्हा मला वाटतं की आपण लिहितो कशाला, आपण वाचतच राहावं. (४५)
* वास्तवता ही वैयक्तिक नसून युनिव्हर्सल असेल तरच ती प्रभावी साहित्य निर्माण करू शकते. (५०)
* माझं जीवन हे काही निष्ठांच्या बैठकीवर अधिष्ठित असल्याने **मला पोटार्थी किंवा कमर्शियल लेखक होणे कधीच रुचले नाही.** (५१)
* प्रकाशकांबद्दलचा माझा अनुभव चांगला आहे. मला कोणाही प्रकाशकाने फसवले नाही. त्यांचे व माझे संबंध व्यवहारापेक्षा स्नेहाचेच अधिक आहेत. (५२)
* हाडाचा शिक्षण म्हणून सारखं समाजाला काही सांगावंसं वाटतं. अखेरपर्यंत आम्ही तेच करीत राहणार. (५८) (१९६८)
* वयाच्या सातव्या आठव्या वर्षापासून कोल्हटकरांच्या शब्दचमत्कृतीचं, अर्थचमत्कृतीचं, विनोदाचं मला खूपच आकर्षण वाटलं आणि तसंच लिहावं असं वाटू लागलं. माझा पिंड हा कल्पनारम्यतेचा, कल्पना विलासाचा (रोमँटिक) होता व आहे... (७०)
* **कल्पनाविलास नसता तर मी लेखकच झालो नसतो...** मला जे सुचतं तेच कल्पनाविलासाच्या पद्धतीनं! विषय, पात्रे यांना तसाच रोमँटिक साज मिळत जातो. विचारांची आणि कल्पनाशक्तीची ती प्रवृत्तीच असते. (७०)
* फडके शृंगारकथा लिहून वाचकांची मने जिंकीत होते. तसे करण्यामध्ये आर्थिक फायदासुद्धा होता, पण तो प्रकार मला हाताळता आला नाही किंवा हाताळावा असंही वाटलं नाही. शृंगारकथा हे माझं क्षेत्र नाही. (७१)
* उल्का ही माझी सर्वोत्कृष्ट कादंबरी... त्या कादंबरीने मला प्रथमच स्वतंत्र कादंबरीकार म्हणून स्थान दिलं. ती लिहिल्यावर आपण स्वत:चं असं काही लिहिलं असं मला प्रथमच वाटलं. निर्मितीचा आनंद झाला. (७२) (१९७०)
* कादंबरी छापून झाली की ती मी पुन्हा वाचत नाही... पुन्हा वाचताना हे

असंच का, ते तसंच का असे प्रश्न डोक्यात येतात आणि मन अस्वस्थ होतं. (७२)

* जागतिक तोलामोलाची मराठी कादंबरी कुठलीच नाही असं मी म्हणेन. त्याचं कारण आपल्या जीवनाच्या आणि समाजाच्या मर्यादा... जेन ऑस्टिनच्या कादंबऱ्यांत जेवढा युनिव्हर्सल टच आहे तसा आपल्या सामाजिक कादंबऱ्यांत तो अद्याप आलेला नाही. (७३)
* १९३० साली 'हृदयाची हाक' भारत गौरव ग्रंथमालेने काढली. पानाला दीड रुपाया घेऊन मी सगळे हक्क प्रकाशकांना दिले. त्यामुळं माझं नुकसान झालं. पुढं आवृत्त्या निघाल्या पण मला काहीच मिळालं नाही. (७४)
* **मराठी कथा गाडगीळ-गोखल्यांनी निश्चित पुढं नेली. पण ती अधिकाधिक वाचकांपर्यंत पोचली नाही.** (७५)
* मला कल्पनाविलासाबरोबर भावनाविलास आणि वैचारिक मंथनही हवं आहे. म्हणूनच कादंबरीच्या माध्यमातून लोकचिंतन करण्याचा माझा प्रयत्न आहे. (७९)
* मराठीत चांगले लेखक पुष्कळ आहेत; पण द्वितीय श्रेणीतून प्रथम श्रेणीत येताना ते कोठेतरी मध्येच थबकतात. (८०) (१९७०)
* हरिभाऊ आपटे, वि. सी. गुर्जर यांच्या गोष्टी मला आवडत. त्या वाचनाचं स्मरण आजही मला आनंदप्रद वाटतं. माझ्या पिढीतले दिवाकर कृष्ण माझ्या पाठोपाठ आलेल्या कथाकारांतले वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे, माझ्यानंतरच्या पिढीतले गंगाधर गाडगीळ आणि त्यानंतरच्या कथाकारांपैकी जी. ए. कुलकर्णी हे सारे मला आवडतात. (९६)
* रूढ अर्थानं मी आस्तिक नाही... या विश्वचालक शक्तीच्या संदर्भात मानवी जीवनाचा विचार करणं हे जर आस्तिकतेचं लक्षण असेल तर त्या दृष्टीने मी आस्तिक आहे. एरव्ही नाही. ऐहिक जीवनात आणि सर्व मानवी व्यवहारात ही दिव्यत्वाची प्रचिती अधूनमधून येत असते. त्यासाठी कल्पित स्वर्गात जाण्याची जरुरी नाही असे मला वाटते. (९७)
* अंतरीची करुणा आटू न देता दैवानं आपल्याला जे कार्यक्षेत्र उपलब्ध करून दिलं असेल त्यात काहीतरी विशेष करून दाखवण्याची ईर्षा बाळगण्यानं सामान्य मनुष्याच्या मनाचा विकास होऊ शकतो. हा विकास अंतिम. हेच त्याचं मानवी जीवनातलं साध्य आहे. (९७)
* वाङ्मयात विचारांचा आत्मा घेऊन भावना व्यक्त व्हायला हवी. (१०१)
* आजच्या लेखकांतल्या बाबुराव बागुलांच्या कथा मला चांगल्या वाटतात. नारायण सुर्वे यांच्यासारख्यांचं काव्य जिवंत वाटतं... त्या त्या समाजाचं

चित्रीकरण तेवढ्या समर्थपणे झाले पाहिजे. (१०२) (१९७२)

* कोवळ्या वयातला माझ्या स्वप्नाळूपणा संपला पण शिरोडे सोडल्यावर मी सत्याच्या अधिक जवळ गेलो. (१०३)
* सिनेमाच्या माध्यमावर माझी श्रद्धा आहे. जे लिहून, बोलून तुम्ही सांगू शकत नाही ते तुम्ही चित्रपटाद्वारे सांगू शकता. मला लोकांपर्यंत पोचायचं होतं. जे दु:ख मला समाजासमोर मांडायचं होतं, त्याकरिता चित्रपटाचा उपयोग करून घेता येईल यावर माझा विश्वास होता. (१०३)
* १९४२च्या चळवळीपासून मी अस्वस्थ होतो. चळवळ मान्य होती, पण तिचं स्वरूप मला पचू शकलं नाही. नैतिकता कुठेतरी ढासळत आहे ही जाणीव मला पोखरीत होती. लढाईचे परिणाम म्हणून बकालपणा, काळाबाजार या गोष्टी दिसत होत्या. लोकांनी धैर्य दाखवलं होतं, पण नैतिकतेचा आधार तुटला होता. नीतिमत्ता ढासळणं म्हणजे समाजाच्या मनाला महारोग जडणं असं मी समजतो. माझा ध्येयवाद हादरल्यासारखा झाला... नव्या समाजाचं आकलन मला झालं नसेल तर खोटं लिहिण्यापेक्षा न लिहिणं बरं!... मध्यंतरी तेरा वर्षे मी लेखन केले नाही. (१०४) (१९७२)
* लेखनात महत्त्वाचा भाग असतो तो म्हणजे जीवनाचा शोध. मी कसला जीवनाचा भाष्यकार? जीवनाचा खरा भाष्यकार व्यास. त्यासाठी प्रतिभा केवढी मोठी हवी? दृष्टी व्यापक हवी. (१०५)
* आदिमानवापासून आजच्या मानवापर्यंतच्या वाटचालीत सदसद्‌विवेकबुद्धी, सर्वत्र विखुरलेले सौंदर्य पाहण्याची दृष्टी आणि दुसऱ्याकरता जगण्याची (अल्पस्वल्प का होईना) शक्ती या तीन देणग्या मानवजातीनं मिळवल्या आहेत. प्रेम, सेवा, निष्ठा, त्याग, करुणा, कृतज्ञता पराक्रम अशा मूल्यांची प्राणपणानं पूजा करणारे महाभागही तिनं दिले आहेत. (१०५)
* प्राचीन संस्कृतीला अभिप्रेत असलेलं आत्मज्ञान आणि अर्वाचीन संस्कृतीला मान्य असलेलं ऐहिक जीवन यांचा समतोल व्यक्ती आणि समाज यांच्या जीवनात जेव्हा सांभाळला जाईल तेव्हाच नवा मानव निर्माण होऊ शकेल. (११०)
* व्यास, वाल्मीकी, टॉलस्टॉय, शेक्सपियर यांच्यापासून टागोर, खलिल जिब्रान आणि हरिभाऊ आपटे -राम गणेश गडकरी यांच्यापर्यंत माझ्या मनाच्या देव्हाऱ्यात अनेक लहानमोठी दैवते मी गेल्या साठ वर्षांत पूजली आहेत. प्राचीन मराठी कवीत तुकाराम आणि अर्वाचीन मराठी कवींत केशवसुत हे माझे अद्यापि आवडते राहिले आहेत. (१११)
* कला म्हणजे नवनिर्मितीद्वारे जीवनाला सुरूपता, सरसता आणि संपूर्णता आणण्याची मानवाची अनादिकालापासून चालू असलेली धडपड.

* विरूपता, विसंगती आणि विसंवाद यांनी भरलेल्या जीवनसागराच्या तळाशी असलेले मौतिकयुक्त शिंपले शोधण्याची मानवाची अखंड धडपड म्हणजे सौंदर्य.
* अंतर्मनातल्या एकाकीपणाच्या आणि क्षणभंगुरतेच्या जाणिवेचा विसर पडावा म्हणून बाह्य सृष्टीशी आणि तिच्यातल्या चैतन्याशी समरस होण्याची मानवाची धडपड म्हणजे प्रेम. (११२)
* विश्वसंसाराच्या मुळाशी असलेली अज्ञेय, अनामिक शक्ती म्हणजे देव. (११२)
* साहित्याचा, कलात्मक साहित्याचा समाजावर निश्चितपणे परिणाम होतो. पण तो परिणाम संस्कारात्मक असतो. असे संस्कार घडत गेले तर लोकांची संकुचित दृष्टी बदलण्यास मदत होते. (११४)
* मी शिरोड्याऐवजी पुण्यामुंबईत राहिलो असतो तर माझे विषय वेगळे झाले असते, पण त्यांचा आविष्कार मात्र कल्पनारम्यच झाला असता. (११६) (१९७३)
* सरकारने कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन करावे. अभिरुची हा आपल्या एकूण संस्कृतीचा प्रश्न आहे. (११९)
* स्वेच्छामरणाचा अधिकार माणसाला मिळायला पाहिजे असे मला वाटते. (१२४) (१९७३)
* मला लेखनासाठी एक सूर सापडावा लागतो. सूर सापडला की मी तडाखेबंद लिहू शकतो. सध्या सूर सापडत नाही. (१२५) (१९७३)
* **पहिली दहा वर्षे मी सपाटून लिहिले... त्या दहा वर्षांच्या ढोरमेहनतीचं एक रुपयासुद्धा मानधन मला मिळालं नाही.** लेखनावर पैसे मिळतात ही कल्पनाच नव्हती. (१२५)
* लेखकापाशी भविष्यकाळाबद्दल श्रद्धा हवी. उत्तम लेखक हा त्याच्या काळाचा तर हवाच, पुढच्या काळाचाही हवा. हरिभाऊ तसे होते. केशवसुत तसे होते. आजच्या काळात मर्ढेकरांपाशी ती दृष्टी दिसते. त्यांना माणसाचं माणूसपण टिकावं अशी ओढ होती. (१२७)
* जीवनात अपेक्षपेक्षा मला जास्त समाधान मिळाले. वाचकांनी खूप प्रेम केले. त्यामुळे पुस्तकांवर पुरेसा पैसाही मिळाला... भोगापेक्षा त्यागाचे मोल समजले. त्यामुळे दु:खे पचविता आली. (१३१)
* **खरंतर जग कधीच सुधारत नाही.** जग सुधारण्याचं स्वप्न आपल्यापुढं असतं आणि आपण त्यासाठी धडपडत असतो. बुद्ध, ख्रिस्त यांनी तर जग सुधारलं का? (१३६)
* माझ्यासारखा लेखक हा आपल्या काळापुरता असतो. हा भविष्यावर

अधिकार चालवणारा लेखक नाही. वर्तमानाशी जेवढा सांधा जोडता आला तेवढा मी जोडला. त्याचा काही उपयोग झाला. लोकांनी मला उचलून धरलं. **पण मी युनिव्हर्सल काही केलं असं नाही. तेवढा मोठा लेखक मी नाही.** (१४२)

* युनिव्हर्सल अपील किंवा सिग्निफिकन्स असणारा मराठी लेखक कुणी नाही. (१४२) (१९७३)
* रेडिओ, चित्रपट ही साधनं म्हणजे अभिजात साहित्यावरील आक्रमणं आहेत. त्यामुळे उच्च अभिजात साहित्य लोकांच्या वाचनात येण्याची शक्यता हळूहळू कमी होतेय असे मी १९४१ साली जमखिंडी साहित्य संमेलनात म्हटले होते. कमर्शियल साहित्य हे अभिजात साहित्यावर मात केल्याशिवाय राहणार नाही. तो धोका पत्करून चांगल्या लेखकांनी आपल्या कलागुणांची जोपासना केली पाहिजे. (१४३)
* आजच्या घडीचा कथाकार म्हणून मला जी. ए. कुलकर्णी हे आवडतात. त्यांनी लावलेला नियतीचा सूर मला आवडत नाही, पण तरीही त्यांची कथा श्रेष्ठ आहे. (१४७) (१९७६)
* तुम्ही कथाकार होण्यासाठीच जन्मला आहात. बाकी सर्व सोडून द्या. कथेतच तुमचे सर्वस्व आहे असे मला १९२३ साली श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी लिहिले. माझ्यात जे आहे ते मलाच त्यांनी सांगितले. हे त्यांच्या मोठेपणाचे ऋण मी आयुष्यात विसरणार नाही. त्या वर्षी मी झपाटल्यासारख्या वीस कथा लिहिल्या. (१६२)
* कुसुमाग्रजांच्या प्रतिभेची मूळ प्रकृती आहे कवीची. त्यांच्यातील कथानिर्माता इतका प्रबळ नाही. कुसुमाग्रजांकडे कथाकाराची प्रतिभा आहे पण व्यासंगाची प्रवृत्ती नाही. बद्ध होण्याची आस नाही. कथाविषयाशी रंगणे, काव्यात्म वृत्तीने रंगणे आणि व्यासंग टिकवणे या खंडकाव्याला आवश्यक असणाऱ्या गोष्टी. केशवसुत परंपरेचे ते शेवटचे प्रतिनिधी होत. (१७१) (९६४)

अशा विविध विचारांतून खांडेकरांच्या चिंतनाची व्याप्ती, सातत्य आणि सुसंगती जाणवते. जीवनाचा शोध घेण्याची, साहित्याचा अर्थ जाणून घेण्याची त्यांची ओढ शेवटपर्यंत तरतरीत होती. या मुलाखतींच्या माध्यमातून त्यांच्या चिंतनाची अद्ययावतता समोर येते. आपल्या विचारांशी त्यांची नाळ जुळते. त्यामुळे त्यांच्याबद्दलची आस्थाही दृढ होते.

**किंमत : १३०रु. सभासदांना : ९१रु. पोस्टेज : २५रु.**



# मुलाखत

## या पुढचा काळ अनुवादांचाच!

सियाही लिटररी कन्सल्टन्सी,
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मिता कपूर -**

*जयपूर येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाच्या संचालक म्हणून २००६-०७मध्ये मिता कपूर यांनी आपली संघटनक्षमता प्रकट केली. साहित्यविषयक वेगवेगळे उपक्रम राबवण्याबरोबरच वाङ्मयीन सल्लागार (लिटररी एजंट) म्हणूनही त्या काम पाहतात. प्रादेशिक भाषांमधील उत्तम दर्जेदार साहित्य इंग्रजी आणि इतर भाषांत अनुवादित व्हावे यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्या दृष्टीने वृत्तपत्रांमध्ये स्तंभलेखन करून उत्तमोत्तम साहित्यकृतींकडे त्या लक्ष वेधत असतात आणि जागतिक पातळीवर साहित्याचे आदानप्रदान व्हावे यासाठी जाणीव जागृती करीत असतात.*

**प्रश्न - वाङ्मयीन सल्लागार म्हणून काम करण्याची कल्पना कशी सुचली?**

उत्तर - कथा-कादंबरी लिहिताना लेखक खूप परिश्रम करीत असतो. त्याच्या परिश्रमाची जाणीव आपल्याला हवी. तेवढी आपली संवेदनक्षमता तरल हवी. आपण लिहिलेल्या कथासंग्रहाला किंवा कादंबरीला प्रकाशक शोधण्यासाठी त्याला खूप कष्ट पडतात. एखाद्या प्रकाशकाकडे हस्तलिखित दिले तर ते वाचून निर्णय द्यायला काहीवेळा प्रकाशक वर्षा-दोन वर्षांचा

कालावधीही घेतात. त्या प्रकाशकाकडे बरीच हस्तलिखिते येत असल्याने असे घडणे स्वाभाविक ठरते. परंतु त्या लेखकाचे पुढचे लेखन त्यामुळे रेंगाळते. पुस्तक वेळेवर छापले जाणे, त्यावर वाचकांच्या प्रतिक्रिया येणे, त्यामुळे लेखकाला प्रोत्साहन लाभणे, त्यातून आर्थिक लाभ होणे या सर्व प्रक्रियेला खीळ बसते. ही प्रक्रिया गतिमान होण्यासाठी लिटररी एजंट महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. आपल्या देशात सध्या लेखनगुण व प्रतिभा असणाऱ्या तरुणांची संख्या फार मोठी आहे. एक लिटररी एजंट म्हणून अशा प्रतिभाशाली लेखकांचा शोध घेऊन, त्यांच्या लेखनाचा सर्वंकष परामर्श घेऊन, त्या लेखनाचे संपादन करून त्याची वाचनीयता आणि आव्हान वाढवणे आणि देशातील वाङ्मयीन संस्कृतीच्या अभिवृद्धीत सहभागी होणे हे मला एक आव्हान वाटले. प्रादेशिक भाषांमध्ये लेखन करणाऱ्या तरुणांना भेटल्यावर, त्यांच्याशी चर्चा केल्यावर, त्यांच्यातील नैराश्य, त्यांच्यातील असहायता आणि अगतिकता जाणवते. असंतोष जाणवे. प्रादेशिक भाषांत चांगले प्रकाशक मिळणे किंवा पुस्तकाचे वितरण व्यापक प्रमाणावर होणे, पुस्तकाचा उठाव होणे, आर्थिक यश मिळणे हे सर्व फार अवघड असते. प्रादेशिक भाषांमध्ये वाचकवर्ग मर्यादित असतो. पुस्तके विकत घेऊन वाचण्याची प्रवृत्तीही कमी असते. त्यामुळे पुस्तके चांगली निघाली तरी त्यांचा खप बेताचाच होतो. त्यामुळे लेखन ही केवळ हौस ठरते... प्रादेशिक भाषांतील उत्तम साहित्य हे वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये अनुवादित होणे आणि त्या अनुवादांसाठी व्यापक मार्केट निर्माण होणे आवश्यक आहे. आपल्या भाषांतील साहित्यकृतींची गुणवत्ता, ताकद, क्षमता आणि आवाहकता - ही आपली खरी संपत्ती. ही संपत्ती आपण जपायला हवी. तिच्यात भर घालायला हवी. त्यासाठी आपण या प्रादेशिक साहित्याला एक जागतिक व्यासपीठ मिळवून द्यायला हवे. याच उद्दिष्टाने मी सियाही ही संस्था स्थापन केली. माझ्याप्रमाणेच विचार करणाऱ्या माझ्या अनेक मैत्रिणींनी माझ्या कल्पनेला उचलून धरले. नमिता गोखले, नीता गुप्ता, प्रमोद कुमार, जया भट्टाचार्य, डॉ. नीरजा मिश्रा या सर्व मैत्रिणींनी मदतीसाठी हात पुढे



**मिता कपूर**

केला. उत्साही, सक्षम आणि जिज्ञासू संपादकांची साथ त्यामुळे मिळाली.

**प्रश्न - सियाही वाङ्मयीन सल्ला केंद्राचे काम प्रत्यक्ष कधी सुरू झाले?**

उत्तर - एप्रिल २००७ मध्ये 'सियाही'चे प्रत्यक्ष काम सुरू झाले. बरीच हस्तलिखिते आमच्याकडे आली. त्यातील आठ नऊ हस्तलिखिते आम्हाला विचारात घेण्यासारखी वाटली. त्यांचे वाचन, संपादन, त्याबद्दलचे विचारमंथन, लेखकांशी त्या संदर्भात होणाऱ्या चर्चा - या सर्वांमुळे आम्ही एकमेकांजवळ येत गेलो. एकमेकांचे विचार जाणून घेताना मानवी अनुभवाच्या वेगवेगळ्या आश्चर्यकारक, अतर्क्य शक्यतांचे एक नवेच भान आले. त्यातून खूप काही शिकायला मिळाले. जाणिवेच्या कक्षा विस्तारत गेल्या. आठ नऊ हस्तलिखितांवर घेतलेली मेहनत आम्हाला संपादन- पुनर्लेखनाबाबत काही प्राथमिक कार्यप्रक्रिया ठरवण्याच्या दृष्टीने खूपच उपयुक्त ठरली. तीन पुस्तकांचे अनुवाद झाले. ते पुन: पुन्हा वाचून सफाईदार करण्यात आले. त्यांना प्रकाशक मिळाले. त्यासाठी योग्य ते करारमदार झाले. आमच्या संस्थेचे हे आरंभीचेच वर्ष असल्याने आमचा वेग थोडा मंद आहे; तो पुढे निश्चितच वाढेल. आम्हाला त्याबाबत फार घाईही करायची नाहीये.

**प्रश्न - लेखकाबरोबर प्रत्यक्ष काम करायला कधी आरंभ करता?**

उत्तर - हस्तलिखित आल्यावर प्रथम ते वाचण्यात येते. ते चांगले आणि आशयसंपन्न वाटले, वेगळे वाटले तर आम्ही लेखकांशी संपर्क साधतो. नाहीतर सरळ परत पाठवतो. हस्तलिखित स्वीकारल्यावर त्यामधील गुण-दोषांबाबत लेखकांशी चर्चा करतो. कच्चे दुवे, निसटलेले दुवे, व्यक्तिचित्रणातील वा आशयातील त्रुटी, भाषा दोष, व्याकरणातील चुका वगैरे बाबींवर लेखकाच्या सहकार्याने काम करतो. त्यातून हस्तलिखिताची जडणघडण होते.

**प्रश्न - सध्या कोणत्या लेखकांबरोबर तुमचे काम चालू आहे?**

उत्तर - उमा परमेश्वरन, अंजू कंवर, शुभांगी स्वरूप, पंकज सेकसरिया, जुगल मोदी, ताज हसन, दिपाले परमार, विजयलक्ष्मी चौहान.... आणखीही काहीजण...

**प्रश्न - आर्थिकदृष्ट्या तुमचा जम कसा बसला आहे?**

उत्तर - आता कुठे आमची सुरुवात आहे... आर्थिकदृष्ट्या संस्थेचा जम बसायला काही काळ जावा लागणारच.

**प्रश्न - लेखकाकडून त्यासाठी विशिष्ट शुल्क तुम्ही घेता की पुढे मिळणाऱ्या मानधनाचा काही भाग तुम्ही घेता?**

उत्तर - इतर लिटररी एजंट जेवढे कमिशन घेतात, तेवढेच आम्हाला मिळावे अशी आमची अपेक्षा आहे.

**प्रश्न - लेखकांशी होणाऱ्या वैचारिक वाङ्मयीन चर्चांबाबत तुमचा**

**अनुभव कसा आहे?**

उत्तर - आमचे लेखक हे आमच्या संस्थेचे, सियाही परिवाराचेच घटक बनतात. एकमेकांच्या अनुभवांची मोकळेपणाने होणारी देवघेव... ही उभयपक्षी एक आनंदाची बाब असते. खूप मजा येते.

**प्रश्न - भारतीय लेखकांबाबत त्यांचे प्रतिनिधी म्हणून परदेशी प्रकाशकांशी तुमच्या काही वाटाघाटी चालू आहेत का? की भारतीय प्रादेशिक भाषांच्या पातळीवरच तुमचे काम चालले आहे?**

उत्तर - दोन्ही पातळ्यांवर आमचे काम चालले आहे. काही लेखकांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर आम्ही प्रतिनिधित्व करतो; वेगवेगळ्या भाषांतील पुस्तकांचे अनुवाद कार्य करीत असल्याने देशांतर्गत पातळीवरही काम चालते. आमचे कार्यक्षेत्र देशात-परदेशात दोन्हीकडे आहे.

**प्रश्न - प्रकाशकांशी करार झालेली पुस्तके कुठली?**

उत्तर - शरच्चंद्रांचे संपूर्ण साहित्य आणि कार्तिक नायरची पुस्तके - लौकरच हार्पर -कॉलिन्सतर्फे बाजारात येतील.

**प्रश्न - उत्तम पुस्तकाबाबत आपल्या काय अपेक्षा असतात?**

उत्तर - हे सांगणे अवघड आहे. प्रत्येक पुस्तकाचे एक बलस्थान असते आणि हे बलस्थानही कमीजास्त प्रमाणात जाणवते. त्यामुळे त्याबाबतच्या अपेक्षाही वेगवेगळ्या राहतात.

**प्रश्न - तुम्हाला वाटणारी चांगल्या हस्तलिखिताची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील का?**

उत्तर - ज्या जीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे, त्या जीवनाचा सर्वंकष अनुभव वा ज्ञान लेखकाला आहे, हे जाणवायला हवे. त्याचबरोबर त्या अनुभवापासून पुरेसे अलिप्त होऊन कथावस्तू, पात्रचित्रण, संदर्भ, भाषा, विविध व्यक्तींच्या भाषिक लकबी, वातावरणनिर्मिती हे सर्व सुविहितपणे, सुसंगतपणे करण्याची किमया त्याने साधली आहे, असेही वाटायला हवे. जर त्याचे लेखन संशोधनावर आधारलेले असेल तर ते संशोधन किती खोल आणि सर्वस्पर्शी वा व्यापक आहे, हे जाणवायला हवे. यातल्या कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे हे त्याच्या स्वभाव प्रवृत्तीवर ठरत असते... म्हणून मी प्रत्येक हस्तलिखिताकडे एक विशेष निर्मिती म्हणून बघते.

**प्रश्न - जयपूरला दरवर्षी आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव भरवण्यातही आपला पुढाकार असतो. त्याचा फायदा आपल्या लिटररी एजन्सीला होतो का?**

उत्तर - इ. स. २००६ पासून तीन वर्षे मी जयपूर साहित्य महोत्सवाचे आयोजन करीत आहे. नमिता गोखले आणि प्रमोद कुमार यांचे सहकार्य मला मिळते. त्या

महोत्सवाचा संपूर्ण तपशील ठरवून त्याप्रमाणे विविध कार्यक्रम घेतो. हे केवळ स्वेच्छापूर्वक करतो. काहीही मानधन न घेता. 'ट्रॅन्सलेटिंग भारत' हा उपक्रमदेखील सियाहीने प्रथम राबवला. नमिता ही त्याची संस्थापक संचालक होती. सियाहीचा जो मूळ उद्देश तोच उद्देश या उपक्रमामागे होता. भारतीय प्रकाशन व्यवसायाच्या दृष्टीने अनुवाद प्रक्रिया ही सर्वांत मोठी घटना असणार आहे. त्यासाठी आपण सज्ज असायला हवे आणि योग्य प्रकारे या प्रक्रियेचा पाठपुरावा करायला पाहिजे.

**प्रश्न - जयपूर आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवापेक्षा सियाही परिषद भिन्न कशा प्रकारे ठरते?**

उत्तर - पुस्तक प्रकाशन, प्रादेशिक भाषा, मौखिक भाषा, मौखिक परंपरा, स्वामित्व हक्काशी संबंधित समस्या, नव - निर्मिती प्रक्रिया आणि पुस्तक वितरण यंत्रणा यांचा मेळ घालणे, भारतीय साहित्याची उपेक्षित अपरिचित वैभवस्थळे स्पष्ट करणे, ईशान्य भारतीय भाषांना तूर्त प्राधान्य देणे, देशाला एका सूत्रात बांधणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. देश इतका अवाढव्य आहे, की परस्पर संबंधाचे दृढीकरण करताना अनेक दुवे कच्चे राहतात. ते तसे राहू नयेत या दिशेने जागरूकपणे प्रयत्न व्हायला हवेत... जयपूर जागतिक साहित्य महोत्सवात भारतातील आणि परदेशातील साहित्यिकांना पाचारण करण्यात येते. त्यांचे कार्यक्रम होतात. व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, काव्यवाचन, नृत्य-संगीतादि घटकांचा त्यात यात समावेश असतो.

**प्रश्न - या दोहोंत भाग घेणारे लेखक-कवी तेच असतात का? श्रोत्यांचे व रसिकांचे भान ठेवून कार्यक्रम आखणे अवघड जाते का?**

उत्तर - सुमारे पन्नास निमंत्रित आणि लेखक-कवी दोन दिवसांच्या या महोत्सवात सहभागी होतात. त्यापैकी पाचसहा प्रतिनिधीच काय ते समाईक असतात. तेही मुख्यत: प्रकाशन क्षेत्रातले असतात. रवी सिंग, मार्क पेरेन्ट, उर्वशी बटालिया... आणि दोनतीन लेखक... या दोहोंची उद्दिष्टे पूर्णतया वेगळी आहेत; त्यामुळे कार्यक्रमातही वेगळेपणा असतो. श्रोते आणि रसिक यांच्या अपेक्षांचे आणि अभिरुचीचे भान ठेवण अवघड जात नाही.

**प्रश्न - आपण काही साहित्यविषयक आंतरराष्ट्रीय उपक्रम राबवणार आहात का?**

उत्तर - होय. तसा आमचा प्रयत्न आहे. मात्र कोणत्या स्वरूपाचे हे उपक्रम असावेत याबद्दल अजून निर्णय झालेला नाही. कार्यक्रमाचे स्वरूप ठरले म्हणजे तयारीला लागू.

**प्रश्न - तुम्ही स्वत: एखाद्या पुस्तकाचे लेखन करीत आहात का?**

उत्तर - होय. वर्षभरात ते लिहून व्हावे अशी इच्छा आहे... हे पुस्तक ललितेतर असेल.

**प्रश्न - तुमच्या व्यवसायाचा तुमच्या व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनावर काही परिणाम होतो का?**

उत्तर - आम्ही बायका वेगवेगळी कामे करण्यात पटाईत असतो. मी एक मुक्त लेखिका आहे. माझे कुटुंबिय आणि मी आमचा दिनक्रम चमत्कारिक असणार हे गृहीत धरून चालतो. सियाहीचे काम आता वाढले आहे. तेही या आमच्या भरगच्च दिनक्रमात समावून गेले आहे.

**(पब्लिशिंग टुडे. फेब्रुवारी २००८)**

# आलो-आंधारि

**मूळ बंगाली लेखिका**
बेबी हालदार
**बंगालीतून हिंदी अनुवाद**
प्रबोध कुमार
**हिंदीतून मराठी अनुवाद**
मृणालिनी गडकरी

**किंमत १२० रु. | पोस्टेज २५ रु.**




जर तेरा वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच, सातवीतूनच शाळेला रामराम ठोकून, एका अडाणी, मंद बुद्धी आणि दुप्पट वयाच्या माणसाबरोबर तुझी गाठ बांधली गेली, अंगावर दूध पिणारं एक मूल असतानाच दुसऱ्याची चाहूल लागली आणि पाहता पाहता तीन मुलांची आई झालीस, पंचविशीतच शरीर आणि मन थकलं असतानाही मुलांसकट दूर एखाद्या अनोळख्या गावी जावं लागलं. पोटासाठी मोलकरणीचं काम करतानाच मुलांची दुखणी, अभ्यास, पैसा ह्यांची सतत काळजी वाहावी लागली आणि असं असतानासुद्धा, स्वतःच्या ह्या धकाधकीच्या आयुष्यात सर्व अडचणींना तोंड देत इथपर्यंत कसे आलो, हे सातवीपर्यंत शिकलेल्या मोडक्यातोडक्या पण अतिशय सरळ भाषेत सांगण्याची जिद्द तुझ्यात असेल, तर सखे, तुझं दुसरं नाव असेल बेबी हालदार. – जिच्या 'आलो-आंधारि'ह्या आत्मकथेनं साहित्य-जगतात खळबळ उडवून दिली.




# चुलतसासूची माया

**प्रमोदिनी वडके-कवळे**

मी शाळेतून घरी यायची तेव्हा आई कुसवाजवळ (अंगणातल्या भिंतीजवळ) उभी राहून पलीकडच्या आवारातल्या गांगलकाकूंशी गप्पा मारत असायची. दिवसभराच्या व्यापातले, सखीशेजारणीजवळ मन मोकळं करण्याचे,तिचे ते फुरसतीचे चार क्षण असायचे हे आत्ता माझ्या लक्षात येतंय, पण तेव्हा मात्र मला तिचा फार राग यायचा. ''खायला दे'' ''घरात चल'' अशी भुणभुण करत मी त्या दोघींच्या गप्पांत सारखा व्यत्यय आणायची. माझ्या आधारानं आजीही आईला टोचत रहायची, पण आमच्या दोघींच्याही माऱ्याला न जुमानता,क़ाहीतरी फार महत्त्वाचं बोलत असल्यासारख्या त्या दोघींच्या गुजगोष्टी चालूच रहायच्या. मात्र दिवेलागणीची वेळ झाली की भानावर आल्यासारख्या काकू''चल पुरे आता. तिकडे माझ्या चुलतसासूबाई शंख करतील'' किंवा ''चुलतसासूबाई हाका मारायला लागल्यात'' म्हणत बोलणं आटोपतं घेऊन घराकडे वळायच्या.

वास्तविक, गांगलकाकूंची दोन्ही मुलं आलिबागला मामाकडे शिकायला होती. घरात त्या स्वतः, गांगलकाका,काकांचे मोठे भाऊ नाना आणि चारपाच नोकर अशी मंडळी होती. तरीपण काकू रोज ह्या कुठल्या चुलतसासूबाईंबद्दल बोलतात हा मला प्रश्न पडायचा. अंगणातल्या भिंतीमुळे काकूंकडे जायला लांबचा फेरा पडला तरी, त्यांच्या झाडावरचे मोठ्ठाले गुलाबी पेरू आणि त्यांच्या ओटीवरचा झोपाळा ही दोन प्रमुख आकर्षणं होतीच. त्यासाठी आमचं काकूंकडे नेहमी जाणं असायचं, पण त्यांच्या ह्या नेमक्या दिवेलागणीच्या वेळी हाका मारणाऱ्या चुलतसासूबाई

मला कधीच दिसायच्या नाहीत.

शेवटी न राहवून एकदा मी काकूंना विचारलंच, ''आहेत कुठे तुमच्या चुलतसासूबाई?'' काकू हसल्या म्हणाल्या, ''ये दाखवते.''

मी कुतुहलाने त्यांच्यामागेमाग गेले. स्वयंपाकघरातल्या पेटत्या चुलीकडे बोट दाखवत काकू म्हणाल्या, ''ती बघ माझी चुलतसासू कशी भडकलीये!''... आणि माझ्या बावळट चेहऱ्याकडे बघून खोखो हसायला लागल्या.

चुलीशी जोडलेलं सासूबाईंचं नातं ऐकून मलाही मजा वाटली. आणि केवळ शब्दांची सोय बघून केलेली कोटी, एवढंच मनात न येता वेगळ्या कल्पनेमुळे ते नातं लक्षातही राहिलं, पण आता मात्र कधी काकूंचं बोलणं आठवलं की वाटतं चुलीला घरातली वडीलधारी बाई मानणं अगदी योग्यच होतं, पण सासुबाई म्हणणं म्हणजे जरा.....

चूल सासूसारखी खाष्ट कुठे असते? ती तर घराला घरातल्या माणसांना ऊब देत असते. मायेची, स्वादाची, तृप्तीची उब..

उन्हाळा संपत आला की कुंभारवाड्यातली तानीमावशी तिच्या दणदणीत आवाजात हाका मारत अंगणात उगवायची, तिच्या डोक्यावरच्या टोपलीत दोनतीन लालभडक चुली असायच्या. तिच्याबरोबर तिची एखादी मदतनीस असायची. तिच्या टोपलीत तोंडावर आडवे लोखंडी गज बसवलेल्या कोळशाच्या शेगड्या. फुलांचे गजरे उचलावेत तशा हलक्या हाताने तानीमावशी टोपलीतल्या चुली उचलून खाली काढायची. मग आई आणि आजी तिच्याशी योग्य तेवढी हुज्जत घालून, नीट निरखून पारखून, त्यातल्या एका चुलीचा सौदा पटवायच्या. कधी शेजारच्या सानपबाईही एखाद्या चुलीची खरेदी करायच्या. मोठ्या चुलींचा सौदा मनासारखा झाला की, तानीमावशी आम्हाला हाका मारून मोठ्या उदारपणे टोपलीत खाली ठेवलेल्या छोटया चुली आम्हाला देऊन टाकायची. ह्या ('एकावर एक फ्री' हे मार्केटिंगचं तंत्र तानीमावशीला त्या काळातही अवगत होतं म्हणायचं !) मोठया चुलींची अगदी हुबेहुब प्रतिकृती असलेल्या त्या छोटया चुलींसाठी आम्ही मुली टपूनच बसलेल्या असायचो. आई-आजीसारख्याच मग आम्हीही खूप कळत असल्याचा आव आणून चुलीच्या डोक्यावरची तिन्ही टेंगळं नीट आहेत ना, चूल आणि वैल (जोडचूल) यांच्यामधली पोकळी पुरेशी मोठी आहे ना हे तपासून मग ती चूल ताब्यात घ्यायचो आणि लगेच भातुकलीचे बेत आखायला लागायचो.

मात्र माठ्या नव्या चुलींना स्वयंपाकघरात असा थेट प्रवेश मिळायचा

नाही. त्यांना एक-दोन दिवस मागच्या पडवीतच बसून रहावं लागायचं. चांगलासा दिवस बघून, एखाद्या सकाळी आई हळदीकूंकू वाहून त्यांना स्वयंपाकघरात घ्यायची. त्यानंतर मग ती मृण्मय गृहलक्ष्मी खऱ्या अर्थाने स्वयंपाकाला लागायची.

त्या काळात घरसजावटीचं तंत्र फारसं विकसित झालेलं नव्हतं. टापटीप आणि स्वच्छता हेच गृहसजावटीचे ठळक निकष होते. तरीही चुलीमुळे स्वयंपाकघराला येणारी शोभा काही वेगळीच असायची. कुंभारवाड्यापासूनचा लांबचा प्रवास करून आलेली चूल, दोनतीन दिवसांतच स्वयंपाकघराची जमीन आणि भिंत यांच्याशी अशी एकरूप होऊन जायची की, तिला कधीकाळी वेगळं अस्तित्व होतं, हे लक्षातच यायचं नाही.

माझ्या लहानपणी मातीच्या चुली फक्त सिनेमात जाऊन बसल्या नव्हत्या तर त्या खरंच घरोघरी पेटलेल्या असत. त्यामुळे त्यांच्याबरोबरचं नातं वेगळं गणलं जायचंच नाही. ते एक गृहीतच असायचं.

आजोळी तर काय गाईम्हशींचं गोकुळच होतं. त्यामुळे तिथे स्वयंपाकघरात मुख्य चुलींशी काटकोन करून मांडलेल्या 'दुधाच्या चुली' असायच्या. या दुधाच्या चुलींना भल्या पहाटे जाग यायची. कोळशांच्या ठिणग्या उडवत निखारे फुलायचे आणि त्यावर भल्यामोठ्या पितळी पातेल्यात सायीच्या संथ लाटा उठवत दूध तापायचं. पेटत्या कोळशांचा आणि तापत्या दुधाचा तो खमंग वास अवघ्या घ्राणेंद्रियाला भूपाळी गाऊन जाग आणायचा. दुपारच्या वेळी स्वयंपाकघरात गेलं, की तपेलीत शिजणारी तुरीची डाळ खट्याळपणे भुकेला हाक मारायची. नाहीतर रटरटणारा आंबेमोहोर दोस्तीची शीळ घालायचा. दुधाच्या शेगडीची भूमिका बदललेली असायची आणि तिने लोखंडी तव्याचं शिरस्त्राण चढवून पोळीला सोनेरी चटके द्यायला सुरुवात केलेली असायची. तेलातुपाची ऐट करणाऱ्या पोळीचा खरपूस वास तर घरभर दरवळत असायचा. या सगळ्या गंधसोहळ्याला साथ असायची, चुलीच्या मायाळू उबेची.

थंडीच्या दिवसांत अंगणात पाण्याची चूल धडधडायची. दात घासण्याचं सोंग करत त्या चुलीभोवती दाटीवाटीने बसण्यात, जळती लाकडं पुढे सारताना एकमेकांना चटक्यांची भीती दाखवण्यात, एक वेगळीच मजा असायची. त्या चुलीच्या उबेपाशी बसलं, की थंडीला गुलाबी का म्हणतात त्याचं उत्तर आपोआप मिळून जायचं.

अग्नी. पंचमहाभुतांपैकी एक. या भूताला आपल्या पोटात सामावून

घेणारं एक सामान्य स्त्रीरूप म्हणजे चूल. आपलं प्रत्येकाचं अगदी जवळचं अक्षरशः पोटातून आलेलं नातं या चुलीशी जडलेलं असतं. मग त्या नात्याला सासूऐवजी चूलमाय म्हटलं तर?

गांगलकाकू चुलीला सासू म्हणत असल्या तरी बऱ्याच घरातल्या बायकांशी तिचं नातं मैत्रिणीचंच असावं. कारण खूप ठिकाणी चुलीच्या मागच्या जागेत एखादं मातीचं भांडं पुरून ठेवलेलं मी बघितलंय. हे भांडं म्हणजे गृहिणींची बँक असायची. पंचामृतासाठी लागणाऱ्या सोवळ्यातल्या विरजणापासून घरखर्चातल्या चोरून वाचवलेल्या पैपैशापर्यंत सगळा खजिना त्याच्या पोटात लपलेला असायचा.

मी स्वयंपाक करायला लागले तेव्हा चुलतसासूबाईंची राजवट जवळजवळ संपुष्टात आली होती. कोळशाच्या शेगडीचे थोडे अवशेष कुठेकुठे शिल्लक उरले असले तरी फरफर आवाज करणारे पितळी स्टोव्ह आणि मुकाट्याने जळणारे वातींचे स्टोव्ह अशा संक्रमणातून अन्नपूर्णेचं हे शस्त्र गॅसच्या चकचकीत चौकोनी शेगडीच्या रूपाने भूतलावर अवतरलं होत, पण तरीही स्वयंपाकघरातलं त्याचं स्थान आणि मान यात कोणताही फरक पडलेला नव्हता. आणि आज कुकिंग रेंज आणि ओव्हनच्या जमान्यातही तो पडलेला नाही. एका छोट्याशा टिंबारेषेनं अवघ्या चित्राचा 'लूक' बदलून जावा, त्याचं सौंदर्य वाढावं तसं घरातल्या गॅसचुलीचं असतं. घराच्या समृद्धीचं, संस्कृतीचं, समाधानाचं तेज स्वयंपाकघराच्या ओट्यावरच चकाकताना दिसतं. आपल्याला त्याची वेगळी जाणीव नसते. कारण 'किचन' हे कोणत्याही घराच्या आखीव प्लॅनमधलं फक्त एक मुकाट गहीत असतं. जोपर्यंत आपण घरातच असतो तोपर्यंत त्या एवढ्याशा वस्तूची किंमत कळत नाही, पण घराबाहेर पडलं की घरच्या अन्नाची चव आठवते. अस्वस्थ करते. खूप दिवसांनी घरी आलं आणि स्वयंपाकघरातलं ते तेज विझलेलं असलं की कसं वाटतं ते फक्त आठवून बघा. म्हणजे घरातल्या अन्नपूर्णेच्या आयुधांशी असलेलं आपलं नातं तुमच्या लक्षात येईल.

मित्राच्या घरी गेल्यावर त्यांच्या स्वयंपाकघरातून येणारे वास, फोडणीची तडतड, मिक्सरची घरघर, कुकरची शिट्टी याचं मूल्य काय आणि किती असतं, हे आवाज किती सुरेल वाटतात ते होस्टेलवर रहाणाऱ्या कुठल्याही मुलाला विचारून बघा.

नोकरीला लागल्यानंतरही लग्न होईपर्यंत मी होस्टेलवरच रहात होते. आमच्या कंपनीचं कँटीन फारच छान होतं. होस्टेलचं जेवणही रुचकर

असायचं. खरं म्हणजे घरी आमटीभात, भाजीपोळी एवढंच असतं. आणि तेही आपण चवीला नावं ठेवत खातो, पण मला दोन्ही वेळा अगदी स्वीटडिश, साईडडिशसहित चारी ठाव जेवण मिळायचं. तरीही मला भारतीचा खूप हेवा वाटायचा. कारण नोकरी करणाऱ्या मुलीचं कौतुक म्हणून भारतीची आई संध्याकाळी पावणेसातला कुकर लावायची. सात वाजता भारती हातपाय धुवून स्वयंपाकघरात यायची तेव्हा पानातून वरणभाताच्या वाफा उठत असायच्या आणि आईची पोळी तव्यावर पडलेली असायची

चूलमाय म्हणा किंवा चुलतसासूबाई म्हणा, पण तिच्या आशीर्वादाचं हे सुख असं ज्याला सर्वार्थानं लाभतं त्याला भाग्यवान म्हणायचं नाहीतर काय ?

अन्नपूर्णेच्या आशीर्वादाचं आणखी एक जिवंत चित्र मी पाहिलंय.

वेळ– संध्याकाळची

स्थळ– रस्त्याकडेला उभारलेली तात्पुरती वस्ती.

मळक्या कापडाच्या अपुऱ्या कनातीत तीन दगडांची चूल धडधडतेय. तिच्या ज्वाळेवर चंद्रासारख्या गोल भाकरी फुगतायत. बाजूला लोखंडाची कढई. त्यात रटरटणारं लालभडक कालवण. ते उकळताना पाट्यावर वाटलेल्या मसाल्याचा तिखट वास घमघमत रस्त्यापर्यंत येतोय. दोनतीन लहान मुलं अल्युमिनियमच्या थाळया घऊन बसली आहेत आणि रापलेल्या हातांनी भाकरीचे चतकोर करून त्यांची माऊली त्यांना जेवायला वाढतेय खाटेवर पहुडलेला घरधनी तृप्त नजरेने त्यांच्याकडे पहातोय.

संध्याकाळची मंत्रभारली वेळ, पोटात दिवसभराची भूक, मायेनं वाढणारे हात आणि समोर अन्नब्रह्माचं असं 'रसरशीत' आमंत्रण.

सुख सुख म्हणतात ते दुसरं काय असतं ?

***प्रमोदिनी वडके-कवळे***

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११ ०४८.

# कर्वालो

मूळ कन्नड लेखक
**श्री. के. पी. पूर्णचंद्र तेजस्वी**

अनुवाद
**उमा कुलकर्णी**

**किंमत १००रु. पोस्टेज २५रु.**




सह्याद्रीच्या दक्षिण टोकाकडील निबिड अरण्यात चाललेल्या अद्भुतरम्य शोधयात्रेची रोमहर्षक कथा!

उडता सरडा! एक दुर्मिळ प्राणी! निसर्गाच्या कोट्यवधी वर्षांच्या वाटचालीत घडलेला एक 'अपघात'!

या उडत्या सरड्याच्या शोधयात्रेतील विविध स्तरावरचे यात्री! गावंढळ मंदण्णा, इरसाल यंग्टा, चलाख कुत्रा 'किवी' आणि महान शास्त्रज्ञ कर्वालो!

निसर्गरम्य पार्श्वभूमीवरील सशक्त, जिवंत, रसरशीत, नर्मविनोदी लेखनशैलीतून साकारलेली...

कर्नाटकातील आगळाच निसर्ग उभा करणारी, पर्यावरणवादी, वैशिष्ट्यपूर्ण, बहुचर्चित कलाकृती!

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# पुरस्कार

### * दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा - पुरस्कार वितरण

'केवळ भाषिक अभिमानातून नव्हे, तर महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी झालेल्या अनेक सांस्कृतिक संघर्षाच्या जाणिवेतून मराठीला विसरून चालणार नाही. जो माणूस संघर्ष विसरतो, तो आयुष्यात संपूण जातो,' असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. गो. पु. देशपांडे दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेतर्फे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरणप्रसंगी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगारनेते गोविंद पानसरे होते.

साहित्य सभेतर्फे प्रथमच राज्यस्तरीय पुरस्कार दिले. संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांना 'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथांसाठी राजर्षी छत्रपती शाहू ग्रंथ पुरस्काराने, तर प्रसिद्ध साहित्यिक राजन खान यांना 'गूढ' कादंबरीसाठी वि. स. खांडेकर पुरस्काराने सन्मानित केले.

शाहीर अमर शेखांची गाणी संपली आणि मराठी म्हणून असणारी सांस्कृतिक जाणीव संपली, अशी स्थिती आपण अनुभवतो आहोत, असे सांगून श्री. देशपांडे म्हणाले, ''सद्य:स्थितीत आपण इतिहासच विसरत आहोत. महाराष्ट्राचा इतिहास सांगताना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे क्रांतिकारक कार्यही अनेकांना माहीत नाही,

अशा काळात बौद्धिक आणि वैचारिक परंपरेची जाणीव देणारे साहित्यच समाजाला वेगळी दिशा देईल.''

डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्यासह साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### * दोघा भारतीयांना ॲश्डेन पुरस्कार

'ग्रीन ऑस्कर' या नावाने ओळखले जाणाऱ्या ॲश्डेन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून चारपैकी दोन पुरस्कार भारतीयांनी

पटकावले आहेत. चषक व ३० हजार पौंड, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

राजस्थानातील तिलोनिया येथील बेअरफूट महाविद्यालयाचे संस्थापक बंकर रॉय व एस. पी. गोनचौधरी यांना ॲश्डेन पुरस्कार मिळाला आहे.

रॉय यांनी हिमालयातील अतिदुर्गम १३६ गावांमध्ये सौरपंख्यांचा वापर करून ऊर्जानिर्मिती केली होती, तर चौधरी यांना संस्थेसाठीचा पुरस्कार मिळाला आहे. चौधरी हे पश्चिम बंगालमध्ये अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील विशेषज्ञ आहेत.

धूर न येणारा व पुरेशा इंधनावर चालणारा मातीचा स्टोव्ह तयार करणाऱ्या अफवोर्की तेसफॅजन यांना अन्नसुरक्षा पुरस्कार व मोईल मोइलेगन यांना ब्रिटनसाठी असणारा ॲश्डेन पुरस्कार देण्यात आला आहे. मोइगेलन यांना पवनऊर्जेच्या कल्पना वापराबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे.

लंडनमधील डार्विन सेंटर येथे या पुरस्कारांचे मोजक्या लोकांच्या उपस्थितीत वितरण करण्यात आले. या पुरस्कारांसाठी चार उपखंडांतून पंचवीस देशांनी नामांकन दाखल केले होते. त्यातील नऊ जणांची निवड करण्यात आली. अंतिम यादीत चौघांना पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून हे पुरस्कार देण्यात येत आहेत.

*** आदर्श अध्ययन कक्ष वाचनालयास ग्रंथालय पुरस्कार**

सन २००७-०८ या वर्षाकरिता राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार ''वर्ग - ब'' करिता नागपूर शहर विभागातून 'आदर्श अध्ययन कक्ष, वाचनालय, बाबुलबन, गरोबा मैदान, नागपूर' यांना मिळाला. रु. तीस हजार, सन्मानपत्र व स्मृती चिन्ह असा पुरस्कार वाचनालयाचे अध्यक्ष राम मेश्राम, सचिव यशपाल शामकुमार, माजी सचिव अण्णा हुमणे, मुंबई कार्यकर्ते दादाराव निरज व इतर कार्यकर्ते यांनी स्वीकारला.

वर्ष २००७-०८ मध्ये वाचनालयाला 'अ'वर्ग प्राप्त झाला. ग्रंथालयाची स्थापना १९८१ मध्ये झाली. शासन मान्यता १९८३/८४ मध्ये मिळाली. ग्रंथालयात सध्या १७,१३९ ग्रंथ असून १७ दैनिके व ५६ नियकालिके नियमित सुरू आहेत. ग्रंथालयाद्वारे मोफत इंग्रजी वर्ग/बेरोजगारांना मार्गदर्शन स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी मार्गदर्शन, शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

ग्रंथालयाला मा. सतीशबाबू चतुर्वेदी मंत्री तथा पालक मंत्री (नागपूर जिल्हा) यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन वेळोवेळी लाभले आहे. त्यांच्या निधीतून इमारतीचे बांधकाम झाले आहे.

*** गायक पिळगावकर यांना पुरस्कार**

''मेथीची भाजी आवडत नाही, पण त्याचे थालीपीठ आवडते, अशीच 'थोडीशी चालबाजी' संगीत नाटकांच्या बाबतीत करावी लागेल. संगीत नाटकांची परंपरा

कायम राखण्यासाठी नव्या पिढीची आवड लक्षात घेऊन ही नाटके नव्या स्वरूपात सादर करावीत,'' असे मत प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांनी व्यक्त केले.

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे देण्यात येणारा कृष्णराव गोखले पुरस्कार ज्येष्ठ गायक आणि अभिनेते अरविंद पिळगावकर यांना प्रदान करताना दामले यांनी संगीत नाटकाच्या आजच्या स्थितीकडे लक्ष वेधले. अभय जबडे, विश्वासव पांगारकर, श्याम शिंदे आणि नेहा बेडेकर या रंगभूमीशी संबंधित असलेल्या व्यक्तींना नरहरबुवा पाटणकर आणि हरी गणेश फडके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश फडके, कार्याध्यक्ष चारुदत्त निमकर, कार्यवाह मुकुंद अनगळ व्यासपीठावर उपस्थित होते.

दामले म्हणाले, ''पायात गोळा, पोटात खड्डा आणि तोंडाला कोरड, अशी अवस्था संगीत नाटक सादर करताना होते, काहीतरी वेगळे केले तर संगीत नाटक टिकू शकतील.' 'जादू तेरी नजर'नंतर तीन वर्षांनी प्रशांत दामले नवे नाटक रंगभूमीवर आणत आहेत. हे नाटक विनोदी वळणाचेच असून, येत्या १५ ऑगस्टला मुंबईत, तर २४ ऑगस्टला पुण्यात या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग आहे. मंगेश कदम आणि पौर्णिमा भावे यांच्यासह सादर होणाऱ्या या नाटकाचे नाव स्वत: दामले यांनी गुलदस्तातच ठेवले आहे.

*** डॉ. फडकुले पुरस्कार**

साहित्य आणि सामजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अनुक्रमे ज्येष्ठ समीक्षक डॉ. गंगाधर पानतावणे आणि डॉ. प्रकाश आमटे यांना डॉ. निर्मलकुमार फडकुले पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. एकवीस हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

याच वेळी डॉ. फडकुले स्मारकाची पायाभरणीही झाली. केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास फुटाणे व कवी फ. मुं. शिंदे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यापूर्वी प्रा. रा. ग. जाधव व पन्नालाल सुराणा यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

*** प्रसाद सावकार यांना 'बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार'**

बालगंधर्व सगीत रसिक मंडळातर्फे दिला जाणारा 'बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार' गायक-अभिनेते प्रसाद सावकार यांना १५ जुलै रोजी भरत नाट्य मंदिर येथे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते देण्यात आला.

खाऊवाले पाटणकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे स्वरूप दहा हजार रुपये, सन्मानचिन्ह आहे. तबला वादक विनायक थोरात यांनाही 'सेवा गौरव' पुरस्कार प्रदान केला आहे. पाच हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संगीत नाटकात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गौतम मुर्डेश्वर व अवंती बायस यांनाही सन्मानित करण्यात आले. ❒

# वाचकांचा प्रतिसाद

**सप्रेम नमस्कार**

‘भोगले जे दुःख त्याला’ या आत्मचारित्रात लेखिका आशा आपराद यांनी अतिशय प्रांजळपणे आपले दुःख मांडले आहे, जीवनाशी झगडत कौटुंबिक आणि व्यावसायिक वाटचाल कशी केली ह्याचे हुबेहूब चित्रण केले आहे. त्यांचे हे अनुभव वाचत वाचत आपण पहिल्या पानापासून शेवटपर्यंत कसे जात राहतो हेच कळत नाही.

एका क्षणाला गहिवरून जातो, तर दुसऱ्या क्षणाला आपली जीवनाकांक्षा उफाळून येते. संकटे कोसळत असतानाही लेखिका न डगमगता त्यांच्याशी दोन हात करते. त्यांची भाषाशैलीही आकर्षक आहे. त्या मुस्लीम समाजातील आहेत असे वाटतच नाही. आपल्या आईविषयी त्यांनी जे खरे घडत होते ते नेमकेपणाने सांगितले आहे.

या आत्मचरित्रावरून हे दिसून येते की टाकीचे घाव सोसल्याशिवाय मोठेपण प्राप्त होत नाही.

**सौ. शशिकला वाडकर,**
**टेंबलाईवाडी, कोल्हापूर.**




# डॉक्टर नो

**इयान फ्लेमिंग**

अनुवाद
**विजय देवधर**

**२६०रु. पोस्टेज २५रु.**

डॉ. नो हा कमालीचा निर्दय आणि परपीडक वृत्तीनं पछाडलेला एक मनोविकृत इसम होता. ब्रिटिश सीक्रेट एजंट जेम्स बाँड त्याच्या पोलादी पकडीत सापडला होता. जमैकामधल्या ब्रिटिश सीक्रेट सर्व्हिसच्या गुप्त ठाण्यावरची दोन माणसं रहस्यमयरित्या नाहीशी झाली होती... त्यांचा तपास घेण्याकरता 'एम'नं जेम्स बाँडला जमैका बेटावर धाडलं. त्याच्या संबंधीचे काही धागेदोरे कॅरिबिअनमधल्या 'क्रॅब की' बेटाशी पोहोचत होते.

डॉ. नो च्या गुप्त कारवायांचा वेध घेण्यासाठी जेम्स बाँड त्या बेटावर दाखल झाला. तिथे योगायोगानं हनिसील रायडर या भोळ्या, निष्पाप तरुणीशी त्याची गाठ पडली आणि ती दोघंही अगदी आयतीच डॉ. नो च्या कचाट्यात सापडली. डॉ. नो नं आखलेल्या मृत्यूच्या भयानक सापळ्यामधून सुटका करून घेण्यासाठी

बाँड आणि हनी प्राणपणानं झगडू लागली आणि मग...

## सम्राज्ञी

**तेजस्विनी जाधव**




**२००रु. पोस्टेज २५रु.**

"ऐश्वर्या. लोक ज्याला महत्त्वाकांक्षा म्हणतात, त्या अर्थानं मी महत्त्वाकांक्षी नाही आणि मला स्वत:ला असं महत्त्वाकांक्षी व्हायला आवडतही नाही. दुसऱ्या कुणाचं मी काय सांगू? पण जे दिसेल ते मिळवायला बघायचं, हाताला लागलं म्हणून खिशात घालायला बघायचं, हे मला बरोबर वाटत नाही. माझं कोणतं काम आहे, हे मला नक्की कळलेलं आहे. नुसतं मोठं होणं अशासारखी तर मला मुळीच महत्त्वाकांक्षा नाही. उलट सतत असं मोठं होण्यासाठी धडपड करणाऱ्या लोकांच्या वागण्याचा मला अर्थच कळत नाही. हे लोक कशासाठी सारखे धावत सुटतात, ते समजत नाही, त्यामुळे हाती असलेल्या कामाला पूर्ण न्याय द्यायच्या अगोदरच ते दुसरं काहीतरी मिळवायला बघतात. कुठंच शांती नाही. ऐश्वर्या, अगं कोणतंच काम लहान किंवा मोठं नसतं. फक्त ते नीट समजून घेऊन केलं पाहिजे. मग ते छोटं कामही सगळ्यांत प्रभावी वाटतं आणि ते करणाऱ्यालाही, काहीतरी केल्याचं समाधान वाटतं आणि शेवटी, आयुष्याला मर्यादा असतेच ना? नुसतंच पळत सुटण्यात सार्थक कशाचं वाटणार? मला तर कधी कधी एखादा प्राथमिक शाळेचा शिक्षकही, शिक्षणमंत्र्यांपेक्षा थोर वाटतो. एखादा सरपंच मुख्यमंत्र्यांपेक्षा कर्तबगार वाटतो, कारण त्याला आपल्या कामाचा अर्थ कळलेला असतो."

# श्रद्धांजली

*** डॉ. नानासाहेब धर्माधिकारी**

ज्येष्ठ निरुपणकार नारायण विष्णू ऊर्फ डॉ. नानासाहेब धर्माधिकारी (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. रेवदंडा (ता. अलिबाग, जि. रायगड)सारख्या लहान गावात राहून निरूपणातून समाजप्रबोधन करणाऱ्या आणि व्यसनमुक्तीसाठी कार्यरत असणाऱ्या नानासाहेबांना यंदाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर झाला होता. येत्या २५ नोव्हेंबर रोजी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार होता. मात्र, त्यापूर्वीच त्यांचे निधन झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

आपल्या सान्निध्यातील लोकांना सुखी-समाधानी करण्यात; तसेच त्याला शांतिपूर्ण जीवन जगण्याचा मार्ग नानासाहेबांनी दाखविला आहे. केवळ याच उद्देशाने प्रेरित होऊन त्यांनी या कार्याचा प्रचंड विस्तार केला. सशक्त विवेकी मानवी समाज निर्माण करण्यासाठी ते आयुष्यभर झटले. परिणामस्वरूप त्यांच्या शिकवणीच्या आश्रयाला हळूहळू लाखो सदस्य विसावले. समाजप्रबोधनाच्या कार्याला आरंभ करताना त्यांनी प्रथम मानवी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. आपल्या वंदनीय वडिलांकडून मार्गदर्शन घेतले आणि प्रत्यक्ष कार्याला उभे राहिलयावर एकसूत्र ठामपणे सांभाळले. ते म्हणजे मनुष्याला सुधारण्यासाठी त्याच्यावर भ्रष्टाचार किंवा अत्याचाराचे दोषारोपण करून चालणार नाही. त्यांच्या पूर्वपक्षातील कर्मासाठी त्यांची अवहेलना करून चालणार नाही, तर सत्त्वाच्या सामर्थ्यावर त्यांच्या अंतरंगातूनच त्याला प्रेरणा मिळाली पाहिजे. त्यासाठीची शिकवण त्यांनी आपल्या साध्या सरळ रसाळ वचनांनी

दिली आणि अनेक भ्रांत, अवगुणी व अवलक्षणींना सदाचरणाच्या मार्गावर आणले. डॉ. श्री. नानासाहेबांच्या शिकवणीमुळे आज लाखो सदस्य सुख, शांती आणि समाधान मार्गावर आनंदाने चालत आहेत. प्रत्येक प्रसंगी अत्यंत नम्रतापूर्वक आवर्जून सांगितले की, असे सत्कार व्हावे किंवा पुरस्कार मिळावेत म्हणून मी हे कार्य उभे केले नाही, तर अनेक दुःखी-कष्टी, रंजल्यागांजल्या व उपेक्षित लोकांना सन्मानाने व समाधानाने जगण्याचा मार्ग दिसावा, यासाठीच माझ्या कार्याचा प्रपंच उभा केला आहे.

डॉ. धर्माधिकारी यांच्या मागे त्यांच्या पत्नी शारदादेवी, मुलगा दत्तात्रेय, श्रीकृष्ण, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. डॉ. धर्माधिकारी यांच्या पार्थिवावर त्यांच्या जन्मगावी रेवदंडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

*** अभिनेते बिपीन तळपदे यांचे निधन**

'तो मी नव्हेच', 'अश्रूंची झाली फुले', 'इथे ओशाळला मृत्यू', 'अंधार माझा सोबती' या नाटकांतील वैशिष्ट्यपूर्ण भूमिका साकारणारे अभिनेते बिपीन तळपदे यांचे १४ जून रोजी पनवेल येथील वृद्ध आश्रमात निधन झाले. ते बहात्तर वर्षांचे होते. मो. ग. रांगणेकर यांच्या नाट्यनिकेतन संस्थेच्या 'तो मी नव्हेच' या नाटकात त्यांनी प्रथम भूमिका केली. त्यांनी अलकनंदा थिएटर्स ही नाट्यसंस्था स्थापून वसंत कानेटकरांची 'विषवृक्षाची छाया' व 'एक रूप अनेक रंग' ही नाटके सादर केली होती.

*** पत्रकार विवेक दुबे यांचे निधन**

लोकमत समाचारचे ज्येष्ठ पत्रकार विवेक दुबे यांचे १२ जुलै रोजी निधन झाले. ते त्रेचाळीस वर्षांचे होते. त्यांच्या मागे वडील सत्यनारायण दुबे, आई, पत्नी, मुलगी, भाऊ. प्रा. विजय आणि मोठा आप्त परिवार आहे.

लोकमत वृत्तपत्र समूहाचे अध्यक्ष खासदार विजय दर्डा आणि मुख्य संपादक आमदार राजेंद्र दर्डा यांनी दुबे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. विवेक दुबे काही दिवसांपासून आजारी होते.

*** डॉ. सुषमा जोगळेकर**

फर्ग्युसन महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या माजी उपप्राचार्या डॉ. सुषमा जोगळेकर यांचे दि. १० जुलै, २००८ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

डॉ. जोगळेकर यांचा विद्यार्थीप्रिय अध्यापिका म्हणून लौकिक होता. त्यांचे अनेक विद्यार्थी देशात व परदेशातही सर्वदूर पसरलेले आहेत.

डॉ. जोगळेकर या पूर्वाश्रमीच्या ज्योत्स्ना नातू. त्यांचे शिक्षण बालमोहन विद्यामंदिर व रुईया महाविद्यालयात झाले. शालान्त परीक्षेत त्यांनी संस्कृतचे 'बिडकर

पारितोषिक' मिळविले होते. भाषा विषयांच्या आवडीमुळे महाविद्यालयात त्यांनी कला शाखा निवडली. 'अर्थशास्त्र' हा विषय घेऊन त्या बी.ए. झाल्या. एम.ए.ची पदवी त्यांनी मराठी विषय घेऊन मुंबई विद्यापीठातून मिळविली. फर्ग्युसन महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे अध्यापक श्री. सुहास जोगळेकर यांच्याशी विवाह झाल्यानंतर पुण्यात येऊन त्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात मराठी हा विषय शिकवू लागल्या. नोकरीच्या नियमानुसार मराठी विषयातही बी.ए.ची पदवी मिळवणे आवश्यक असल्यामुळे त्यांनी ती पुणे विद्यापीठातून प्रथम क्रमांकाने मिळविली.

१९९९ साली त्यांना फर्ग्युसनच्या कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्या म्हणून काम करण्याची संधी मिळाली. हे पद त्यांनी निवृत्त होईपर्यंत, म्हणजे नोव्हेंबर, २००६ पर्यंत सांभाळले. आवश्यक तेथे कठोर निर्णय घेत, पण कोणाला न दुखावता त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासन सांभाळले. त्यांच्या कारकिर्दीतच फर्ग्युसनच्या कनिष्ठ महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत बांधून पूर्ण झाली.

१९९१ साली त्यांनी पुणे विद्यापीठाची मराठी विषयातील पीएच.डी. ही पदवी मिळविली. प्रबंधावरून त्यांनी 'आधुनिक मराठी नाटक – आशय व आकृतिबंध' हे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकाला महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद यांनी पारितोषिक देऊन गौरविले.

डॉ. सुषमा जोगळेकर यांना संगीत, नृत्य, नाट्य यांची उत्तम जाण होती. इतर भाषांमधून अनुवादित साहित्याचा प्रवाह मराठीत यावा, असे त्यांना वाटे. निवृतीनंतर अनुवादाची कामे हाती घेण्याचा त्यांचा मानस होता. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'साठी 'Girls of Riyadh' या पुस्तकाचा अनुवाद करण्यास त्यांनी सुरुवातही केली होती.

सर्वांना चटका लावून काळाच्या पडद्याआड गेलेल्या या रसिक, विद्यार्थिप्रिय अशा विदुषीला विनम्र आदरांजली.

❐

# बालनगरी



**अनुक्रमणिका**

सज्जन माणूस १०४

# सज्जन माणूस

सुंदरनगरी नावाप्रमाणेच सुंदर होती.

छान रस्ते, खळखळ वाहणारी नदी, फुललेली शेते. सगळंच सुंदर !

या सुंदरनगरीत गोपूजी सावकार होते. भरपूर श्रीमंत आणि दानशूर !

त्यांनी स्वत:च्या पैशानं आपल्या घराच्या समोरच एक भव्य मंदिर बांधलं. देवाची पूजा करायला एक पुजारीही नेमला. मंदिराच्या खर्चासाठी पैशांची पुरेशी व्यवस्थाही त्यांनी करून ठेवली.

येणाऱ्या भक्तांसाठी, साधुपुरुषांसाठी राहायची सोय केली. गरीब लोकांच्या जेवणाची सोय केली.

सारं कसं ठीकठाक!

पण नंतर गोपूजींच्या लक्षात आलं, 'आपण या मंदिराचा हा व्याप वाढवला खरा, पण याची व्यवस्था बघायला आता कुणी चांगला माणूस हवा.'

हा विचार त्यांनी बऱ्याच जणांजवळ बोलून दाखवला.

मग काय? त्यांना भेटायला लोकांची रीघ लागली. येणाऱ्या प्रत्येकाला वाटायचं, ही नोकरी आपल्याला मिळावी. कारण गोपूजी पगार भरपूर देणार याची सर्वांना खात्री होती.

पण छे! गोपूजींनी सर्वांना परत पाठवलं.

'मला एक सज्जन, चांगला माणूस हवाय. मी तो

बरोबर शोधून काढीन' ते म्हणत राहिले. त्यामुळे बरेच लोक गोपूजींवर ंनाराज झाले. गोपूजी सर्वांकडे दुर्लक्ष करत.

सकाळी मंदिराचे दार उघडायचे, लोक दर्शनासाठी येत रहायचे.



गोपूजी दूर बसून बसून सगळयांचे निरीक्षण करायचे.

एकदा एक माणूस दर्शनासाठी आला. मळकट, फाटके कपडे. फारसा शिकलेलाही नसावा. देवाचं दर्शन घेऊन

तो जायला निघाला, तेव्हा गोपूर्जींनी हाक मारली.

गोपूजींनी विचारलं, 'काय रे, नाव काय तुझं?'

तो म्हणाला, 'तुळशीराम !'

'मंदिराची व्यवस्था बघण्याचं काम करशील का ?'

तुळशीराम आ वासून बघतच बसला.

तो अदबीनं म्हणाला, 'अहो, पण मी फार शिकलेला नाही. एवढ्या मोठ्या मंदिराची देखभाल मी कशी करू शकेन?'

गोपूजी म्हणाले, 'अरे, हे काम बघायला खूप विद्वान माणूस नकोय. फक्त एक सज्जन, चांगला माणूस पाहिजे आहे एवढंच!'

तुळशीरामने विचारले, 'एक विचारू? एवढ्या येणाऱ्या माणसांमध्ये मीच सज्जन, चांगला आहे असं तुम्हाला का बरं वाटलं?'

गोपूजी हसत म्हणाले, 'मला खात्री आहे. तुम्ही चांगले आहात. काल मंदिराच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर एक विटेचा तुकडा अर्धवट अडकून वर आला होता. येणाऱ्या जाणाऱ्या कितीतरी लोकांना ठेच लागत होती. कोणी पडायचं, कोणी लंगडायच. पण उठून चालू लागायचं.'

'तुम्हाला ठेच लागली नाही. पण तुमचं त्या विटेच्या तुकड्याकडे लक्ष गेलं. मी सारं पाहात होतो. तुम्ही देवळाच्या मजुराकडून फावडं घेऊन आलात. खणून तो तुकडा काढून टाकलात. इतकंच नाही तर परत सिमेंट वाळू टाकून तो प्रदक्षिणेचा भाग व्यवस्थित करून ठेवलात.'

तुळशीराम म्हणाला, 'अहो, त्यात विशेष ते काय ?

रस्त्यातले काटे, खडे बाजूला सारणं हे प्रत्येक माणसाचं कर्तव्य आहे. कुणाला ना कुणाला ते टोचणारच ना !'

गोपूजी हसत हसत म्हणाले, 'तुळशीराम, हे कळतं सर्वांनाच. पण कळणं आणि करणं यात फरक आहे ! एखादी त्रुटी कळल्यावर ती दुरुस्त करतो तोच शहाणा, चांगला माणूस !'

तुळशीराम मंदिराचा व्यवस्थापक झाला. त्यानं मंदिराची उत्तम देखभाल तर केलीच; भाविकांसाठी अनेक चांगल्या सोयी केल्या.त्यामुळे सुंदरनगरीतील त्या देवळाची ख्याती खूप दूरवर पसरली.

मग सुंदरनगरीत जो तो म्हणू लागला, माणूस असावा तर तुळशीराम सारखा

❐


## बालचमूंसाठी खुसखुशीत मेवा!

**धूमधडक योजना**

लहान मुलांची १० पुस्तकं खरेदी करा

अधिक फक्त ६०/- रुपये भरून

''मेहता मराठी ग्रंथ जगत'' चे

एक वर्षाचे वर्गणीदार व्हा !

## ऑगस्ट दिनविशेष



| | | |
|---|---|---|
| ०१ ऑगस्ट | - | लो. टिळक देहावसान (१९२०) |
| ०४ ऑगस्ट | - | सामाजिक समता दिन |
| ०७ ऑगस्ट | - | रवींद्रनाथ टागोर पुण्यतिथी |
| ०९ ऑगस्ट | - | क्रांतिदिन (१९४२) |
| १५ ऑगस्ट | - | भारतीय स्वातंत्र्यदिन (१९४७) |
| १७ ऑगस्ट | - | छ. शिवाजी महाराजांची आग्रा येथून सुटका |
| १८ ऑगस्ट | - | नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे अपघाती निधन (१९४५) |

# शोध थर्मामीटरचा



थर्मामीटर म्हणजेच तापमापक. पूर्वीच्या काळी तपमान मोजण्याचे कोणतेही सर्वसामान्य एकक किंवा साधन नव्हते. इ. स. १५९३ मध्ये प्रसिद्ध शास्त्रज्ञ गॅलिलिओने 'वॉटर थर्मामीटर' बनवला. तेव्हा थर्मामीटर्सना 'थर्मोस्कोप' म्हणत असत. अनेक जणांनी वेगवेगळ्या पद्धतींचे थर्मामीटर तयार केले होते.

सेंटोरिओ या इटालियन माणसाने त्या उपकरणात आकड्यांची पट्टी घालण्यास सुरुवात केली.

गॅब्रिएल डॅनियल फॅरनहाईट या नेदरलँडमध्ये राहणाऱ्या जर्मन माणसाने १७०९ मध्ये अल्कोहोल थर्मामीटर शोधून काढला. ग्रॅबिएल  भौतिकशास्त्रज्ञ होता. तो आणि हवामान शास्त्राच्या अभ्यासात उपयोगी पडणारी उपकरणे बनवत असे. १७१४ मध्ये त्याने पारा वापरून  थर्मामीटर बनवला. तो आता त्याच्या नावाने 'फॅरनहाईट' म्हणून ओळखला जातो.

फॅरनहाईटच्या पट्टीवरचा शून्य हा सेल्सियसच्या पट्टीवरच्या गोठणबिंदू पेक्षा ३२ अंश सें. खाली होय आणि पाण्याचा



उत्कलन बिंदू म्हणजेच १०० अंश सेल्सियस म्हणजेच २१२ अंश फॅरनहाईट होय.

सरुवातीला अनेक वेगवेगळे पदार्थ वापरून तापमापक बनविण्याचे प्रयत्न झाल, पण पाऱ्याला अधिक पसंती दिली गेली. याचे कारण म्हणजे पारा हा तापमानातील बदलांना ठरावीक आणि सातत्याने (युनिफॉर्मली) प्रतिसाद देतो. शिवाय पाऱ्याचे बाष्पीभवन होत नाही. या कारणांमुळे पारा वापरणे सोयीचे ठरले. काचेच्या नळीवर कोरलेल्या आकड्यांमुळे पाऱ्याच्या पातळीत पडलेला फरक सहज दिसून येतो. थर्मामीटरचे टोक नेहमीच बल्बच्या आकाराचे असते. ट्यूबमधली बाकीची जागा पाऱ्याला प्रसरण पावण्यासाठी ठेवलेली असते. त्यात नायट्रोजन हा वायू भरतात किंवा निर्वात पोकळी ठेवली जाते.

आजकाल वैद्यकशास्त्रात पाऱ्याच्या थर्मामीटरचा फारसा वापर केला जात नाही, पण हवामानशास्त्राच्या अभ्यासासाठी मात्र पाऱ्याचे थर्मामीटर जगभर वापरले जातात. पाऱ्याचे थर्मामीटर शरीर आणि निसर्ग या दोन्हीला हानिकारक असते. म्हणून ते जास्त प्रमाणात वापरले जाऊ नये असा इशारा काही तज्ज्ञ देतात.

**रश्मी खानवेलकर**

# नव्या रूपात

**विनोदवीर बिरबल**




**बुद्धिमान बिरबल**




**निर्मला सारडा**

अकबर बादशहाच्या दरबारातील अनमोल रत्न! आपल्या हुशारीने, हजरजबाबीपणाने उत्कृष्ट न्यायनिवाडा करणारा. विनोदी स्वभावाने अकबराच्या आयुष्यात आनंद फुलवणारा. कोणालाही जे सुचणार नाही ते पटकन् लक्षात येणारा. अशा या चतुर बिरबलाच्या सर्वांनाच आवडणाऱ्या गोष्टी




**लाजवाब बिरबल**

**किंमत**
**प्रत्येकी ३० रु.**

**पोस्टेज खर्च वेगळा**




**चतुर बिरबल**

# चित्र रंगवा



# विज्ञान नवलाई

**डॉ. बाळ फोंडके**



















रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं? पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे? जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे? पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे? प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का? सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो? त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते?

हो! हो! हो!

या सगळया प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!

**६ विषयांचं वैविध्य असणारा आगळा वेगळा संच!**

**पोस्टेज खर्च वेगळा**

**किंमत प्रत्येकी ३० रु.**

## ओळखा पाहू

सवाई गंधर्वांचे शिष्य म्हणून ओळखले जाणारे किराणा घराण्याचे अग्रगण्य गायक आणि सवाई गंधर्व महोत्सवाचे प्रणेते



विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

जूलै अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

**प्रख्यात वीणावादक पंडित विश्वमोहन भट**
**वाद्य - मोहनवीणा**

स्पर्धेचे विजेते - **माधवी काळे, पुणे.**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक -**

प्रणय बोरा - खामगाव, भोसले ए. एस.- परभणी, राघव चोपकर - नागपूर,

**प्रायोजक**

श्री राजू जगदीशचंद्र मेहता, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी, टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**
**(साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी.)**

**सूचना** - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

**एक वर्षाची वर्गणी**
**१५० रु.**

**तीन वर्षांची वर्गणी**
**३५० रु.**

**पाच वर्षांची वर्गणी**
**५०० रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**




३ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'वपु ८५'
वपु काळे
हे ६०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'सुवर्णमुद्रा'
शान्ता ज. शेळके
हे ८०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.



**भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L-2/RNP/PNW/M/38/2006-2008 / L.NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 August 2008.

**बालमित्रांसाठी स्पर्धा**



# माझे आवडते शिक्षक/ माझा जिवलग मित्र



## पत्र लिहा, बक्षीस मिळवा

बालमित्रांनो,
तुम्ही ७ वी ते १० वी च्या वर्गात शिकत असाल तर तुमच्यासाठी ही स्पर्धा.
तुम्हाला शाळेत बराच वेळ घालवावा लागतो. शिक्षक, इतर विद्यार्थी यांच्या सहवासात राहावे लागते.
तुमच्या शाळेतील एखादे शिक्षक वा एखादा विद्यार्थी तुम्हाला सर्वात जास्त प्रभावशाली वाटत असेल, आवडत असेल तर त्याच्याबद्दल तुम्ही आम्हाला पत्राने कळवा.
ते का आवडतात ते पत्रात लिहा.
उंच फुलस्केपच्या वहीच्या दोन कागदांवर बसेल इतपत पत्र असावे. त्यापेक्षा मोठे नको.
ज्यांची पत्रे आम्हाला आवडतील ती आम्ही दिवाळी अंकात छापू. तुमच्या फोटोसह.
शिवाय प्रत्येकी ३००/- रुपयांची पुस्तकेही बक्षीस म्हणून पाठवू.
पत्र पाठविण्याची शेवटची तारीख - २५ ऑगस्ट २००८

**आमचा पत्ताः मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
**१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,**
**टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.**

प्रति,
____________________
____________________
____________________
____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०. येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : प्रेसोग्राफ, ५२६, नारायण पेठ, पुणे ३०.